# अमेरिकन परिकथा

*By*

# L. FRANK BAUM




CHICAGO NEW YORK
GEORGE M. HILL COMPANY
1901

वसंत बागुल

# अमेरिकन परिकथा

## एल फ़्रॅन्क ब्राऊन

यांच्या मूळ अमेरिकन कथांचे

मराठी रुपांतर

अनुवाद : वसंत बागुल

ई साहित्य प्रतिष्ठान

# अमेरिकन परिकथा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अमेरिकन परिकथा

एल फ्रॅन्क ब्राऊन यांच्या मूळ अमेरिकन कथांचे मराठी रुपांतर

अनुवादक : वसंत बागुल

३०२, न्यु शिवम अपार्टमेंट

स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे

फोन: 0251-2587832, 8149068977

vasant_pandit2002@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

पुस्तक निर्मिती सहाय्य: रश्मी किर्लोस्कर

rashmikirloskar53@gmail.com

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १२ मार्च २०१८

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

माझी प्रिय आणि गोड मुलेः

हेमंतकुमार, भाग्यश्री, निलिमा आणि रेवती ह्यांनाः

अकृत्रिम आनंद देणाऱ्या

सातासमुद्रापलिकडील

अनुपम आणि सुंदर अमेरिकन परिकथांची

अनमोल भेट

--भाऊ

# मनोगत

लहान बाळ जेव्हा बोलायला शिकते तेव्हा पहिल्यांदा ते काय म्हणते? “मला गोष्ट सांगा.”

लहान मुलांना गोष्टी फार आवडतात. आणि त्याचं कारण म्हणजे त्यात असलेले चमत्कार आणि कल्पनारम्यता.

जंगलात जसे मोठे सर्प, वाघ, सिंह आणि हत्ती ह्या सारखे हिंस्त्र प्राणी असतात; तसेच हरिण, ससे आणि कासव ह्यासारखे निष्पाप, निरूपद्रवी प्राणीही असतात. ह्या सर्वांच्या स्वभावात फारसा फरक नसतो. वरून वाघ, सिंहासारखी भयंकर वाटणारी माणसे आतून अतिशय प्रेमळ व दयाळू अंतःकरणाची असतात.

पशुपक्ष्यांना, किड्या-मकोड्यांना बोलता येत नाही, पण परिकथांमध्ये त्यांना बोलके करून मानवासारखे आचरण करताना दाखविलेले असते. राक्षस, भुते, हडळी आणि चेटकिणी ह्यांना आपण कधीही पाहिलेले नसते; पण ते जसे वाईट तसे चांगलेही असतात, असे परिकथांमध्ये आपण वाचतो. जगप्रसिद्ध नाटककार शेक्सपिअरने म्हटल्याप्रमाणे –

“काही माणसे भुतांची कामे करतात तर काही भुते माणसांची कामे करतात.”

देव आणि दानव, सत् आणि असत् ह्यांचा झगडा फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. आधुनिक मानवाच्या राहण्या-वागण्यात आणि बुद्धीमत्तेत खूपच प्रगती झालेली आहे. पण लक्षावधी वर्षांपासून त्याच्या स्वभावातील षड्रिपु

(काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर) जसे होते तसेच आहेत, किंबहुना ते अधिकाधिक वृद्धिंगत होत आहेत.

परोपकार, संकटमोचन, योग्य मार्गदर्शन, त्याग व दुसऱ्याच्या दुःखाबद्दल वाटणारी अनुकंपा आणि त्या मोबदल्यात मिळणारे औदार्य, कृतज्ञता आणि मौल्यवान पारितोषिके हा निसर्गाचा नियमच आहे.

सत्य, शिव आणि सुंदर ह्यांच्या बाजूने लढून असत्य, अमंगल आणि विकृत ह्या विरूद्ध विजय मिळविण्यातच मानवाच्या जीवनाचे कल्याण आहे.

--परिकथा हेच सांगतात.

## श्री वसंत बागुल : एक कलंदर लेखक



वसंत बागुल एक शिक्षक. मालेगावच्या शाळेतले. पण PhD ला हेन्रिक इब्सेन च्या नाटकांचा अभ्यास करायचा म्हणून ते थेट नॉर्वेजिअन भाषा शिकायला नॉर्वेमध्ये पोचले. नोकरी धंदा तात्पुरता सोडून. तिथे राहून, पडतील ती कामं करून तिथली भाषा शिकून त्यांनी इब्सेनच्या मूळ पुस्तकांवरून मराठी अनुवाद केले. मग गेले जपानमध्ये तिथल्या साहित्याचा अभ्यास करायला. नंतर न्युयॉर्क (अमेरिका), बर्मिंगहॅम-लंदन-इंग्लंड- फ़्रॅंकफ़ुर्ट (जर्मनी) अशी दुनिया फ़िरून तिथल्या भाषा शिकून त्यांनी डझनभर पुस्तकांचे (नॉर्वेजियन, इंग्लिश, अमेरिकन, जपानी) अनुवाद केले. शिवाय हिंदीतल्या हरिवंशराय बच्चन यांच्या मधुशालाचा मराठीत छंदानुवाद केला आहे. या शिवाय त्यांची स्वतः लिहीलेली नाटके , एकांकिका, लेख, कविता आहेतच. प्रकाशझोतापासून दूर राहिलेला हा एक मनस्वी कलंदर लेखक. त्यांची डझनभर पुस्तकं आता एक एक करून ई साहित्य मधून वाचकांकडे येतीलच.

आपल्या अभिप्रायांची वाट ते पहात आहेत.

त्यांचा पत्ता

वसंत बागुल,

३०२, न्यु शिवम अपार्टमेंट, स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे

फोन: 0251-2587832, 8149068977

vasant_pandit2002@yahoo.com

अनुक्रमणिका

१) दरोडेखोरांचा पेटारा....................................६

२) काचेचा कुत्रा...............................................२४

३) क्काऊकच्या राणीसाहेब...............................४१

४) मुलगी, जिची अस्वलावर मालकी होती.........५९

५) जादूने भारलेली मुद्राक्षरे.............................७४

६) हसणारा पाणघोडा.......................................८६

७) जादूची चॉकलेट्स.......................................१०४

८) कालपुरूषाची कैद........................................११७

९) अद्भुत पंप....................................................१३३

१०) पुतळा, जो सजीव झाला..........................१५१

११) उत्तर ध्रुवावरील पांढऱ्या अस्वलांचा राजा....१६६

१२) उच्चपदस्थ अधिकारी आणि फुलपाखरू.......१७६

## दरोडेखोरांचा पेटारा

त्या दुपारी मार्थाला कुणीही एकटे सोडायचे नाही असे ठरले होते, पण त्या दिवशी असे घडले की ह्या ना त्या कारणासाठी प्रत्येकाला बाहेर बोलाविले गेले होते. जुगार विरोधी महिला मंडळाने आयोजित केलेल्या साप्ताहिक कार्ड पार्टीला सौ.मॅक्फल्र्यांड हजर होत होत्या. नेल्स भगिनीच्या तरूणाला अनपेक्षितपणे तिला गाडीतून लांब फिरवून आणण्यासाठी बोलविण्यात आले होते. पप्पा नेहमीप्रमाणे ऑफिसला गेले होते. तो मेरी ऍनाचा बाहेर जायचा दिवस होता. थेमिलीन बद्दल म्हणायचे झाले तर, तिने त्या छोट्या मुलीची काळजी घेण्यासाठी घरीच रहायला हवे होते; पण थेमिलीनचा स्वभाव अशांत होता.

“तुमची काही हरकत आहे का जर रस्ता ओलांडून जाऊन मी सौ.कार्लटनच्या मुलीशी एखादा शब्द बोलले तर छोट्या बाईसाहेब?” तिने मार्थाला विचारले.

“खचितच नाही,” बेबीने उत्तर दिले. “तुम्ही मागचा दरवाजा बंद केल्यास उत्तम, पण तरीही किल्ली घेऊन जा, कारण मी वरच्या माळयावर असेन.”

“ओ खचितच करीन मी तसं, छोट्या बाईसाहेब,” मोलकरीण आनंदाने म्हणाली, आणि मार्थाला एवढ्या मोठ्या घरात अगदी एकटे सोडून कुलूप बंद करून आणखी दुपारी मित्राबरोबर वेळ घालविण्यासाठी बाहेर पळाली.




दरोडेखोर स्वतः ट्रंकेतून बाहेर आले.

त्या लहान मुलीने तिच्या नव्या पुस्तकातील थोडी पाने वाचली, भरतकामाचे थोडे टाके घातले आणि ‘नव्याने तिच्या भेटीसाठी आलेल्या चार बाहुल्यांशी’ तिने खेळायला सुरूवात केली. नंतर तिला आठवले की वरच्या माळ्यावर बाहुल्यांचे खेळघर असून त्याचा बऱ्याच महिन्यांपासून वापर झालेला नाही, म्हणून तिने ठरविले की त्यावरची धूळ झटकून त्या व्यवस्थित लावाव्यात.

ह्या कल्पनेने प्रेरित होऊन ती छपराखाली असलेल्या मोठ्या खोलीत वक्राकार जिन्याने चढत गेली. उतरत्या छपराला असलेल्या तीन खिडक्यांमुळे खोली लख्ख प्रकाशित झालेली होती, आणि तीत उबदार प्रसन्न वातावरण होते. भिंतीच्या भोवती पेट्या, मोठ्या लोखंडी ट्रंकांची रांग, जुन्या गालिच्यांचे ढीग, मोडक्या तोडक्या फर्निचरचे तुकडे, फेकून दिलेल्या कापडांचे बोचके आणि सटर फटर वस्तू होत्या. प्रत्येक व्यवस्थित घराला अशा प्रकारचे माळे असतात म्हणून मला त्याचे वर्णन करायची गरज नाही.

खेळघर हलविले गेले होते, पण शोधाशोधीनंतर मार्थाला खेलीच्या कोपऱ्यात मोठ्या धुराड्याजवळ ते सापडले.

तिने ते बाहेर ओढले आणि तिला दिसले की त्याच्या मागे लाकडाचा मोठा काळा पेटारा होता जो वॉल्टर काकांनी वर्षानुवर्षापूर्वी इटलीहून पाठविला होता, वास्तविक पाहता- मार्थाच्या जन्मापूर्वी.

एके दिवशी मम्माने तिला त्याबद्दल सांगितले होते; की त्याला किल्ली कशी नव्हती, कारण वॉल्टर काकांनी ते घरी परत येईपर्यंत ती पेटी तशीच न उघडता ठेवायला सांगितली होती; आणि तो भटकंती करणारा काका, जो शक्तिमान शिकारीसुद्धा होता, तो हत्तींची शिकार करण्यासाठी आफ्रिकेला गेला तो परत कधीच आला नाही आणि त्यानंतर त्याच्याबद्दल कुणीही काही एका शब्दानेही ऐकले नाही.

त्या लहान मुलीने त्या पेटाऱ्याकडे मोठ्या जिज्ञासेने बघितले, कारण आता तिचे लक्ष योगायोगाने तिकडे वेधले गेले होते.

तो पेटारा खूपच मोठा होता. मम्माच्या प्रवासी ट्रंकेहून अधिक मोठा- आणि तो मळकटलेल्या पितळी खिळयांनी जडविलेला होता. तो इतका अवजड होता की मार्थाने त्याच्या एका कोपऱ्याला धरून उचलायचा प्रयत्न केला तेव्हा तिच्या लक्षात आले की तो थोडासुद्धा हलू शकला नाही. पण त्याच्या झाकणाच्या बाजूला किल्लीसाठी एक जागा होती. ते कुलूप तपासण्यासाठी ती खाली वाकली आणि तिने पाहिले की ते उघडण्यासाठी खूप मोठी किल्ली लागेल.

आणि तुम्हाला शंका आल्याप्रमाणे त्या छोट्या मुलीला वॉल्टरकाकाचा मोठा पेटारा उघडण्याची आणि त्यात काय आहे हे पाहण्याची इच्छा झाली. कारण आपण जिज्ञासू असतोच. पण लहान मुली आपल्यापेक्षाही अधिक जिज्ञासू असतात. “वॉल्टरकाका परत कधी येतील ह्यावर माझा विश्वासच बसत नाही.” तिने विचार केला, “पप्पा एकदा असे म्हणाले होते की काही हत्तींनी त्यांना मारून टाकलेच असावे. जर माझ्या जवळ फक्त त्याची किल्ली असती-” ती थांबली. अभ्रे, उशा, चादरी ठेवण्याच्या अलमारीतील मांडणीत चाव्यांची एक मोठी परडी होती हे तिला आठवल्याबरोबर तिने तिच्या छोट्या हातांनी टाळया वाजविल्या. त्या अनेक प्रकारच्या आणि आकाराच्या होत्या, कदाचित त्यापैकी एकीने तरी तो रहस्यमय पेटारा उघडेल!

ती जिन्याने झरझर खाली गेली आणि ती परडी घेऊन परत माळयावर आली. नंतर ती त्या पितळी खिळे जडविलेल्या पेटाऱ्यासमोर बसली आणि एकीनंतर दुसरी किल्ली त्यात घालून तिने ते चमत्कारिक जुनाट कुलूप उघडण्याचा प्रयत्न केला. काही खूप मोठ्या होत्या तर बऱ्याचशा लहान होत्या. एक किल्ली कुलूपात जायची पण ती फिरायचीच नाही; एखादी दुसरी अशी गच्च अडकायची की

ती पुन्हा बाहेर निघणारच नाही की काय अशी तिला भीती वाटायची. पण शेवटी ती परडी जेव्हा जवळजवळ रिकामी झाली तेव्हा एक विलक्षण आकाराची खूप जुनाट असलेली किल्ली सहजगत्या कुलूपात सरकली. आनंदाने किंचाळून मार्थाने दोन्ही हातांनी ती फिरवली, नंतर तिने “टिक टिक” असा मोठा आवाज ऐकला आणि दुसऱ्या क्षणाला ते झाकण आपोआप वर उडाले!

त्या लहान मुलीने पेटाऱ्याच्या काठावर क्षणभर वाकून बधितले, आणि तिच्या डोळयांना जे दृश्य दिसले त्याने ती आश्चर्याने एकदम मागे सरली.

हळूहळू आणि काळजीपूर्वक एक माणूस स्वतःला सोडवून पेटाऱ्याबाहेर आला. त्याने जमिनीवर बाहेर पाऊल टाकले, हातपाय ताणले आणि नंतर त्याने डोक्यावरून हॅट काढून तो त्या आश्चर्यचकित झालेल्या मुलीसमोर उभा राहिला. तो उंच आणि लुकडा होता आणि त्याचा चेहरा तपकिरी किंवा उन्हाने काळवंडलेला होता.

नंतर दुसरा माणूस जांभई देत शाळेतल्या झोपाळू पोरासारखे डोळे चोळीत पेटाऱ्यातून बाहेर आला. तो मध्यम आकाराचा होता आणि त्याची त्वचा सुद्धा पहिल्या माणसासारखीच काळवंडलेली होती.

अशा विलक्षण दृश्याकडे मार्था टक लावून आणि आ वासून बघत असतानाच तिसरा माणूस त्या पेटाऱ्यातून रांगत बाहेर आला. त्याची अंगकांती सुद्धा त्याच्या सोबत्यांसारखीच होती पण तो बुटका आणि जाड होता.

ते सर्व तिघे विचित्र पद्धतीच्या पोषाखात होते. त्यांनी छोटे लाल मखमली सोन्याचा गोफ असलेले जॅकेट्स आणि आकाशी निळे रेशमी, चांदीची बटने असलेले मांडचोळणे घातलेले होते. त्यांच्या लांब मोज्यांवर लाल, पिवळया आणि निळ्या रंगाच्या रूंद रिबिन्सच्या झालरी लावलेल्या होत्या. त्यांच्या हॅट्सच्या कडा

रूंद असून त्यांच्या टोकावर शिरपेच होते आणि त्यावरून तीन तीन फुटांच्या भडक रंगाच्या रिबिन्स फडकत होत्या.

त्यांच्या कानात सोन्याच्या मोठ्या वाळया होत्या आणि त्यांच्या कमरपट्ट्यात चाकु सुरे आणि बंदुकांच्या रांगा होत्या. त्यांचे डोळे काळे आणि चकाकणारे होते आणि त्यांच्या मिशा लांब आणि घनदाट असून त्यांचे आकार डुकराच्या शेपटी सारखे वेटोळे होते.

“अरे बाप रे! पण तू अवजड होतास,” जेव्हा त्याने त्याचे मखमली जॅकेट खाली ओढले आणि आकाशी निळया रंगाचा मांडचोळणा झटकला तेव्हा तो जाडा उद्गारला. “आणि तू चेंगरून माझे हाल करून टाकलेस.”

“ते अटळ होते, लुगुई” त्या लुकड्या माणसाने सौम्यपणे उत्तर दिले. ह्या पेटाऱ्याच्या झाकणाने तुझ्यावर मला दाबून टाकले होते. तरीही मी तुझ्याकडे दिलगिरी व्यक्त करतोय.”

“माझ्या बाबतीत म्हणायचे तर,” मध्यम आकाराचा माणूस बेफिकीरपणे सिगारेट गोलाकार फिरवीत आणि पेटवीत म्हणाला, “तुला हे मान्यच करावे लागेल की अनेक वर्षांपासून तू माझा जवळचा मित्र आहेस म्हणून विवाद करू नकोस.”

“तुम्ही माळयावर धुम्रपान मुळीच करू नये,” सिगारेटच्या दृश्याकडे पाहून स्वतःला सावरीत मार्था म्हणाली. “घराला आग लावाल कदाचित.”

मध्यम आकाराचा माणूस ज्याने आधी तिच्याकडे लक्ष दिले नव्हते, तो ह्या तिच्या बोलण्याने त्या मुलीकडे वळला आणि आदराने खाली वाकला.

"बाईसाहेबांनी विनंती केली म्हणून," तो म्हणाला. "मी माझी सिगारेट टाकून देईन." आणि त्याने ती तक्तपोशीवर फेकली आणि त्याच्या पायाने विझविली.

"कोण आहात तुम्ही?" मार्थाने विचारले. जे आत्तापर्यंत अतिशय आश्चर्यचकित करून भिववीत होते त्यांना.

"आमची ओळख करून देण्याची परवानगी द्या आम्हाला." त्याची हॅट डौलाने उंचावीत तो लुकडा माणूस म्हणाला.

"हे लुगुई आहेत," जाड्याने मान डोलविली; "आणि हे बेनी आहेत." मध्यम आकाराचा माणूस आदराने वाकला; "आणि मी व्हिक्टर. आम्ही तिघे दरोडेखोर आहोत---इटलीचे दरोडेखोर."

"दरोडेखोर!" भीतीयुक्त दृष्टीने मार्था किंचाळली.

"अगदी बरोबर. आमच्या तिघांसारखे भयंकर आणि हिंसक दरोडेखोर सर्व जगात कदाचित नसतील." व्हिक्टर गर्वाने म्हणाला.

"अगदी बरोबर," तो जाडा माणूस गंभीरपणे मान हलवीत म्हणाला.

"पण हा दुष्टपणा आहे!" मार्था उद्गारली.

"होय, खरोखर." व्हिक्टरने उत्तर दिले. "आम्ही भयंकर दुष्ट आहोत. तुझ्यासमोर आता उभ्या असलेल्या ह्या तीन माणसांपेक्षा अधिक दुष्ट ह्या संपूर्ण जगात शोधूनही सापडू शकणार नाही."

“अगदी बरोबर,” पाठिंबा देत तो जाडा माणूस म्हणाला.

“पण तुम्ही इतके दुष्ट असायलाच नकोत,” ती मुलगी म्हणाली. “हे-हे-हे द्वाडपणाचे लक्षण आहे!”

व्हिक्टरने नजर खाली केली आणि तो शरमला.

“द्वाड!” बेनी धापा टाकीत आणि घाबरलेल्या नजरेने म्हणाला.

“हा फारच कठोर शब्द आहे,” लुगुई दुःखाने म्हणाला आणि त्याने हातांनी त्याचा चेहरा झाकून घेतला.

“मी थोडा विचार केला,” तो हलक्या आवाजात म्हणाला. भावनाविवश होऊन तो ढासळला होता. “निर्भत्सना आणि तीही एका बाईकडून झाली!”

“जरी तुम्ही अविचाराने बोलला असाल तरी तुम्ही विचार करायला हवा कुमारी की आमच्या दुष्टपणालाही काही सबब आहे. कारण आम्ही दरोडेखोर कसे झालो मला विचारू द्या नाही तर आम्ही दुष्टच राहू नाही?”

मार्था गोंधळली आणि तिने विचारपूर्वक मान हलविली. नंतर तिला काहीतरी आठवले.

“ह्यापुढे तुम्ही दरोडेखोर राहणं शक्यच नाही,” ती म्हणाली. “कारण तुम्ही आता अमेरिकेत आहात.”

“अमेरिका!” तिघेही एकदम ओरडले.

“निश्चितच. तुम्ही आता शिकागोमध्ये प्रेअरी अव्हेन्यू मध्ये आहात. वॉल्टर काकांनी तुम्हाला इटलीहून येथे ह्या पेटाऱ्यातून पाठविले.”

ह्या समाचाराने दरोडेखोर अतिशय भांबावून गेल्याचे दिसले. लुगुई मोडक्या डोलखुर्चीवर खाली बसला आणि त्याने त्याचे कपाळ रेशमी हातरूमालाने पुसले. बेनी आणि व्हिक्टर मागे पेटाऱ्यावर पडले आणि तिच्याकडे त्यांनी निस्तेज चेहऱ्यांनी डोळे विस्फारून बघितले.

जेव्हा तो काहीसा भानावर आला तेव्हा व्हिक्टर स्वतःशीच बोलला.

“तुझ्या वॉल्टर काकांनी आमच्यावर खूप मोठा अन्याय केला.” तो दूषण देत म्हणाला. “जेथे दरोडेखोरांना मान दिला जातो त्या आमच्या प्रिय इटलीपासून त्यांनी आम्हाला काढून घेतले- आणि आम्हाला अपरिचित देशात आणून टाकले, जेथे कुणाला लुटायचं किंवा कुणाकडून किती खंडणी मागायची हे आम्हाला ठाऊक नाही.”

“ हे अगदी बरोबर आहे!” तो जाडा माणूस त्याच्या पायावर दाणकन धपाटा घालीत म्हणाला.

“आणि इटलीत आपला किती छान नावलौकिक होता!” बेनी खेदाने म्हणाला.

“कदाचित वॉल्टर काकांना तुम्हाला सुधारण्याची इच्छा असेल.” मार्थाने सुचविले.

“येथे शिकागोमध्ये मग दरोडेखोर नाहीत का?” व्हिक्टरने विचारले.

“ठीक,” लाजेने वळत मार्था म्हणाली, “आम्ही त्यांना दरोडेखोर म्हणत नाही.”

“मग चरितार्थाचे साधन म्हणून आम्ही काय करावे?” बेनीने हताश होऊन पृच्छा केली.

“अमेरिकेच्या मोठ्या शहरांमध्ये खूप काही मोठे व्यवसाय करण्यासारखे आहेत,” ती मुलगी म्हणाली. “माझे वडील वकील आहेत (दरोडेखोर भीतीने कापू लागले) आणि माझ्या आईचा चुलत भाऊ पोलिस इन्स्पेक्टर आहे.”

“ओ,” व्हिक्टर म्हणाला. “ही चांगली नेमणूक आहे. विशेषतः इटलीत पोलीसांना तपासणी करण्याची गरज असते.”

“सर्व ठिकाणी!” बेनी पुढे म्हणाला.

“मग तुम्ही दुसऱ्या गोष्टी करू शकाल.” मार्थाने उत्तेजन देत संभाषण चालू ठेवले.

“तुम्ही छोट्या ढकलगाडीचे चालक किंवा विविध वस्तू भांडाराचे कारकून होऊ शकाल. काही लोक उपजीविकेसाठी नगरपालिकेतील ज्येष्ठ सदस्य सुद्धा होऊ शकतात.”

दरोडेखोरांनी दुःखाने त्यांचे डोके हलविले.

“आम्ही अशा प्रकारच्या कामासाठी योग्य नाही,” व्हिक्टर म्हणाला. “आमचा धंदा लुटमारीचा आहे.”

मार्थाने विचार करायचा प्रयत्न केला.

“गॅस ऑफिसमध्ये नोकरी मिळणे थोडे कठीण आहे.” ती म्हणाली. “पण तुम्ही राजकारणी व्यक्ती बनू शकाल.”

“नाही!” बेनी संतापाने उसळून ओरडला. “आम्ही आमचा हा श्रेष्ठ धंदा सोडणार नाही. आम्ही नेहमी दरोडेखोर आहोत आणि दरोडेखोरच राहणार!”

“अगदी बरोबर!” जाडा माणूस सहमत झाला.

“शिकागोमध्ये सुद्धा लोक लुटत असणारच,” व्हिक्टरने उत्साहाने उल्लेख केला.

मार्थाला अतिशय दुःख झाले. “मला वाटते ते सर्वच लुटले गेले आहेत.” तिने हरकत घेतली.

“मग आम्ही दरोडेखोरांना लुटू शकू, कारण आमच्याकडे तसा अनुभव आणि असामान्य कौशल्य आहे.” बेनी म्हणाला.

“बापरे, अरेच्चा!” निश्वास टाकीत ती मुलगी म्हणाली. “का त्या वॉल्टर काकांनी ह्या पेटाऱ्यात तुम्हाला येथे पाठविले?”

दरोडेखोर उत्सुक झाले. “तेच तर आम्हाला जाणून घ्यायला आवडेल,” व्हिक्टरने ठामपणे उत्सुकतेने घोषित केले. “कारण वॉल्टर काका आफ्रिकेतून हत्तींची शिकार करताना गमावले हे कुणालाच कधीही कळले नाही,” ती दृढनिश्चयाने पुढे बोलली.

“मग आमचे दैव आम्ही स्वीकारायलाच हवे आणि लुटण्याचे कौशल्य पणाला लावायलाच हवे.” व्हिक्टर म्हणाला.

“जोपर्यंत आम्ही जिवंत आहोत तोपर्यंत आम्हाला आमच्या धंद्याशी इमान राखणं भाग आहे आणि त्याची आम्हाला काही लाज वाटत नाही.”

“अगदी बरोबर!” तो जाडा माणूस ओरडला. “बंधूंनो! आपण सुरूवात करूया. आता ज्या घरात आपण आहोत तेच लुटूया.”

“छान!” इतर ओरडले आणि झटकन उठून उभे राहिले.

बेनी त्या पोरीकडे वळून धमकावत म्हणाला, “येथेच थांब!” त्याने हुकूम सोडला. “एक पाऊल जरी हलवलं तर डोकं रक्तबंबाळ होईल तुझं!” नंतर तो शांत आवाजात पुढे म्हणाला, “घाबरू नकोस, सगळेच दरोडेखोर ह्याच पद्धतीने त्यांच्या कैद्याशी वागतात. पण कुठल्याही परिस्थितीत अर्थातच आम्ही तुला अजिबात इजा करणार नाही.”

“निश्चितच नाही,” व्हिक्टर म्हणाला. जाड्या माणसाने त्याच्या पट्ट्यातून सुरा काढला आणि त्याच्या डोक्यावरून फिरविला. “हे रक्त आहे!” तो एकदम भयानकतेने उद्गारला. “ह्या केळी आहेत!” बेनी भयंकर आवाजात ओरडला. “आपल्या शत्रूंचा गोंधळ उडाला!” व्हिक्टर फुत्कारला.

मदतीसाठीही ती ओरडू शकणार नाही इतके मार्थाला घाबरवून थरथरत एकटे सोडून त्यांच्या हातातील बंदुका, पिस्तुले सरसावीत दातात धरून

सुरे चमकावीत, वाकत- पुन्हा वाकत, चोरपावलांनी सरपटत ते भराभर जिन्याने खाली गेले.

आता किती वेळ तिला एकटीला माळयावर थांबावे लागेल हे तिचे तिलाच ठाऊक नव्हते. पण शेवटी ते दरोडेखोर मांजरीच्या पावलांनी एकामागून एक चढत वर येत असलेले तिने पाहिले.

सर्वांच्या बाहूंमध्ये लुटीचे अवजड ओझे होते, आणि लुगुईने- तिच्या आईच्या उत्कृष्ट सायंकाळच्या पोशाखाच्या गठ्यावर मांसाची पाई ठेवलेली होती. व्हिक्टर नंतर आला. त्याच्या काखेमध्ये छोटे छोटे दागिने, मेणबत्यांची पेटी, बैठकीतल्या खोलीतील घड्याळ होते. बेनीजवळ कौटुंबिक बायबल, कल्ल्याजवळील चांदीच्या दागिन्यांची टोपली, तांब्याची किटली आणि पप्पांचा लोकरीचा मऊ जाड उबदार कोट होता.

“ओ, आनंदीआनंद!” जवळचं ओझं खाली ठेवीत व्हिक्टर म्हणाला, “पुन्हा एकदा लुटण्यात खूप मजा आहे.”

“ओ, अत्यानंद! बेनी म्हणाला, पण त्याने किटली पायाच्या पंजावर पडू दिली आणि नाचताना कासाविस होत इटालियन भाषेतले विचित्र शब्द पुटपुटला. जेव्हा लुगुईने चोरीचा माल ढिगात टाकला तेव्हा, मांसाची पाई हातात धरीत पुढे म्हणाला, “आपल्या जवळ खूप संपत्ती आहे. आणि हे सर्व एकाच घरातून मिळाले! ही अमेरीका म्हणजे खूप श्रीमंत आहे.”

नंतर खंजिराने त्याने स्वतः पाईचा तुकडा कापला आणि उरलेला त्याने त्याच्या साथीदारांना दिला. नंतर मग ते सर्व तिघे तक्तपोशीवर बसले आणि तो पाई खाऊन टाकला तेव्हा मार्था त्यांच्याकडे दुःखाने बघत होती.

“आपल्याजवळ एक गुहा पाहिजे होती,” बेनीने उल्लेख केला, कारण मग आपण आपल्या लुटीचा माल सुरक्षित ठिकाणी ठेवला असता. गुप्त गुहेविषयी तू काही सांगू शकतेस का?” त्याने मार्थाला विचारले.

“तेथे एक प्रचंड गुहा आहे,” तिने उत्तर दिले, “पण ते केन्चुकित आहे. तुम्हाला तेथे मोटारीने खूप काळ प्रवास करून जाणे भाग आहे.”

ते तीन दरोडेखोर विचारात पडल्यासारखे दिसत होते आणि शांतपणे त्यांची पाई चघळत होते, पण दुसऱ्याच क्षणाला दारावरची इलेक्ट्रिक बेल ऐकून ते दचकले, जी लांब वरच्या माळयावरही स्पष्टपणे ऐकू येत होती.

“काय आहे ते?” कट्यारी उपसण्यात त्यांची झुंबड उडून त्यांचे पाय लटपटू लागल्यावर घोगऱ्या आवाजात व्हिक्टरने फर्मावले.

मार्था खिडकीकडे पळाली आणि तिने फक्त पोस्टमनला पाहिले, जो पत्र टाकून पुन्हा लांब निघून गेला होता. पण ह्या प्रसंगामुळे त्या त्रासदायक दरोडेखोरांपासून कशी सुटका करून घेता येईल ह्याबद्दल तिला एक कल्पना सुचली म्हणून तिने मोठ्या दुःखाने हातपाय झाडीत किंचाळी मारली.

“ते पोलिस आहेत!” अकल्पित धास्तीने दरोडेखोरांनी एकमेकांकडे बघितले, आणि लुगुईने थरथर कापत विचारले, “खूप आहेत का ते तेथे?”

“एकशे बारा!” मोजायचे ढोंग करीत राहिल्यानंतर मार्था उद्गारली.

“मग आम्ही संपलो!” बेनीने जाहीर केले. “कारण इतक्या खूप जणांशी आम्ही कधीही झुंज देऊ शकत नाही, आणि जिवंत राहू शकत नाही.”

“ते सशस्त्र आहेत?” व्हिक्टरने चौकशी केली, जणू काही थंडीने कापरे भरल्यागत तो थरथरत होता.

“ओ, होय.” ती म्हणाली. “त्यांच्याजवळ बंदुका, तलवारी आणि पिस्तुले आणि कुऱ्हाडी आहेत- आणि- आणि-”

“आणि काय?”

“आणि तोफा!”

ते तिघेही दुष्ट दुःखाने, मोठ्याने विव्हळले आणि बेनी ओढलेल्या आवाजात म्हणालाः “मला वाटतं ते आपले हाल हाल न करता आपल्याला ताबडतोब मारून टाकतील. मला असे सांगितले गेले आहे की जे रक्तपिपासू आणि भयंकर आहेत अशा अमेरिकन लोकांची चित्रे इंडियन लोकांनी रंगविली आहेत.”

“अगदी बरोबर!” कळून भीतीने कापत तो जाडा माणूस म्हणाला.

मार्था झटक्यात खिडकीपासून बाजूला झाली. “तुम्ही माझे मित्र आहात, आहात की नाही?” ती म्हणाली.

“आम्ही एकनिष्ठ आहोत!” व्हिक्टरने उत्तर दिले.

“आम्ही प्रेमयुक्त आदर करतो तुझा!” बेनी ओरडला.

“आम्ही जीवसुद्धा देऊ तुझ्यासाठी!” काहीही झालं तरी आपलं मरण अटळ आहे असा विचार करून लुगुई पुढे बोलला.

“मग मी तुम्हाला वाचवीन.” ती मुलगी म्हणाली.

“कसे?” त्या तिघांनी एकाच आवाजात विचारले.

“पेटाऱ्यात परत जा.” ती म्हणाली.

“मग मी झाकण बंद करीन जेणेकरून ते तुम्हाला शोधण्यात असमर्थ ठरतील.”

ते भांबावून आणि डळमळीत अवस्थेत खोलीत सर्वत्र पाहू लागले, पण ती उद्गारली, “तुम्हाला पटकन करायला हवे! ते लवकरच तुम्हाला पकडायला येथे येतील.”

नंतर लुगुईने पेटाऱ्यात पटकन उसळी मारली आणि तळाला सपाट होऊन पडला. त्याच्या नंतर बेनी त्यावर धडपडला आणि त्याने स्वतःला मागच्या बाजूस कोंबून घेतले. त्याच्या मागे जाताना व्हिक्टरने तिच्याकडे हात करून सफाईने तिच्या हाताचे चुंबन घेतले. मग मार्था झाकण खाली दाबण्यासाठी पळाली, पण ती ते व्यवस्थित दाबू शकत नव्हती.

“तुम्हाला खाली चेंगरून बसायलाच हवे.” ती त्यांना म्हणाली.

लुगुई कण्हला. “मी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे, कुमारी” सर्वात वरच्या बाजूला असलेला व्हिक्टर म्हणाला. “पण जरी आम्ही पूर्वी जसे अगदी व्यवस्थितपणे बसलो होतो तसे नाही, हा पेटारा आमच्यासाठी काहीसा छोटा झालेला दिसतो.”

“अगदी बरोबर!” तळाला असलेल्या जाड्या माणसाचा क्षीण आवाज आला.



ट्रंक बंद केल्या नंतर दरोडेखोरांना कोंडल्यावर

“मला ठाऊक आहे कशाने जागा घेतली ते,” बेनी म्हणाला.

“काय?” व्हिक्टरने चिंतातुरपणे चौकशी केली.

“त्या पाईने!” बेनी परत उत्तरला.

“अगदी बरोबर!” तळातून अस्पष्ट बोल आले.

नंतर मार्था त्या झाकणावर बसली आणि तिचं सर्व वजन तिने एकवटून ते खाली दाबले. तिला खूप आनंद झाला की कुलूप अडकले आणि तिने खाली उसळी मारली आणि सर्व बळ एकवटून किल्ली फिरविली.

***

ही गोष्ट आपल्याला असे शिकविते की ज्या विषयात आपला काही संबंध नाही, त्या गोष्टीत आपण नाक खुपसू नये. कारण मार्थाने वॉल्टर काकांचा रहस्यमय पेटारा उघडण्यापासून स्वतःला आवर घातला असता तर त्या दरोडेखोरांनी माळयावर चोरून आणलेल्या वस्तू तिला खाली आणण्याची गरजच पडली नसती.

* * * * *

# काचेचा कुत्रा

एकदा एक कुशल जादुगार एका भवनातील सर्वात वरच्या माळयावर राहत होता आणि काळजीपूर्वक आणि अध्ययनपूर्वक अभ्यासात त्याचा वेळ घालवीत असे. त्याला खूपच ज्ञान होते कारण त्याच्या पुढ्यात सर्व प्रकारच्या जादू कशा करायच्या ह्यावर सर्व पुस्तके होती, आणि ह्याखेरीज त्याने अनेक जादूटोण्यांचा शोध लावलेला होता.

हा अद्भुत माणूस पूर्णपणे आनंदित राहिला असता पण त्याच्या ह्या अभ्यासात लोकांकडून अडथळे निर्माण व्हायचे जे त्यांच्या त्रासाबद्दल त्याचा सल्ला घ्यायला यायचे (ज्याच्यामध्ये त्याला काही रूची नसे) आणि बर्फ विकणारा, दूधवाला, पाव विकणारा पोरगा, धोबी, शेंगदाणे विकणारी बाई हे त्याचा दरवाजा जोरजोरात ठोठवायचे. त्याने त्या लोकांशी कधीही व्यवहार केला नव्हता, पण ते दररोज त्याच्या दरवाजावर थाप मारायचे आणि त्याला त्यांच्या वस्तू ह्या किंवा त्या विकायचा प्रयत्न करायचे. जेव्हा तो त्याच्या पुस्तकात खूप गढलेला असायचा किंवा बुडबुडे येणाऱ्या भांड्याकडे लक्ष देत रहायचा तेव्हाच नेमकी त्याच्या दरवाजावर थाप यायची आणि त्या आगंतुकांना बाहेर हाकलल्यावर त्याला त्याच्या विचारांची साखळी तुटल्याचे आणि त्याचे रसायन बिघडल्याचे लक्षात यायचे.

सरतेशेवटी ह्या अडथळयांचा त्याला संताप आला आणि त्या लोकांना दूर ठेवण्यासाठी त्याने त्याच्या दरवाजाजवळ एक कुत्रा ठेवण्याचे ठरविले. कुत्रा कोठे मिळेल हे त्याला ठाऊक नव्हते, पण त्याच्या घराजवळ काचेच्या वस्तू बनविणारा एक गरीब माणूस राहत होता ज्याच्याशी त्याची थोडीशी ओळख होती; म्हणून तो त्या माणसाच्या घरी गेला आणि त्याने त्याला विचारले,




तो काचेचा कुत्रा सुंदर आणि गुलाबी रंगाचा होता.

“कुत्रा कोठे मिळेल का मला?”

“कोणत्या प्रकारचा कुत्रा?” त्या काचेच्या वस्तू बनविणाऱ्या माणसाने विचारले.

“एक कुत्रा, जो लोकांवर भुंकेल आणि त्यांना बाहेर हाकलून लावील. एक ज्याला ठेवण्यात काही त्रास होणार नाही आणि जो खाण्यापिण्याची अपेक्षा करणार नाही. असा एक ज्याच्या अंगावर पिसू नसतील आणि त्याला चांगली सवय असून तो नीटनेटका असेल. एक ज्याच्याशी मी बोलेन तेव्हा तो माझी आज्ञा पाळेल. थोडक्यात एक चांगला कुत्रा.” तो जादूगार म्हणाला.

“असा कुत्रा सापडणे कठीण आहे,” तो काचवाला म्हणाला. जो निळया रंगाच्या काचेची ज्यात गुलाबी रंगाच्या काचेची फुले होते ती फुलदाणी बनविण्यात गर्क होता. त्यात हिरव्या काचेची पाने आणि पिवळया काचेची गुलाबाची फुलेसुद्धा होती.

जादूगाराने त्याच्याकडे विचारपूर्वक पाहिले. “तुम्ही मला काचेचा कुत्रा का बनवून देऊ शकत नाही?” त्याने तत्क्षणी विचारले.

“मी करू शकतो,” काचवाल्याने अभिप्राय दिला; “पण तो लोकांवर भुंकणार नाही, तुम्हाला ठाऊक आहेच.”

“ओ, ती व्यवस्था मी सहजगत्या करीन.” तो म्हणाला. “जर मी काचेच्या कुत्र्याला भुंकायला लावू शकलो नाही तर मी अतिशय दुबळा जादूगार असेन.”

“ठीक आहे, जर तुम्ही काचेचा कुत्रा वापरू शकाल तर तुम्हाला काचेचा कुत्रा बनवून देण्यात मला आनंदच वाटेल. फक्त माझ्या कामाच्या मोबदल्यात मला तुम्ही दाम दिला पाहिजे.”

“निश्चितच,” जादूगार सहमत झाला. “पण माझ्याजवळ ते खत्रुड द्रव्य नाही ज्याला तुम्ही पैसा म्हणता. त्या बदल्यात तुम्ही माझ्याकडून माझ्या सामानातील काही वस्तू घ्यायला हव्यात.”

त्या काचवाल्याने क्षणभर विचार केला. “ज्याने माझा संधिवात बरा होऊ शकेल असे काहीतरी तुम्ही मला देऊ शकता का?” त्याने विचारले.

“ओ, होय. सहजगत्या.”

“मग झाला तर सौदा. मी ताबडतोब कुत्रा बनविण्याच्या तयारीला लागतो. कोणत्या रंगाची काच मी त्यासाठी वापरू?”

“गुलाबी रंग खूपच सुरेख आहे,” जादूगार म्हणाला. “आणि तो कुत्र्यासाठी आकर्षक आहे, नाही का?”

“अगदीच,” त्या काचवाल्याने उत्तर दिले. “पण तो गुलाबीच असेल,”

म्हणून तो जादूगार त्याच्या अभ्यासाकडे आणि काचवाला कुत्रा बनविण्याच्या कामाला सुरूवात करण्यासाठी निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो काखेत काचेचा कुत्रा घेऊन जादूगाराच्या खोलीत आला आणि त्याने तो काळजीपूर्वक टेबलावर ठेवला. तो सुंदर गुलाबी रंगाचा आणि कातलेल्या काचेचे- सुरेख आवरण दिलेला होता. आणि त्याच्या

गळयाभोवती निळया रंगाची काचेची रिबीन गुंडाळलेली होती. त्याच्या डोळयात काळया काचेचे ठिपके होते आणि अनेक लोक काचेचे डोळे घालतात व त्यांच्या डोळयात जशी बुद्धीमत्तेची चमक दिसते तशी त्याच्या डोळयात दिसत होती.

त्या जादूगाराने स्वतः त्या काचवाल्याचे कौशल्य बघून आनंद व्यक्त केला आणि तात्काळ त्याच्या हातात छोटीशी कुपी दिली. “हे तुझा संधिवात बरा करेल,” तो म्हणाला.

“पण ही कुपी तर रिकामी आहे!” तो काचवाला नापसंती दर्शवित म्हणाला.

“ओ नाही, त्यात एक थेंब द्रव आहे.” जादूगाराने उत्तर दिले.

“हा एक थेंब माझा संधिवात बरा करेल?” त्या काचवाल्याने आश्चर्याने चौकशी केली.

“अगदी निःसंशयपणे. तो अद्‌भुत इलाज आहे. ह्या कुपीत असलेला हा एक थेंब मानव जातीला ज्ञात असलेल्या कुठल्याही व्याधीवर तात्काळ उपाय करील. ह्या कारणाने हे विशेषतः संधिवातावर उत्तम आहे. पण त्याच्या सुरक्षिततेची सावधतेने चांगली काळजी घे, कारण ह्या जगातील अशा प्रकारचा हा एकमेव थेंब आहे आणि त्याचे बनविण्याचे शास्त्र मी विसरून गेलेलो आहे.”

“आभारी आहे तुमचा,” तो काचवाला म्हणाला आणि त्याच्या घरी परतला. नंतर त्या जादूगाराने त्या काचेच्या कुत्र्यावर अनेक मोहिनी मंत्र उच्चारून टाकले, ज्यानंतर त्या छोट्या प्राण्याने त्याची शेपटी इकडून तिकडे हलविली, नंतर अर्थपूर्णतेने डावा डोळा मिचकावला आणि शेवटी तो भयंकर रितीने भुंकायला लागला- तुम्ही विचारातच पडाल की हा आवाज गुलाबी काचेच्या कुत्र्यातून येत

आहे. जादूगाराच्या मोहिनी विद्येचा तो प्रायः विस्मयकारक प्रकार होता, नाहीतर खचितच तुम्ही स्वतः ह्या गोष्टी कशा कराल ह्यामुळे तुम्हाला आश्चर्य वाटणे अनपेक्षित असेल.

जादूगार जरी विस्मयचकित झाला नाही तरी त्याला आलेल्या त्याच्या ह्या जादूच्या यशामुळे एखाद्या शाळेच्या शिक्षकासारखा आनंद झाला. ताबडतोब त्याने त्या कुत्र्याला दाराच्या बाहेर ठेवले जेणेकरून तेथे तो भुंकेल आणि कुणीही दार ठोठविण्याचे धाडस करणार नाही आणि म्हणून त्याच्या मालकाच्या अभ्यासात व्यत्यय येणार नव्हता.

काचवाल्याने, त्याच्या घरी पोहोचल्यावर ठरविले की जादूगाराने दिलेल्या थेंबाचा उपयोग त्याच वेळी लगेच पूर्णतः बरे होण्यासाठी करायचा नाही. "माझा संधिवात आज उत्तम आहे," त्याने विचार केला. "आणि जोपर्यंत मी खूप आजारी पडत नाही तोपर्यंत हे औषध जपून ठेवायचे शहाणपणाचे ठरेल. जेव्हा खूप गरज पडेल तेव्हा त्याचा मला खूपच उपयोग होईल." म्हणून त्याने ती कुपी त्याच्या कपाटात ठेवली आणि तो काचेपासून अधिक गुलाब बनविण्याच्या कामाला निघून गेला. लवकरच त्याच्या मनात विचार आला की ते औषध ठेवायलाच नको, म्हणून तो त्या जादूगाराकडे त्याविषयी विचारायला निघाला. पण जेव्हा तो दरवाजाजवळ पोहोचला तेव्हा तो काचेचा कुत्रा ह्याच्यावर इतक्या भयानकतेने भुंकायला लागला की त्याला दरवाजा ठोठावण्याचे धाडसच झाले नाही, आणि तो खूप घाईने त्याच्या स्वतःच्या घरी परतला. खरोखर त्यानेच स्वतः काळजीपूर्वक आणि कौशल्याने बनविलेल्या कुत्र्याकडून त्याचे असे शत्रुत्वाने स्वागत व्हावे म्हणून तो गरीब माणूस पूर्णपणे अस्वस्थ झाला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा तो त्याचे वर्तमानपत्र वाचत होता तेव्हा त्याचे एका लेखाकडे लक्ष गेले. त्यात असा वृत्तांत होता की, सुंदर कुमारी मिडास,

शहरातील सर्वात सुंदर श्रीमंत तरूणी खूप आजारी होती आणि डॉक्टरांनी तिच्या रोगमुक्त होण्याची आशा सोडून दिली होती.

तो काचवाला जरी अतिशय दरिद्री होता, तरी तो खूप कष्टाळू होता आणि त्याचे भवितव्यही बेताचेच होते तरी पण तो बुद्धिमान होता. त्याला ताबडतोब त्याच्या पूर्वीच्या औषधाची आठवण झाली आणि त्याने ठरविले की त्याचा स्वतःचा आजार दूर करण्याऐवजी स्वतःचा फायदा करून घ्यावा. त्याने स्वतः खूप उत्तम कपडे घातले, केस विंचरले आणि कल्ले विंचरले, हात स्वच्छ धुतले आणि टाय घातला. बुटांना पॉलिश केले आणि जॅकेटच्या खालील कपडा स्वच्छ केला आणि जादूई औषधाची कुपी त्याच्या खिशात ठेवली. नंतर त्याने त्याच्या दरवाजाला कुलूप लावले आणि तो खाली गेला आणि रस्त्यांमधून चालत तो खूप मोठ्या इमारतीत गेला आणि जेथे अतिशय श्रीमंत कुमारी मिडास राहत होती तेथे गेला.

वाकनीसाने दरवाजा उघडला आणि म्हणाला, “साबण नको, पुस्तके नको, भाजीपाला नको, डोक्याला लावायचे तेल नको, बेकिंग पावडर नको. आमच्या तरूण बाईसाहेब मरायला टेकल्या आहेत आणि आम्हाला अंत्यविधीचे सर्व सामान पुरविले गेले आहे.”

आपल्याला फेरीवाला समजले गेल्याने काचवाल्याला खूप वाईट वाटले. “माझ्या मित्रा,” त्याने गर्वाने सुरूवात केली; परंतु वाकनीसाने त्याला मध्येच थांबवीत म्हटले, “थडग्यावरचा दगडही नको, कौटुंबिक स्मशानभूमी आहे. थडगे पण बांधले गेले आहे.”

“जर तुम्ही मला बोलायची परवानगी दिली तर स्मशानभूमीची काहीही गरज लागणार नाही,” काचवाला म्हणाला.

“डॉक्टर नको महाशय, डॉ.नी आमच्या तरूण बाईसाहेबांची आशा सोडली आणि तिने डॉ.ची.” त्या वाकनीसाने बोलणे शांतपणे चालू ठेवले.

“मी डॉक्टर नाही,” त्या काचवाल्याने प्रत्युत्तर दिले.

“दुसरे काही नाही, पण ही तुमची फेरी कशासाठी?”

“तुमच्या तरूण बाईसाहेब जादूच्या मिश्रणाने बऱ्या व्हाव्यात म्हणून मी मदतीसाठी आलो आहे.”

“आत या कृपया, आणि हॉलमध्ये बसा. मी कामवाल्या बाईशी बोलतो.” तो वाकनीस अधिक नम्रतेने म्हणाला. म्हणून तो काचवाला घरकामवाल्या बाईशी बोलला आणि घरकामवाल्या बाईने उपस्थापकाकडे त्या गोष्टीचा उल्लेख केला. उपस्थापकाने प्रमुख आचाऱ्याकडून सल्ला घेतला, प्रमुख आचाऱ्याने बाईसाहेबांच्या मोलकरणीच्या हाताचे चुंबन घेतले आणि त्या अनोळखी व्यक्तीला भेटायला पाठविले. अशा रितीने जरी ती मृत्यूपंथाला लागली होती तरी असे शिष्टाचारासह वैभवशाली कुंपण तेथे होते. जेव्हा त्या बाईसाहेबांच्या मोलकरणीने त्या काचवाल्याकडून ऐकले की त्याच्याजवळ असे औषध आहे की ते तिच्या मालकिणीला बरे करील तेव्हा ती म्हणाली, “मला आनंद झाला, या तुम्ही.”

“पण,” तो म्हणाला, “जर मी तुझ्या मालकिणीला पूर्ववत व्याधीरहित केले तर तिला माझ्याशी लग्न करावे लागेल.”

“मी तशी पृच्छा करीन, आणि बघते त्या राजी आहेत की नाही.” मोलकरणीने उत्तर दिले आणि ती ताबडतोब कुमारी मिडासचा विचार घेण्यासाठी गेली.

त्या तरूणीने क्षणभरही काचकुच केली नाही. “मरून जाण्यापेक्षा मी कुठल्याही जरठाशी लग्न करीन!” ती ओरडली. “आणा त्याला ताबडतोब येथे!”

तसा तो काचवाला आला, त्याने थोड्याशा पाण्यात तो जादूचा थेंब ओतला, तो रूग्णाला दिला आणि दुसऱ्याच मिनिटाला कुमारी मिडास जशी ती पूर्वायुष्यात होती तशी झाली.

“बाई गं!” ती उद्गारली. “आज रात्री फ्रिटर्सच्या समारंभात माझा वाङनिश्चय आहे. माझे मोत्याच्या रंगाचे रेशमी वस्त्र आण मेरी, आणि मी अंघोळीला आणि केस विंचरायला सुरूवात करीन लगेच. आणि अंत्यविधीच्या फुलांसाठी आणि तुझ्या शोकद्योतक अंगरख्याला दिलेली ऑर्डर रद्द करण्याचे विसरू नको.”

“पण, कुमारी मिडास!” तिच्या बाजूला उभ्या असलेल्या काचवाल्याने कडक विरोध करीत म्हटले, “जर मी तुम्हाला बरे केले तर तुम्ही माझ्याशी लग्न कराल असे तुम्ही मला वचन दिले होते.”

“मला ठाऊक आहे,” ती तरूणी म्हणाली. “पण आपल्या परिवारात योग्य अहवालात जाहीर निवेदन करण्यासाठी आणि आपल्या लग्नपत्रिका छापण्यासाठी वेळ हवा. उद्यापर्यंत थांबा आणि आपण त्यावर बोलू.”

तो काचवाला तिला नवरा म्हणून पसंत पडेल अशी छाप तिच्यावर पडली नाही, आणि काही काळापुरते तरी त्याच्यापासून सुटका करून घेण्याची सबब शोधण्यात तिला समाधान वाटले. आणि तिला फ्रिटर्सचा स्वागत समारंभ चुकवायचा नव्हता.

त्याचवेळी तो माणूस मोठ्या आनंदाने घरी गेला, कारण त्याची युक्ती सफल झाली होती. आणि आता तो एका श्रीमंत पत्नीशी विवाह करणार होता जी त्याला ह्यापुढे कायमचे ऐष आरामात ठेवणार होती.

पहिली गोष्ट त्याने कोणती केली असेल तर काच बनविण्याच्या सर्व सामानाचे तुकडे तुकडे करून त्यांना फेकून देणे. नंतर तो बसला आणि त्याच्या बायकोचा पैसा कसा खर्च करायचा ह्याची आकडेमोड करू लागला.

पुढच्याच दिवशी त्याने कुमारी मिडासला टेलीफोन केला, जी कादंबरी वाचत होती आणि मोठ्या आनंदाने चॉकलेट्स आणि मलई खात होती. जणू काही आयुष्यात ती कधीही आजारी पडली नव्हती.

“ते जादूई मिश्रण तुम्हाला कोठून मिळाले ज्याच्याने मी बरी झाले?” तिने विचारले.

“एका विद्वान जादूगाराकडून,” तो म्हणाला, आणि नंतर तिची उत्सुकता अधिक वाढावी, म्हणून त्याने त्या जादूगारासाठी काचेचा कुत्रा कसा बनवून दिला आणि त्याला त्रास देणाऱ्यांपासून त्यांना दूर ठेवण्यासाठी तो कसा भुंकू लागला हे सांगितले.

“किती भन्नाट!” ती म्हणाली. “भुंकू शकेल अशा काचेच्या कुत्र्याची मी नेहमीच इच्छा केली होती.”

“पण ह्या जगात तो फक्त एकमेव आहे,” त्याने उत्तर दिले. “आणि तो त्या जादूगाराच्या मालकीचा आहे.”

“तुम्ही तो माझ्यासाठी विकत घ्यायलाच हवा,” त्या बाईसाहेब म्हणाल्या.

“त्या जादूगाराला पैशांची फिकीर नाही.” तो काचवाला उत्तरला.

“मग तो तुम्ही माझ्यासाठी चोरून आणायला हवा,” तिने प्रत्युत्तर दिले. “तो भुंकणारा कुत्रा जोपर्यंत मला मिळत नाही तोपर्यंत एकही दिवस मी खूष राहू शकत नाही.”

तो काचवाला खूप खिन्न झाला, पण म्हणाला, बघूया त्याला काय करू शकता येईल ते. कारण माणूस हा त्याच्या पत्नीला नेहमी खूष ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो आणि कुमारी मिडासने त्याला आठवड्याच्या आत विवाह करण्याचे वचन दिले होते.

त्याच्या घरी जाताना त्याने रस्त्यात एक पोते विकत घेतले. आणि जेव्हा तो जादूगाराच्या दारावरून गेला आणि तो गुलाबी कुत्रा त्याच्यावर भुंकू लागला तेव्हा त्याने ते पोते त्याच्यावर फेकले, पोत्याचे तोंड दोरीच्या तुकड्याने बांधले आणि त्याच्या घरी घेऊन गेला.

दुसऱ्या दिवशी त्याने ते पोते निरोप्या मुलाबरोबर सदिच्छेसह कुमारी मिडासकडे पाठविले. तिच्या मोठ्या तीव्र इच्छेनुसार त्याने तिच्यासाठी चोरून आणलेल्या कुत्र्याबदद्ल तिची कृतज्ञता त्याला मिळेल असे वाटून त्याने तिला वैयक्तिक भेटण्यासाठी बोलाविले.

पण जेव्हा तो दरवाजाजवळ आला तेव्हा वाकनीसाने दरवाजा उघडला आणि काय आश्चर्य, त्याने पाहिले की त्या काचेच्या कुत्र्याने बाहेर झेप घेतली आणि बेफामपणे त्याच्यावर भुंकायला सुरूवात केली.

“तुमच्या कुत्र्याला आवरा!” तो भीतीने ओरडला.

“मी आवरू शकत नाही, महाशय,” वाकनीस उत्तरला. “जेव्हा तुम्ही येथे भेटायला याल तेव्हा तुमच्यावर भुंकण्यासाठी माझ्या तरूण बाईसाहेबांनी कुत्र्याला हुकूम सोडला आहे. तुम्ही स्वतःची काळजी घेणे उत्तम, महाशय.” तो पुढे म्हणाला. “कारण जर तुम्हाला तो चावला तर तुम्हाला काच-भयगंड होऊ शकतो!”

ह्यामुळे तो बिचारा काचवाला इतका घाबरला की तो घाईने तेथून निघून गेला. पण तो औषधाच्या दुकानाजवळ थांबला आणि त्याने कुत्र्याकडून चावून न घेता कुमारी मिडासशी टेलिफोनवर बोलण्यासाठी त्याच्याजवळचे अखेरचे दहा सेंटचे नाणे टाकले. “पेल्फ ६७४२ हा नंबर लावा!” त्याने हाक मारली.

“हॅलो! काय आहे?” तिकडून तो म्हणाला.

“मला कुमारी मिडासशी बोलायचे आहे.” काचवाला म्हणाला.

तात्काळ एक गोड आवाज आला. “मी कुमारी मिडास बोलतेय. काय आहे?”

“माझ्यावर तो काचेचा कुत्रा सोडून तू इतक्या क्रूरपणे मला वागणूक का दिलीस?” त्या गरीब बिचाऱ्या माणसाने विचारले.

“ठीक आहे. खरं सांगायचं म्हणजे,” त्या बाईसाहेब म्हणाल्या. “मला तुमचे कपडे आवडत नाहीत. तुमचे गाल निस्तेज आणि घळघळीत आहेत, तुमचे केस खरबरीत आणि लांब आहेत, तुमचे डोळे बारीक आणि लाल आहेत, तुमचे हात मोठे आणि खडबडीत आहेत आणि तुम्ही फेंगडे आहात.”

“पण मी माझ्या या व्यक्तिमत्त्वाबाबत काहीही करू शकत नाही!” काचवाल्याने बाजू मांडली, “आणि तुम्ही खरोखर माझ्याशी लग्न करायचे वचन दिले होते.”

“जर तुम्ही दिसायला उत्तम असता तर मी माझे वचन पाळले असते,” तिने त्याला दोष देत म्हटले. “पण ह्या परिस्थितीत तुम्ही माझे योग्य जोडीदार नव्हेत, आणि जर माझ्या हवेलीपासून तुम्ही लांब राहिला नाहीत तर मी माझा काचेचा कुत्रा तुमच्या अंगावर सोडेन!” नंतर तिने फोन ठेवला आणि ह्यापेक्षा अधिक बोलण्यासारखे तिच्याजवळ काहीही नव्हते.

तो दुर्दैवी काचवाला विदीर्ण अंतःकरणाने आणि निराशेने घरी गेला आणि पलंगाच्या खांबाला दोर बांधून फाशी घ्यायला लागला.

कुणीतरी दरवाजा ठोठावला, आणि तो उघडल्यावर त्याने जादूगाराला पाहिले. “माझा कुत्रा मी हरवला,” त्याने जाहीर केले.

“खरोखर हरवला तुम्ही तो?” तो काचवाला दोराला गाठ बांधीत उत्तरला.

“होय, कुणीतरी चोरला त्याला.”

“खूप वाईट झाले ते,” काचवाला ठामपणे बेपर्वाईने उत्तरला.

“तुम्ही माझ्यासाठी दुसरा बनवून द्यायला हवा,” तो जादूगार म्हणाला.

“पण मला ते शक्य नाही, मी काच बनविण्याचे सर्व साहित्य फेकून दिलेले आहे.”

“मग मी आता काय करू?” जादूगाराने विचारले.

“ठाऊक नाही मला, त्या कुत्र्याबद्दल मला जोपर्यंत तुम्ही बक्षीस देत नाहीत.”

“पण माझ्याजवळ पैसे नाहीत,” जादूगार म्हणाला.

“जादुई मिश्रणापैकी काहीतरी द्या मला मग,” तो दोरीचा फास बनवून डोक्यात घालण्याच्या तयारीत होता त्या काचवाल्याने सुचविले.

“फक्त एकच गोष्ट मी राखून ठेवू शकलो,” जादूगाराने विचारपूर्वक उत्तर दिले, “ती आहे सौंदर्य भुकटी.”

“काय?” काचवाला दोर फेकून ओरडला, “तुमच्याजवळ खरोखर अशी वस्तू आहे का?”

“होय, अगदी बरोबर, जो कोणी ती भुकटी घेईल तो जगातील सर्वात सुंदर व्यक्ती होणारच.”

“जर तुम्ही ते बक्षीस म्हणून मला द्याल तर,” तो काचवाला उत्कंठेने म्हणाला, “मी तुमचा कुत्रा शोधून आणेन, कारण सर्वात जास्त माझी तीव्र इच्छा असेल तर ती ही की सुंदर होणे.”

“पण मी तुम्हाला एक इशारा देतो की हे सौंदर्य फक्त वरवरचे असेल.” जादूगार म्हणाला.




“तुमच्या कुत्र्याला आवरा!”

"ते अगदी बरोबर आहे," तो काचवाला हर्षाने उत्तरला. "जेव्हा माझी त्वचा जाईल तेव्हा मी सुंदर असण्याची चिंता करणार नाही."

"मग सांगा मला कोठे सापडेल माझा कुत्रा आणि तुम्हाला ती भुकटी मिळेल." जादूगाराने वचन दिले.

तसा तो काचवाला बाहेर गेला आणि जवळपास शोधण्याचे ढोंग करून परतला आणि म्हणाला, "मला तुमच्या कुत्र्याचा शोध लागला. तुम्हाला तो कुमारी मिडासच्या हवेलीत सापडेल."

तो जादूगार ते खरे होते की नाही हे पडताळण्यासाठी तेथे गेला आणि खरोखर तो कुत्रा बाहेर धावत येऊन त्यावर भुंकू लागला. नंतर जादूगाराने त्याचे हात पसरले आणि जादूच्या मंत्राचा उच्चार केला ज्यामुळे कुत्रा गाढ झोपी गेला, तेव्हा त्याने त्याला उचलले आणि भवनाच्या उंच माळयावर असलेल्या त्याच्या घरी त्याला नेले.

त्यानंतर त्याने ती सौंदर्य भुकटी बक्षीस म्हणून काचवाल्याला देण्यासाठी आणली आणि त्या माणसाने ती पटकन गिळंकृत केली आणि तो जगातील सर्वात सुंदर माणूस बनला.

नंतर तो कुमारी मिडासकडे गेला आणि तिला भेटायला बोलाविले. त्यावेळी त्याच्यावर भुंकण्यासाठी कुत्रा नव्हता आणि जेव्हा त्या तरूण बाईसाहेबांनी त्याला पाहिले तेव्हा लगेचच ती त्याच्या सौंदर्याला मोहून त्याच्या प्रेमात पडली.

"जर तुम्ही सरदार किंवा राजकुमार असते तर," तिने निःश्वास सोडला. "तर मी स्वखुषीने तुमच्याशी लग्न केले असते."

“पण मी राजकुमार आहे,” त्याने उत्तर दिले. “काचेचा कुत्रा बनविणाऱ्यांचा राजकुमार.”

“ओह!” ती म्हणाली. “मग जर तुम्ही भत्ता म्हणून प्रत्येक हप्त्याला चार डॉलर्स स्वीकारले तर मी लग्नपत्रिका छापून तयार करण्यासाठी हुकूम सोडीन.”

त्या माणसाने काचकुच केली, पण जेव्हा त्याच्या पलंगाच्या खांबावर लटकत असलेल्या फासाच्या दोरीविषयी विचार केला तेव्हा त्याने त्या अटीला संमती दिली.

म्हणून त्यांनी विवाह केला, आणि नवऱ्या मुलीला तिच्या नवऱ्याच्या सौंदर्याबद्दल असूया वाटून तिने तिच्या नवऱ्याचे जिणे कुत्र्याचे जिणे करून टाकले. म्हणून त्याने कर्जात बुडण्याची योजना केली आणि बदल्यात तिला दुर्दैवी बनवून टाकले.

काचेच्या कुत्र्याविषयी म्हणायचे तर, जादूगाराने त्याच्या भुंकण्याचा उपयोग करून घेतला आणि त्याला दाराबाहेर ठेवले. मला असे वाटते की तो अजूनही तेथेच आहे. मला अजूनही वाईट वाटते कारण मला ह्या गोष्टीच्या तात्पर्याबद्दल त्या जादूगाराचा विचार घ्यावा.

# क्काऊकच्या राणीसाहेब

एकदा काय झाले, एक राजा मृत्यू पावला, जसे इतर राजे मृत्यू पावतात, इतर मर्त्य प्राणीमात्रांप्रमाणे तेही श्वासाच्या अल्पतेला पात्र असतात.

राजाने ऐहिक जीवनाचा त्याग केला, कारण तो दुर्दैवी उधळया पद्धतीने जगला होता, आणि त्याच्या प्रजेला अत्यल्प सोयींव्यतिरिक्त त्याने काहीच राखून ठेवले नव्हते. त्याचे वडील त्याच्यासाठी विपुल प्रमाणात वित्त आणि मणिरत्नांसह भरलेला खजिना सोडून गेले होते. पण नुकत्याच मृत झालेल्या त्या मूर्ख राजाने बेबंदपणे गलथान आयुष्य घालवीत पै न् पै उधळून टाकली होती. नंतर त्याने प्रजेवर ती कंगाल होईपर्यंत कर लादला, आणि ती संपत्तीसुद्धा त्याच्या उधळया राहणीमानाने नाहीशी झाली. पुढे त्याने लगोलग भव्य राजवाड्यातील उत्तम फर्निचर विकले, सोन्याचांदीची जेवणाची ताटे आणि किडूक मिडूक सुद्धा, सर्व किमती आणि भरजरी गालिचे आणि इतर सामग्रीसह त्याच्या राजघराण्याचे मोठे कपाटसुद्धा, त्याचे जीर्ण कपडे झाकण्यासाठी मळकटलेला, कसर लागलेला मृदू लवाचा पोषाख फक्त शिल्लक राहिला होता. आणि त्याने अधिकतर बेबंद जगण्यात पैसे उधळून टाकले. बेबंदपणे जगण्याचे माझ्याकडे स्पष्टीकरण मागू नका, मला फक्त एका वदंतेतून ठाऊक आहे की पैशांपासून सुटका करून घेण्याचा तो सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. आणि तो त्या उधळपट्टी करणाऱ्या राजाला सापडला होता.

आता त्याने राजमुकुटातील अत्युत्तम मणिरत्न आणि राजदंडावरील गोळा काढून विकला आणि सर्व पैसे उधळून टाकले, बेबंद जीवनात खचितच. पण आता शेवटी त्याच्या जवळची संपत्ती संपली होती. तो आता त्याचा राजमुकूट पण विकू शकत नव्हता कारण राजाशिवाय तो घालायचा कुणालाच अधिकार नव्हता,



बालराजा आणि मुख्य वकील.

ना तो राजघराण्याचा राजवाडा विकू शकत होता कारण फक्त राजालाच तेथे निवास करण्याचा अधिकार होता.

म्हणून त्याला स्वतःला वाईट दशा झालेला रिकामा राजवाडा आठळून आला. आता त्यात फक्त शिसवाचा लाकडी मंचक होता ज्यावर तो झोपायचा आणि एक स्टूल होते ज्यावर बसून तो त्याचे बूट आणि कसर लागलेले जीर्ण कपडे काढायचा.

अशा रितीने तो ह्या अवस्थेला पोहोचला की कधीमधी तो हॅम सँडविच विकत घेण्यासाठी त्याच्या मुख्य वकिलाकडून दहा सेंट घ्यायचा आणि त्या मुख्य वकिलाजवळ खूप काही दहा सेंट नसायचे. तो राजाला मूर्खपणे सल्ला द्यायचा आणि त्याच्या बरोबर स्वतःच्या भवितव्याचाही नाश करून घेतला.

म्हणून जगण्यासारखे काहीही न उरल्याने, खिळखिळे झालेले राज्य, कसर लागलेले घोळ आणि मणिरत्न काढून घेतलेला राजमुकूट आणि दहा वर्षांचा मुलगा वारस म्हणून सोडून अचानक मृत्यू पावला.

त्या मुलाचा कुणीही हेवा करीत नसे, ज्याने तो राजा होईपर्यंत आपण राजे आहोत असा क्वचितच विचार केला होता. नंतर तो एक महत्त्वाची महान व्यक्ती म्हणून ओळखला जाऊ लागला, आणि राज्याचे राजकारणी आणि खूषमस्करे ह्यांना मुख्य वकिलाने पुढे करून त्याच्यासाठी काय केले जाऊ शकते हे ठरविण्यासाठी एक बैठक बोलाविली.

त्या लोकांनी त्याचं गलथान जीवन जगण्यात मदत केलेली होती, आणि आता त्यांची सर्व संपत्ती संपली होती आणि ते आता दरिद्री झाले होते, आणि ते इतके गर्विष्ठ होते की ते कामही करीत नसत. म्हणून त्यांनी त्या छोट्या राजाच्या खजिन्यात अधिक संपत्ती यावी म्हणून एक योजना आखण्याचा प्रयत्न केला जी त्यांना सुटसुटीत वाटली.

बैठक संपल्यावर मुख्य वकील त्या बालराजाकडे आला जो आवारात भोवरा खेळत होता त्याला म्हणाला, “महाराज आम्ही राज्याचे पूर्वीचे सामर्थ्य आणि भव्यता पुनर्स्थापित करण्याचा विचार केलेला आहे.”

“ठीक आहे.” महाराजांनी निष्काळजीपणे उत्तर दिले. “कसं करणार ते?”

“तुमचा विवाह एखाद्या धनाढ्य बाईसाहेबांशी लावून देऊन.” वकिलाने उत्तर दिले.

“माझा विवाह करणार!” राजा ओरडला. “का, मी फक्त दहा वर्षांचा आहे!”

“मला ठाऊक आहे, त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. पण महाराज मोठे होतीलच, आणि राज्याचा कार्यभार अशी मागणी करतो की तुम्ही विवाह करायला हवा.”

“मी आईशी विवाह करू शकतो का, त्याऐवजी?” तो गरीब बिचारा लहान राजा म्हणाला ज्याची आई तो लहान असतानाच वारली होती.

“अजिबात नाही,” वकिलाने ठामपणे म्हटले. “आईशी लग्न करणे बेकायदेशीर होईल, पत्नीशी लग्न करणे योग्य आणि उचित आहे.”

“तुम्ही स्वतःच तिच्याशी लग्न करू शकत नाही का?” महाराजांनी वकिलाच्या पायाच्या बोटाकडे भोवऱ्याचा नेम धरला आणि त्यापासून वाचण्यासाठी वकील कशी उडी मारतो हे बघत आणि हसत चौकशी केली.

“मला स्पष्टीकरण करू द्या,” तो म्हणाला. “ह्या जगात तुमच्याकडे एक पै सुद्धा नाही, पण तुमच्याकडे राज्य आहे. तेथे अशा कितीतरी स्त्रिया आहेत की त्या त्यांच्या संपत्तीच्या बदल्यात राजमुकूट घ्यायला आनंदाने तयार होतील. जरी राजा लहान मुलगा असला तरी. म्हणून आम्ही अशी जाहिरात करायचे ठरविले आहे की जी कुणी सर्वात जास्त किंमत देईल ती क्वाऊकची सम्राज्ञी होईल.”

“जर कोणत्याही प्रकारे मला लग्न करणे भाग असेल तर,” राजा क्षणभर विचार केल्यानंतर म्हणाला, “मी शस्त्रकाराच्या मुलीशी नियानाशी लग्न करीन.” “ती खूप गरीब आहे,” वकिलाने उत्तर दिले.

“तिचे दात मोत्याचे आहेत, तिचे डोळे जांभळ्या रंगाचे मौल्यवान काचमणी आहेत आणि तिचे केस सोन्याचे आहेत,” छोट्या राजाने ठामपणे प्रतिज्ञापूर्वक म्हटले.

“खरे आहे महाराज, पण विचार करा की तुमच्या पत्नीच्या संपत्तीचा वापर केला गेला पाहिजे. तुम्ही जर तिचे मोत्याचे दात उपटले, तिचे जांभळ्या रंगाचे मौल्यवान काचमण्याचे डोळे उपटून काढले आणि तिच्या सोनेरी डोक्याची हजामत केली तर नियाना कशी दिसेल?”

मुलाला भीतीने कापरे भरले. “करा तुम्हाला काय करायचे ते,” तो निराशेने म्हणाला. “फक्त त्या बाईसाहेब शक्यतो सुंदर, नाजूक आणि खेळकर असायला हव्यात.”

“आम्ही आमच्या परीने सर्वोत्तम प्रयत्न करू,” मुख्य वकील उत्तरादाखल म्हणाला, आणि शेजारच्या राज्यात सगळीकडे त्या मुलासाठी क्वाऊकच्या

राजासाठी पत्नी हवी म्हणून जाहिरात देण्याकरिता निघून गेला. त्या लहान राजाशी लग्न करण्याचा हक्क मिळवण्यासाठी शक्यतो जास्त मोठी रक्कम राजाला मिळावी म्हणून त्याला लिलावात ठेवण्यात आले. म्हणून ठरलेल्या दिवशी बिलकन्, मूलग्रेव्हिया, जुनकूम आणि अधिकाधिक दूरवरच्या आजूबाजूच्या सर्व राज्यांमधून येऊन राजवाड्यात बायका जमा झाल्या.

मुख्य वकील सकाळी लवकर राजवाड्यात आला आणि त्याने राजाचे तोंड धुवून केस विंचरले, आणि नंतर राजमुकुटात जुनी वर्तमानपत्रे कोंबून महाराजांच्या डोक्यात व्यवस्थित बसेल असा लहान केला. तो राजमुकूट म्लान दिसत होता, त्यावर लहानमोठी छिद्रे होती, ज्यात एकेकाळी मणिरत्ने जडविलेली होती, आणि आजूबाजूने तो जोपर्यंत पूर्णपणे विस्कटलेला आणि काळवंडलेला होत नाही तोपर्यंत ठेचला गेलेला होता. तरीही तो वकील म्हणाला की तो राजाचा मुकूट होता आणि तो ह्या लिलावाच्या गंभीर प्रसंगी घालावा हे योग्य होते.

सर्व मुलांसारखे, किंवा दरिद्रीनारायण, महाराजांचे पोषाखाचे कापड फाटलेले व मळकट होते, तो कसाबसा सादर करण्याजोगा होता; आणि दुसरा नवा घेण्यासाठी त्यांच्याजवळ पैसे नव्हते. म्हणून वकिलाने राजाच्या अंगाभोवती लोकरीचे कापड गुंडाळले आणि प्रेक्षकांच्या रिकाम्या कक्षेत मध्यभागी स्टूलावर त्याला बसविले.

आणि त्याच्या सभोवती सर्व राजाच्या दरबारातील लोक आणि राजाचे राजकारणी, खुषमस्करे आणि जे आळशी आणि जीवनासाठीही काम न करणारे आळशी आणि गर्विष्ठ लोकांचाही त्यात समावेश होता. खूप होते ते, तुम्ही खात्री असू द्या. त्यांनी भव्य देखावा केला होता.

नंतर प्रेक्षागाराचे दरवाजे उघडले गेले आणि धनाढ्य स्त्रिया ज्यांना क्वाऊकची राणी बनण्याची महत्वाकांक्षा होती त्या घोळक्यांनी आत आल्या. राजाने त्यांच्याकडे खूप उद्विग्नतेने बघितले, आणि ठरविले की त्या प्रत्येकजणी त्याची आजी

होण्याच्या लायकीच्या वयोवृद्धा होत्या, आणि राजाच्या मक्याच्या शेतावरील कावळयांना भिवविण्यासाठीच्या बुजगावण्याएवढ्या कुरुप होत्या. ज्यानंतर त्यांच्यामध्ये त्याला काहीही वेधकता वाटली नाही.

पण त्या धनाढ्य स्त्रियांनी स्टूलावर पाय मुडपून बसलेल्या त्या छोट्या राजाकडे कधीच पाहिले नाही. त्या ताबडतोब मुख्य वकिलाभोवती गोळा झाल्या ज्याने लिलाव करण्याची भूमिका घेतली होती.

"क्वाऊकच्या राणीच्या मुकूटासाठी मला किती देऊ कराल?" मोठ्या आवाजात वकिलाने विचारले.

"कोठे आहे तो राजमुकूट?" बटबटीत पोषाख केलेल्या त्या धांदरट म्हातारीने विचारले जिने नुकतेच तिच्या नवव्या नवऱ्याला थडग्यात पुरले होते आणि त्यामुळे तिच्याजवळ कितीतरी दशलक्ष डॉलर्स होते.

"आता ह्यावेळी तो राजमुकूट येथे नाही," मुख्य वकिलाने स्पष्टीकरण दिले. "पण जो कुणी सर्वात जास्त किंमत सांगेल त्यालाच तो डोक्यावर घालायचा हक्क मिळेल, आणि नंतर ती तो विकत घेऊ शकेल."

"ओ," ती धांदरट म्हातारी म्हणाली, "असं आहे तर." नंतर ती पुढे म्हणाली, "मी चौदा डॉलर्स किंमत लावीन."

"चौदा हजार डॉलर्स! " तापट दिसणारी बाई ओरडली जी काटकुळी आणि उंच होती, आणि जिच्या पूर्ण त्वचेवर सुरकुत्या होत्या.- 'थंडीमुळे कोरड्या झालेल्या सफरचंदासारखी.' राजाने विचार केला.



जादुई थैलीतून पैसे मोजतो

बोली प्रचंड प्रमाणात डोंगरासारखी वाढली आणि लक्षावधी रूपयात रक्कम वाढल्याने दारिद्र्याने पिडलेले राजदरबाऱ्यांचे चेहरे उजळले.

"अखेरीस तो खूप सुरेख नशीब काढील," त्यांच्यापैकी एक साथीदार दुसऱ्याशी कुजबुजला; "आणि मग त्याला ते खर्च करण्यासाठी मदत करण्यात आपल्याला आनंदच होईल."

राजाला मोठी चिंता वाटू लागली.

दयाळू किंवा सौहार्द अंतःकरणाच्या सर्व स्त्रियांनी पैशाच्या कमतरतेमुळे लिलावाची बोली थांबवली, आणि सुरकुत्या असलेल्या कृश म्हाताऱ्या पुरंध्रीने तो राजमुकूट आणि नवरा मुलगा कुठल्याही किंमतीवर मिळवण्याचे निश्चित केले. ती जख्खड म्हातारी शेवटी इतकी चेकाळली की तिच्या डोक्यावरून तिचा केसांचा टोप खाली पडला आणि तिचे नकली दात बाहेर निसटले; ज्यामुळे छोटा राजा खूप भेदरून गेला, पण तरीही तिने तिचा हेका सोडला नाही.

शेवटी मुख्य वकिलाने ओरडून लिलाव संपल्याचे जाहीर केले.

"मेरी ऍन ब्रॉडजिन्स्काय डी ला पोरकुस ह्यांना एकोणचाळीस लाख सहाशे चोवीस डॉलर्स सोळा सेंट्स ना विकला गेला!" आणि त्याच वेळी त्या तापट दिसणाऱ्या स्त्रीने रोख रक्कम भरली, ज्यामुळे ही परीकथा आहे हे सिद्ध होते.

त्या विद्रूप प्राण्याशी लग्न लागणार ह्या विचाराने राजा इतका अस्वस्थ झाला की तो दुःखाने विलाप करू लागला आणि रडू लागला, ज्यानंतर त्या म्हातारीने त्याच्या कानामागे जोरात ठोसा मारला. पण तिच्या भावी नवऱ्याला लोकांमध्ये शिक्षा केल्याबद्दल वकिलाने तिची खरडपट्टी काढीत म्हटले,

“अजून त्याच्याशी लग्न झालेले नाही. उद्या लग्न होईपर्यंत थांबा. नंतर तुमच्या इच्छेप्रमाणे त्याला शिवीगाळ करा. पण आता तरी लोकांना हे प्रेमळ जोडपे आहे असे वाटू द्या, हे योग्य.”

त्या गरीब बिचाऱ्या राजाला त्याच्या भावी पत्नीची इतकी दहशत बसली होती की तो त्या रात्री झोपला खरा पण थोडा वेळच. त्याच्या डोक्यातून शस्त्रकाराच्या मुलीशी विवाह करण्याची कल्पनाही बाहेर जात नव्हती जी जवळजवळ त्याच्याच वयाची होती. खिडकीतून चंद्र दिसत नाही तोपर्यंत तो ह्या कुशीवरून त्या कुशीवर वळत होता आणि त्या कडक बिछान्यावर चंद्रप्रकाशाचा पांढऱ्या कापसासारखा चंद्रकिरणांचा तुकडा त्यावर पडेपर्यंत तो त्यावर धडपडत होता. शेवटी शंभराव्या वेळी तो वळला तेव्हा त्याचा हात शिसवी पलंगाच्या चौकटीत असलेल्या गुप्त स्प्रिंगला धडकला आणि लगेचच वरच्या स्वरात टिक् असा आवाज आला, आणि फळी वर उडून उघडली.

त्या आवाजामुळे राजाने वर पाहिले, फळी उघडल्यावर तो पायाच्या बोटांवर उभा राहिला आणि आत पोहोचल्यावर त्याने घडी केलेला कागद बाहेर काढला. त्याला पुस्तकासारखी अनेक पाने जोडलेली होती, आणि पहिल्या पानावर लिहिलेले होतेः

“अडचणीत असेल जेव्हा राजा

पानाची ह्या घडी करावी

आणि इच्छित मिळावयाला

ती पेटवूनी द्यावी.”

ही काही चांगली कविता नव्हती, पण जेव्हा राजाने ती चंद्रप्रकाशात वाचली तेव्हा त्याला खूप आनंद झाला.

“मी अडचणीत आहे ह्या बद्दल शंकाच नाही,” तो उद्गारला; “म्हणून मी तो लगेच जाळीन, आणि काय होते ते पाहीन.”

त्याने ते पान फाडून घेतले आणि उरलेले पुस्तक त्या गुप्त जागी ठेवून दिले. नंतर त्याने त्या कागदाची घडी केली, तो स्टूलावर ठेवला आणि आगकाडीने त्याला पेटविले.

कागद छोटा असल्याने त्याने भयंकर पेट घेतला, आणि राजा पलंगाच्या कडेवर बसून अधिरतेने बघू लागला.

जेव्हा तो धूर नाहीसा झाला तेव्हा त्याला हे पाहून आश्चर्य वाटले की त्या स्टूलावर एक गोलमटोल माणूस हाताची घडी घालून पाय दुमडून शांतपणे राजाकडे बघत वन्य गुलाबाच्या झाडापासून बनविलेल्या काऴया तंबाखूचा पाईप ओढत होता.

“ठीक, मी आहे येथे,” तो म्हणाला.

“असं का,” राजाने उत्तर दिले. “पण तुम्ही येथे कसे आलात?”

“तुम्ही कागद जाळला नाही का?” पृच्छा करीत त्या गोलमटोल माणसाने उत्तर दिले.

“होय, मी केले तसेच,” राजाने कबूल केले.

“मग तुम्ही अडचणीत आहात, आणि त्यातून बाहेर पडण्यास मी तुमची मदत करण्यासाठी आलो आहे. मी राजाच्या पलंगाच्या चौकटीचा नोकर आहे.”

"ओ!" राजा म्हणाला. " मला ठाऊक नव्हते असा कुणी एक आहे म्हणून."

"तुमच्या पिताजींनाही ठाऊक नव्हते, नाहीतर पैशांसाठी सर्वकाही विकून टाकण्याचा मूर्खपणा त्यांनी केला नसता. दुसरं असं की त्यांनी बिछान्याचा मंचक नाही विकला. आता, मग काय हवंय तुम्हाला?"

"मला काय हवंय हे मला निश्चितपणे सांगता येणार नाही." राजाने उत्तर दिले. "पण मला काय हवे हे मला ठाऊक आहे आणि ते म्हणजे ती म्हातारी जी माझ्याशी लग्न करणार आहे."

"ते खूप सोपं आहे," तो राजमंचकाचा गुलाम म्हणाला. सर्वात निकडीचे म्हणजे तिने मुख्य वकिलाला दिलेले पैसे परत करणे, आणि जाहीर करणे की जोडी रद्द झाली. घाबरू नका. तुम्ही राजे आहात, आणि तुमचा शब्द म्हणजे राजाज्ञा आहे."

"खात्रीने आहेच," महाराज म्हणाले. "पण मला पैशांची खूप निकड आहे. जर त्या मुख्य वकिलाने मेरी ऍन ब्रॉड जिनस्कीला तिचे लाखो परत केले तर मग मी जगू कसा?"

"उं! ते अगदी सोपं आहे." त्या माणसाने त्याचे हात त्याच्या खिशात घालून एक जुन्या पद्धतीची पैशांची चामड्याची थैली बाहेर काढून ती राजाकडे भिरकावत पुन्हा म्हटले. "ठेवा ही तुमच्याकडे," तो म्हणाला, "आणि तुम्ही नेहमीच श्रीमंत असाल, कारण तुम्ही तिच्यातून हवे तेवढे चांदीचे खूप खूप पंचवीस सेंट्स

काढू शकता पण एकावेळी एकच काढू शकता, तुम्ही कितीही वेळा काढले तरी हरकत नाही. दुसरे नाणे तात्काळ त्या पैशांच्या थैलीत प्रगट होईल.

"आभारी आहे," राजा कृतज्ञतेने म्हणाला. "तुम्ही मला अत्युत्तम मदत केलीत; कारण आता माझ्याजवळ सर्व गरजा भागवण्याइतके पैसे राहतील आणि मला कुणाशीही लग्न करायला भाग पडावे लागणार नाही. हजार वेळा आभार मानतो.!"

"छे छे, यात कसले आभार मानायचे," हळूहळू पाईपातून भपभप धूर सोडून चंद्रप्रकाशात त्या काढलेल्या धुराच्या वलयांकडे पाहून तो म्हणाला. "ह्या अशा गोष्टी माझ्यासाठी सोप्या आहेत. एवढंच फक्त तुम्हाला हवं होतं काय?"

"सध्यापुरता तरी मी एवढाच सर्व विचार करू शकतो." राजाने उत्तर दिले.

"मग पलंगाच्या चौकटीतील ही गुप्त फळी बंद करा." तो माणून म्हणाला, "त्या पुस्तकातील इतर पाने कधी तरी उपयोगाला येतील."

तो मुलगा पलंगावर पूर्वीप्रमाणे उभा राहिला आणि वर पोहोचून त्याने ती जागा फळीने बंद केली जेणेकरून कुणीही ती शोधू शकणार नाही. नंतर तो त्या अभ्यागताकडे वळला, पण तो राजाच्या मंचकाच्या चौकटीचा गुलाम गुप्त झालेला होता.

"माझी अपेक्षाच होती तशी," महाराज म्हणाले. "तरीपण माझा निरोप घेण्यासाठी तो थांबला नाही ह्याची मला खंत वाटते."

प्रफुल्ल चित्ताने आणि मोठ्या निश्चिंतपणे राजपुत्राने ती कातड्याची पैशांची थैली त्याच्या उशी खाली ठेवली आणि अंथरूणावर चढून जाऊन तो पुन्हा सकाळ होईपर्यंत गाढ झोपी गेला.

जेव्हा सूर्य उदयास आला तेव्हा महाराजही उठले, ताजेतवाने आणि स्वस्थ. आणि पहिली गोष्ट त्यांनी केली ती ही की मुख्य वकिलाला बोलावणे पाठवले.

ती महान महत्त्वाची व्यक्ती खिन्न आणि दुःखी दिसत होती, पण तो मुलगा त्याच्या उज्वल भवितव्याने परिपूर्ण होता. तो म्हणालाः

“मी आता कुणाशीही लग्न न करण्याचे ठरविले आहे, कारण आता माझं स्वतःचं नशीब उघडले आहे. म्हणून मी तुम्हाला अशी आज्ञा करतो की क्वाऊकच्या राणीचा मुकूट धारण करण्याचा हक्क मिळवण्यासाठी ज्या म्हातारीने पैसे दिले आहेत ते तिचे पैसे परत करा. आणि लोकांपुढे असे जाहीर करा की आता विवाह समारंभ होणार नाही.”

हे ऐकल्याबरोबर वकील थरथर कापू लागला, कारण त्याने पाहिले की लहानग्या राजाने आता निश्चयपूर्वक राजसत्ता हाती घेण्याचे ठरविले होते, आणि तो इतका अपराधी दिसत होता की महाराजांना चौकशी करावी लागली.

“ठीक! आता काय झाले?”

“राजन्,” त्या दुर्दैवी माणसाने कापऱ्या आवाजात उत्तर दिले, “मी त्या बाईला ते पैसे परत करू शकत नाही, कारण ते माझ्याकडून हरवले आहेत!”

“हरवले ते?” राजा क्रोध आणि आश्चर्य मिश्रित आवाजात ओरडला. “अगदी बरोबर महाराज. काल रात्री लिलावानंतर मोठ्याने बोलल्यामुळे माझा

घसा बसला होता व कोरडा पडला होता म्हणून मी औषधांच्या दुकानात सर्निका वड्या घेण्यासाठी गेलो; आणि महाराज हे मान्य करतील की मी किती महत्प्रयासाने त्या बाईला मोठी किंमत देण्यासाठी प्रवृत्त केले होते. ठीक, मी निष्काळजीपणे ते पैशांचे पुडके घोडागाडीतील माझ्या आसनाखाली तसेच टाकून दिले होते आणि जेव्हा मी परत आलो तेव्हा ते गायब झालेले होते. चोर सुद्धा कोठेही दृष्टीस पडला नाही."

"तुम्ही पोलिसाला बोलाविले का?" राजाने विचारले.

"होय, मी बोलविले, पण ते दुसऱ्याच कामात होते; आणि जरी त्यांनी लुटारूंना शोधण्याचे आश्वासन दिले होते तरी त्यांना तो सापडेल ह्याची मला खूप कमी आशा वाटते."

राजाने निःश्वास सोडला.

"काय करूया आता आपण ?" त्याने विचारले.

"मला भीती वाटते, तुम्हाला मेरी ऍन ब्रॉडजिन्सशी लग्न करावेच लागेल," मुख्य वकिलाने उत्तर दिले. "नाहीतर निश्चितच फाशी देणाऱ्याला तुम्ही तिचे डोके उडवून टाकण्याचा हुकूम सोडा."

" ते चुकीचे होईल," राजा ठामपणे म्हणाला. "त्या बाईला इजा करता कामा नये. आणि ह्याच क्षणी आपण तिचे पैसे परत करू. कारण कोणत्याही परिस्थितीत मी तिच्याशी विवाह करणार नाही."

"तेच का तुमचे रहस्यमय भाग्य जे तिला तिचे पैसे पुरेपूर परत करू शकेल?"

“का, होय,” राजा विचारपूर्वक म्हणाला. “पण त्याला काहीसा वेळ लागेल आणि तुमचं ते कठीण काम असेल, बोलवा त्या बाईला येथे.”

वकील मेरी ऍनला शोधायला गेला. तिने जेव्हा ऐकले की ती राणी बनणार नव्हती तर तिचे पैसे तिला परत मिळणार होते, तेव्हा ती क्रोधाने उसळली आणि तिने वकिलाच्या कानफटीत इतक्या क्रूरपणे मारले की ते त्याला तासभर झोंबले. पण ती त्याच्या मागोमाग राजाच्या प्रेक्षागृहात गेली जेथे तिने मोठ्या आवाजात रात्रभराच्या व्याजासह हक्काने रक्कम परत करण्याचा तगादा लावला.

“वरिलाने तुमचे पैसे हरवून टाकले आहेत,” तो राजपुत्र म्हणाला. “पण ते माझ्या स्वतःच्या रहस्यमय पैशांच्या पिशवीतून पै न् पै परत करतील. पण मला भीती वाटते, तथापि ते, तुम्हाला छोट्आ सुट्या पैशात स्वीकारावे लागतील.”

“त्याची काही हरकत नाही,” ती वकिलाकडे जळजळीत नजर टाकून म्हणाली जणू काही ती पुन्हा त्याच्या कानाजवळ पोहोचणार होती. “कितीही लहान मोड असली तरी मला त्याचा काही फरक पडत नाही. मला फक्त माझी प्रत्येक पै न् पै व्याजासह परत मिळावी एवढीच माझी इच्छा आहे. कोठे आहेत ते?”

“ही घ्या,” राजाने चामड्याची पैशांची थैली वकिलाच्या हातात देत म्हटले. “तीत सर्व चांदीचे चतुर्थ भागात डॉलर्स आहेत, आणि ते त्या पिशवीतून प्रत्येक वेळी एकच काढावा लागेल, पण तुमच्या मागणीप्रमाणे तुम्हाला द्यायला त्यात पुष्कळसे किंबहुना अधिक असतील.”

तेथे खुर्च्या नसल्याकारणाने वकीलसाहेब एका कोपऱ्यात जमिनीवर बसले आणि त्यांनी त्या पिशवीतून पंचवीस सेंट्सची एकामागून एक नाणी काढून

मोजायला सुरूवात केली. आणि ती म्हातारी त्याच्या समोर जमिनीवर बसली आणि त्याच्या हातातून प्रत्येक नाणे घेऊ लागली.

ती खूप रक्कम होतीः तीन दशलक्ष नऊ लाख सहाशे चोवीस डॉलर्स आणि सोळा सेंट्स. आणि चार वेळा ते पंचवीस सेंट्स काढले तेव्हा तो एक डॉलर व्हायचा. अशा रितीने ती रक्कम जमू लागली. राजाने त्यांना तेथेच बसलेले सोडले आणि ते शाळेत गेला, आणि तेथून परतल्यावर नेहमीच वकिलाच्या कामात अडथळे आणत आणि राज्यकारभार व्यवस्थित आणि प्रतिष्ठितपणे चालविण्यास पैसे खर्च करण्यासाठी मागत असे. ह्यामुळे पैसे मोजण्यात काहीसा विलंब लागत असे. पण हे दीर्घ काम होते त्याला इलाज नव्हता.

राजा प्रौढावस्थेत आला आणि त्याने शस्त्रागाराच्या अधिकाऱ्याच्या सुंदर मुलीशी लग्न केले आणि आता त्यांना त्यांची दोन लोभस मुले झाली होती. आणि कधीकधी ते राजवाड्याच्या प्रेक्षागारात जात आणि त्या लहानग्यांना पांढऱ्या डोक्याच्या वकिलाला चांदीचे पाव डॉलर्स मोजताना आणि तो तिला फसवत तर नाही ना म्हणून त्याच्या हालचालींकडे टक लावून पाहणाऱ्या जख्खड म्हातारीकडे बघू देत.

तीन दशलक्ष नऊ लाख सहाशे चोवीस डॉलर्स आणि सोळा सेंट्स ही पाव डॉलर्सच्या नाण्यांमध्ये खूप मोठी रक्कम होती. पण ही त्या म्हातारीच्या पैशांबाबत वकिलाने केलेल्या निष्काळजीपाणाची त्याला शिक्षा होती आणि तसेच मेरी ऍन ब्रॉडजिन्स्की डी ला पोरकुस ला सुद्धा तिने क्वाऊकच्या राणीचा मुकूट मिळवण्यासाठी दहा वर्षांच्या राजाशी लग्न करण्याच्या इच्छेबद्दलची शिक्षा मिळाली होती.

* * * * *

# मुलगी, जिची अस्वलावर मालकी होती

मम्मा व्यापारपेठेत काही विकत घ्यायला गेली होती. नोराला जेन ग्लॅडीजची काळजी घ्यायला सांगितले गेले होते, आणि नोराने ती तसे करेल असे वचन दिले होते. पण तिची दुपार चांदीला चकचकीत करण्याची होती म्हणून वरच्या माळ्यावर मोठ्या बैठकीत जेन ग्लॅडीजला एकटीला मनोरंजन करायला सोडून ती फराळाच्या खोलीत थांबली.

त्या इवल्याशा पोरीला एकटे राहण्यात काहीच त्रास वाटत नव्हता. कारण भरतकामाच्या एका तुकड्यावर ती काम करीत होती- ती होती पप्पांच्या वाढदिवसाला देण्यासाठीची- मंचकावरची उशी. म्हणून ती भिंतीच्या बाहेर आलेल्या मोठ्या खिडकीत स्वतःचे पाय मुडपून खिडकीच्या रूंद कट्ट्यावर आली आणि तिने तिचे तपकीरी डोके तिच्या कामावर वाकविले. तेवढ्यात दरवाजा उघडला आणि हळूच पुन्हा बंद झाला. जेन ग्लॅडीजने विचार केला की ती नोरा असेल म्हणून तिने ‘फरगेट मी-नॉट’वरील टाक्यांच्या अधिक जोड्या घेत नाही तोपर्यंत वर बघितले नाही. नंतर तिने वर बघितले आणि तिला खोलीच्या मध्यभागी एक विचित्र माणूस तिच्याकडे आस्थेने बघत असलेला पाहून तिला खूप आश्चर्य वाटले.

तो बुटका आणि जाड होता. आणि जिना चढून आल्यामुळे त्याला धाप लागली होती. त्याच्या एका हातात जुनी रेशमी हॅट होती आणि दुसऱ्या हाताच्या कोपरात एक मोठे पुस्तक कोंबलेले होते. त्याने काळे जॅकीट आणि पॅंट घातलेली होती जे खूप जुने व काहीसे कळकटलेले दिसत होते आणि त्याच्या डोक्याला वरच्या बाजूस टक्कल पडलेले होते.



“ते एक रहस्य आहे,” तो गुढपणे म्हणाला.

“माफ करा मला,” तो म्हणाला, जेव्हा ती मुलगी त्याच्याकडे गांभीर्यपूर्ण आश्चर्याने एकटक बघत होती. “आपण जेन ग्लॅडीज ब्राऊन आहात का?”

“होय, सर,” तिने उत्तर दिले.

“खूप छान, खरोखर खूपच छान!” त्याने विचित्र प्रकारे हसत उल्लेख केला. “तुम्हाला शोधण्यासाठी मला खूप कसून शोध घ्यावा लागला आहे, पण शेवटी मला यश आले.”

“तुम्ही आत कसे आलात?” अभ्यागताबाबत अविश्वास वाढत असताना जेन ग्लॅडीजने चौकशी केली.

“ते एक रहस्य आहे,” तो गूढपणे म्हणाला.

त्या मुलीला इशारा देण्यास ते पुरेसे होते. तिने त्या माणसाकडे पाहिले आणि त्या माणसाने तिच्याकडे पाहिले, आणि दोघेही गंभीर आणि काहीसे चिंताक्रांत दिसू लागले.

“काय हवंय तुम्हाला?” प्रतिष्ठितपणाचा आव आणीत आणि स्वतःला सावरीत ती म्हणाली.

“ओह! आता आपण व्यवहाराकडे वळत आहोत,” तो माणूस उत्साहाने म्हणाला. “मी आता तुमच्याशी स्पष्टपणेच बोलणार आहे. ह्या बरोबर सुरूवात करतो की, तुमच्या वडिलांनी असभ्यपणे मला शिवीगाळ केले.”

जेन ग्लॅडीज खिडकीच्या कट्ट्यावरून ताडकन उठली आणि तिच्या लहानशा बोटाने तिने दरवाजाकडे अंगुलीनिर्देश केला. “ताबडतोब निघा या

खोलीतून!” ती ओरडली. संतापाने तिचा आवाज थरथरत होता. “माझे पप्पा जगातले सर्वात चांगले गृहस्थ आहेत. त्यांनी कधीच कुणाला शिवीगाळ केली नाही!”

“मला स्पष्टीकरण करण्याची परवानगी द्या कृपया,” तिच्या निघून जाण्यासंबंधीच्या विनंतीकडे दुर्लक्ष करून तो अभ्यागत म्हणाला. “तुझे वडील तुझ्या बाबतीत खूप प्रेमळ असतीलही कारण तू त्यांची छोटी मुलगी आहेस, ठाऊक आहे तुला. पण जेव्हा ते बाजारपेठेत त्यांच्या कार्यालयात होते तेव्हा ते किंचित कठोर होते, विशेषतः पुस्तकांच्या प्रतिनिधींशी. आता मी त्यांना दुसऱ्या दिवशी विनंती करीत समग्र पीटर विकत घ्यायला सांगितले, आणि त्यांनी काय केले असेल असे तुम्हाला वाटते?”

ती काहीच बोलली नाही.

“का,” संताप वाढवीत तो पुढे म्हणाला, त्यांनी कार्यालयातून हुकूम सोडला आणि रक्षकाकरवी मला अपमानित करून इमारतीबाहेर हाकलून दिले! जगातील सर्वात उत्तम पप्पांनी अशी वागणूक दिल्याबद्दल काय वाटते तुम्हाला? अं?

“मला वाटतं ते अगदी बरोबर होतं.” जेन ग्लॅडीज म्हणाली. “ओ, तुला असं वाटतं? ठीक,” तो माणूस म्हणाला. “मी ह्या अपमानाबद्दल सूड घ्यायचा निर्धार केला आहे. तुझे वडील मोठे आणि शक्तीशाली आणि धोकादायक आहेत म्हणून त्यांच्या लहान मुलीवर हा सूड घेण्याचे ठरविले आहे.”

जेन ग्लॅडीजचा भीतीने थरकाप उडाला. “काय करणार आहात तुम्ही?” तिने पृच्छा केली.

“मी तुला हे पुस्तक भेट म्हणून देणार आहे,” काखेतून पुस्तक काढीत त्याने उत्तर दिले. नंतर तो खुर्चीच्या कडेवर बसला, त्याने त्याची हॅट छोट्या गालीच्यावर ठेवली आणि जाकीटाच्या आतल्या खिशातून फाऊंटन पेन काढला. “मी त्यात तुझे नाव लिहिन,” तो म्हणाला. “कसे स्पेलिंग लिहितेस ग्लॅडिजचे?”

“जी- एल-ए- डी- वाय- एस,” तिने स्पेलिंग सांगितले.

“आभारी आहे.” उभे राहून तिच्या हातात पुस्तक देत तो पुढे म्हणाला, “माझ्याशी वागण्याबद्दलचा तुझ्या वडिलांवरील हा माझा सूड. कदाचित समग्र पीटर स्मिथ विकत न घेतल्याबद्दल त्यांना वाईट वाटेल. बराय, येतो मी बेटा.”

तो दरवाजाकडे चालत गेला, त्याने पुन्हा वाकून तिला नमस्कार केला, आणि खोली सोडली, आणि जेन ग्लॅडीज तो स्वतःशीच खूप मजेत असलेला पाहू शकली.

जेव्हा त्या विचित्र छोट्या माणसामागे दरवाजा बंद झाला तेव्हा ती मुलगी पुन्हा खिडकीत बसली आणि तिने त्या पुस्तकाकडे एक दृष्टिक्षेप टाकला. त्याचे मुखपृष्ठ तांबडे आणि पिवळे होते आणि पुढच्या बाजूला ‘थिंगा माजिगस्’ असे मोठ्या अक्षरात लिहिलेले होते.

नंतर तिने ते उत्सुकतेने उघडले आणि पहिल्या पांढऱ्या पानावर काळ्या अक्षरात तिचे नाव लिहिलेले पाहिले.

"तो एक गमतीदार छोटा माणूस होता," ती स्वतःशीच विचारपूर्वक म्हणाली.

तिने दुसरे पान उघडले, आणि तिने विदूषकाचे चित्र पाहिले. त्याने लाल आणि पिवळे कपडे घातलेले होते आणि त्याचा चेहरा सफेद असून प्रत्येक गालावर आणि डोळयांवर तीन कोपरे असलेले लाल डाग होते.

ती जेव्हा हे बघत होती तेव्हा तिच्या हातातील पुस्तक हातातच कंप पावू लागले, आणि पान कडकडले आणि करकरले आणि एकाएकी एका विदुषकाने बाहेर उडी मारली आणि तो तिच्या शेजारी जमिनीवर उभा राहिला, ताबडतोब तो एका सर्वसामान्य विदुषकासारखा मोठा बनला.

हात आणि पाय ताठ करीत तो काहीसा असभ्यपणे जांभया देत वेडेपणाने हसला आणि म्हणाला,

"हे उत्तम आहे! तुम्हाला ठाऊक नाही सपाट कागदावर दीर्घकाळ उभे राहिल्यावर एखाद्याच्या स्नायूंवर किती ताण पडतो ते."

पुस्तकातून उडी मारून बाहेर आलेल्या विदुषकाकडे जेन ग्लॅडीज टक लावून बघत होती आणि तिला कसा आश्चर्याचा धक्का बसला असेल ह्याची तुम्ही कदाचित कल्पना करू शकाल.

"तुम्ही अशा कुठल्याही प्रकारची अपेक्षा केली नसेल, नाही का?" विचित्र विदुषकी पद्धतीच्या वाकड्या नजरेने तिच्याकडे पाहत त्याने विचारले. नंतर तो खोलीत नजर टाकण्यासाठी सभोवती फिरला, आणि विस्मयचकित झालेली असूनही जेन ग्लॅडीजला हसू आले.

"काय गंमत वाटली तुला?" विदुषकाने फर्मावले.

"का, तुमची पाठ संपूर्ण पांढरी आहे!" ती मुलगी ओरडली. "तुम्ही फक्त पुढूनच विदूषक आहात."

"अगदी बहुतकरून," चिडक्या सुरात तो म्हणाला. "कलाकाराने माझा फक्त दर्शनी भागच बनविला. त्याला माझी पाठ बनविण्याचे अपेक्षितच नव्हते, कारण पुस्तकाच्या पानाच्या विरूद्ध बाजूस ती होती."

"पण त्यामुळे तुम्ही खूपच विचित्र दिसता!" जेन ग्लॅडिज तिचे डोळे अश्रूंनी ओलसर होईपर्यंत हसत म्हणाली.

विदूषक खट्टू झालेला दिसला आणि तो खुर्चीवर बसला जेणेकरून ती त्याची पाठ पाहू शकत नव्हती.

"मी एकटी गोष्ट नाही पुस्तकात," त्याने रागाने शेरा मारला. ह्यामुळे तिला दुसरे पान उघडण्याची आठवण झाली तेव्हा तो प्राणी मोठ्याने कागदाचा चोळामोळा करीत पुस्तकातून उडी मारून बाहेर आला आणि खिडकीजवळच्या आसनावर तिच्या जवळ बसला तेव्हा कसे बसे तिच्या लक्षात आले की त्यात माकडाच्या चित्राचाही समावेश होता.

"ही-ही-ही-ही-ही!" ची ची करीत त्या प्राण्याने त्या मुलीच्या खांद्याकडे आणि नंतर मध्यभागी असलेल्या टेबलाकडे उडी मारली. "ही मोठी गंमत आहे! आता मी चित्रातील माकडाऐवजी खरेखुरे माकड आहे."

"खरेखुरे माकडे बोलू शकत नाही," जेन ग्लॅडिज वात्ताडन करीत म्हणाली.

“तुला कसं ठाऊक? तू स्वतःच तशी कधी होती का?” त्या प्राण्याने चौकशी केली; आणि नंतर तो जोरजोरात हसला आणि विदूषकही हसला, जणू काही त्याच्या शेऱ्याबद्दल त्याला मजा वाटली होती.

ह्या वेळेला ती मुलगी पूर्णपणे गोंधळली होती. तिने अजून एक पान उघडले आणि ते दुसऱ्यांदा पाहण्यापूर्वी एक करड्या रंगाचे गाढव त्या पुस्तकातून उडी मारून बाहेर आले आणि खिडकीच्या आसनावरून मोठा खडखड आवाज करीत जमिनीवर धडपडले.

“तू खूप बेढब आणि वेंधळा आहेस, मला खात्री आहे!” ती मुलगी संतापाने म्हणाली कारण तो प्राणी जवळजवळ तिला कोलमडून पाडणार होता.

“बेढब! आणि का नाही?” गाढवाने कोपिष्ठ आवाजात फर्मावले. “जर एखाद्या मूर्ख कलाकाराने तुमचे अयोग्य रेखाटन केले असते, जसे माझे केले आहे, तर माझ्या अंदाजाने तूसुद्धा बेढब झाली असतीस.”

“काय झालं तुला?” जेन ग्लॅडिजने विचारले.

“माझे डाव्या बाजूचे पुढचे आणि मागचे पाय जवळजवळ सहा इंचांनी अधिक तोकडे आहेत, तीच ती भानगड आहे! जर त्या कलाकाराला योग्यतेने रेखाटन करण्याचे माहित नव्हते तर त्याने गाढवाचे चित्र काढायचा इतका तरी प्रयत्न का करावा?”

“मला नाही माहित,” त्याला उत्तर अपेक्षित होते हे पाहून ती मुलगी म्हणाली. “मी कसाबसा उभा राहू शकतो,” गाढवाने कुरकुर केली.

“आणि एवढी छोटी गोष्ट मला पाडून टाकेल.”

“काही काळजी करू नकोस त्याची,” आणि झुंबराकडे उडी मारून त्याला शेपटी गुंडाळून झोका घेत माकड म्हणाले, तेव्हा तो त्यातील सर्व दिवे फोडणार की काय म्हणून जेन ग्लॅडिजला भीती वाटली.

“त्याच कलाकाराने माझे कान मोठे बनविले, प्रत्येकाला ठाऊक आहे की माकडाचे कान मोठे नसतात व ते खूप लहान रेखाटायचा कुणीही उल्लेख केला नाही.”

“त्याच्यावर कोर्टात खटला भरायला हवा,” विषण्णतेने विदूषकाने शेरा मारला. “मला पाठच नाही.”

जेन ग्लॅडिजने तिच्या गोड चेहऱ्यावरच्या गोंधळलेल्या भावानिशी एक दुसऱ्याकडे बघितले, आणि तिने पुस्तकाचे आणखी एक पान उघडले.

पिवळे तपकिरी ठिपके असलेल्या चित्त्याने चामड्याच्या मोठ्या आरामखुर्चीच्या मागे विजेच्या चपळाईने उडी मारली आणि भयंकर हालचाली करीत दुसऱ्यांकडे पाहिले.

त्या माकडाने झुंबराच्या माथ्यावर चढून ची ची केले. गाढवाने पळायचा प्रयत्न केल्याबरोबर तो डाव्या बाजूला कलंडला. विदूषक खूपच निस्तेज झाला, पण तो त्याच्या खुर्चीवर स्तब्धपणे बसला आणि त्याने आश्चर्याची शीळ घातली.

चित्ता खुर्चीच्या पाठीवर दबा धरून बसला, त्याने त्याची शेपटी ह्या बाजूकडून त्या बाजूकडे जोरात हलविली- आणि जेन ग्लॅडिजसह सर्वांकडे गुरकावून बघितले.

"सर्वात आधी तू कुणावर हल्ला चढविणार आहेस?" त्याच्या पायावर उभं राहण्याचा प्रयत्न करीत गाढव म्हणाले.

"मी कुणावरच हल्ला चढवू शकत नाही." चित्ता गुरगुरला. "चित्रकाराने माझे तोंड मिटविलेलेच बनविले, म्हणून मला दातच नाहीत, आणि तो माझी नखेही बनवायची विसरला. पण असे असूनही मी भयंकर दिसणारा प्राणी आहे; नाही का मी?"

"ओ, होय," विदूषक बेपर्वाईने म्हणाला. "मला वाटतं तसा भयंकर दिसणारा आहेसच तू. पण तुला ना दात ना नखे, त्यामुळे तुझ्या दिसण्याबद्दल आम्हाला काही फरक पडत नाही." ह्याचा त्या चित्त्याला इतका राग आला की तो भयंकररित्या गुरगुरला, आणि माकड त्याला हसले.

त्या नंतरच्याच क्षणी त्या मुलीच्या मांडीवरून ते पुस्तक खाली पडले, आणि जसे तिने ते झेलण्यासाठी हालचाल केली तसे त्या पुस्तकातील मागच्या बाजूच्या जवळचे एक पान सताड उघडे पडले.

तिला झटकन पुस्तकाच्या पानातील एक भयंकर थरकाप करून सोडणाऱ्या अस्वलाचे ओझरते दर्शन घडले आणि त्या बरोबर तिने ते पुस्तक ताबडतोब फेकून दिले. ते कडकडाट होऊन खोलीच्या मध्यभागी कोसळले, पण त्याच्या बाजूला एक खूप मोठे थरकाप उडवणारे अस्वल उभे राहिले ज्याने पुस्तक बंद होण्याच्या आत बाहेर येण्यासाठी स्वतःला हिसडा दिला होता.

"आता," चित्ता त्याच्या उंच जागेवरून ओरडला. "तुम्ही स्वतः सावध राहणं अधिक उत्तम! तुम्ही जसे माझ्याकडे पाहून हसलात तसे त्याच्याकडे पाहून हसू शकत नाहीत. ह्या अस्वलाला दात आणि नखे दोन्ही आहेत."

“खरोखर आहेत मला,” अस्वल खोल, गंभीर आवाजात म्हणाले. “आणि त्यांचा वापर कसा करायचा हे सुद्धा मला ठाऊक आहे. तुम्ही जर हे पुस्तक वाचले तर तुम्हाला आढळून येईल की मला किती भयंकर, क्रूर, निर्दयी आणि थरकाप उडवून देणारा असे रेखाटले आहे ते, ज्याचे जीवनातले काम म्हणजे लहान मुलींना-बुटांना, कपड्यांना, रिबन्स आणि सर्व काही खाऊन टाकणे! आणि नंतर लेखक म्हणतो अशा दुष्टपणाने ओठांनी मिटक्या मारण्यात मला आनंद वाटेल.”

“ते फारच भयंकर आहे!” स्वतःच्या पार्श्वभागावर बसत दुःखाने डोके हलवित गाढव म्हणाले. “तुम्हाला काय वाटतं लेखकाने तुम्हाला मुलींसाठी भुकेले बनविले? की तुम्ही प्राणीसुद्धा खाता?”

“लेखक माझ्या खाण्याबद्दल मुलीशिवाय काहीही उल्लेख करीत नाही.” अस्वलाने उत्तर दिले.

“खूपच छान,” विदुषकाने सुटकेचा दीर्घ श्वास सोडीत शेरा मारला. “तुम्ही जेन ग्लॅडिजला तुमच्या इच्छेप्रमाणे लवकरात लवकर खायला सुरूवात करू शकता. मला पाठ नसल्याकारणाने ती हसली होती.”

“तू सुद्धा खाऊन टाकायला पात्र आहेस,” चित्ता चामड्याच्या खुर्चीमागून ओरडला. “कारण मला दात आणि नखे नसल्यामुळे तू कुचेष्टा करून हसला होतास! तुम्हाला असं वाटत नाही का श्रीयुत महाकाय अस्वल महाराज की मुलीला खाल्ल्यानंतर तुम्ही विदूषक, माकड आणि गाढव यांना खाण्यात यशस्वी होऊ शकणार असं?”

“म्हणूनच कदाचित एक चित्ताही आहे वर,” अस्वल गुरगुरले. “मी किती भुकेला आहे ह्यावर ते अवलंबून आहे. पण मला आधी लहान मुलीपासूनच सुरूवात करायला हवी, कारण लेखक म्हणतो दुसऱ्या कोणत्याही गोष्टींपेक्षा मी तिलाच पसंत करावं.”

हे संभाषण ऐकून जेन ग्लॅडिज खूपच घाबरली आणि त्या माणसाने सूड घेण्यासाठी तिला ते पुस्तक दिले होते ह्याची तिला जाणीव व्हायला लागली होती. जेव्हा समग्र पीटर स्मिथचे पुस्तक विकत न घेतल्यामुळे त्याच्या लहान मुलीला तिचे बूट, कपडे, रिबन्स आणि इतर साऱ्या वस्तूंसह त्या महाभयंकर अस्वलाने खाऊन टाकले हे पप्पांना घरी आल्यावर कळल्यावर नक्कीच दुःख होईल.

अस्वल उभे राहिले आणि त्याच्या मागच्या पायांवर स्थिर झाले. “ह्याप्रमाणे मी पुस्तकात दिसतो.” तो म्हणाला. “आता त्या मुलीला खाताना बघा मला.”

तो हळूहळू ग्लॅडिजकडे गेला, आणि विदूषक, माकड, चित्ता आणि गाढव सर्वजण वर्तुळ करून त्यांच्या भोवती उभे राहिले आणि मोठ्या उत्सुकतेने त्यांच्याकडे लक्ष देऊन पाहू लागले.

पण तो भयंकर अजस्त्र अस्वल तिच्याकडे जाण्यापूर्वी अचानक एक विचार तिच्या मनात चमकला आणि ती ओरडली;

“थांब! तू मला खाऊच शकत नाहीस. ती मोठी चूक ठरेल.”

“का?” अस्वलाने आश्चर्यचकित होऊन विचारले.

“कारण मी आता तुझी मालकीण झाली आहे, तू माझी खाजगी मालमत्ता आहेस,” तिने उत्तर दिले.

“मला कळत नाही की तू हा दावा कसा करते आहेस ते,” ते अस्वल अपेक्षाभंग झालेल्या सुरात म्हणाले.

“का की, हे पुस्तक मला दिले गेलेले होते, माझे नाव पहिल्याच पानावर आहे आणि न्यायदृष्ट्या तुमच्यावर माझी मालकी आहे. म्हणून तुम्ही तुमच्या मालकिणीला खाऊन टाकण्याची हिम्मतच करायला नको मुळी!”

त्या अजस्त्र अस्वलाने कांकूं केले.

“तुमच्यापैकी कुणी वाचू शकतो?” त्याने विचारले.

“मी वाचू शकतो,” विदूषक म्हणाला.

“मग बघ ती खरे बोलते आहे का ते. तिचं नाव त्या पुस्तकात आहे का ते.”

त्या विदूषकाने ते हातात घेतले आणि नावाकडे बघितले.

“आहे ते,” तो म्हणाला. “जेन ग्लॅडिज ब्राऊन, आणि स्पष्टतया पूर्णतया ठळक मोठ्या अक्षरात.”

अस्वलाने निःश्वास सोडला.

“मग निश्चितपणे मी तिला खाऊ शकत नाही.” त्याने निश्चय केला. “त्या लेखकाने निराश केले जसे बहुसंख्य लोक करतात.”



"आता ह्या मुलीला खातांना बघा मला," अस्वल म्हणाले.

“पण तो त्या चित्रकारासारखा वाईट नाही,” गाढव उद्गारले जे अजूनही सरळ उभे राहू शकण्याचा प्रयत्न करीत होते.

“दोष तुमच्या स्वतःकडेच आहे.” जेन ग्लॅडीज कठोरपणे म्हणाली.

“का तुम्ही पुस्तकातच राहत नाहीत, जेथे तुम्हाला ठेवले गेले होते?”

त्या सर्व प्राण्यांनी वेडपटपणे एकमेकांकडे पाहिले, आणि विदूषक त्याच्या पांढऱ्या रंगाखाली लाजला.

“खरोखर-” अस्वलाने सुरूवात केली आणि नंतर तो थोडासा थांबला.

दरवाजावरची घंटा मोठ्याने वाजली.

“ती मम्मा आहे!” जेन ग्लॅडिज उसळी मारून उभी राहत म्हणाली. “शेवटी ती घरी आलीच. आता तुम्ही मूर्ख प्राणी-” पण त्यांनी पुस्तकाकडे धाव घेताना तिला अडथळा आणला. पानांची फडफड, भिर्रभिर्र आणि सळसळ झाली. नंतर तत्क्षणी ते पुस्तक जमिनीवर पडले आणि इतर पुस्तकांसारखे दिसू लागले, तेव्हा जेन ग्लॅडिजला ते सर्व विचित्र सोबती नाहीसे झालेले दिसले.

* * *

ही गोष्ट आपल्याला सर्व प्रसंगांवर पटापट आणि स्पष्टपणे विचार करायला शिकवते; कारण जेन ग्लॅडिजला त्या अस्वलावरची मालकी वेळेवर आठवली नसती तर बहुतकरून दारावरची घंटा वाजण्यापूर्वीच त्या अस्वलाने तिला खाऊन टाकले असते.

* * * * *

# जादूने भारलेली मुद्राक्षरे

एकदा एक नूक त्याच्या सुंदर जीवनाला कंटाळला आणि काहीतरी नवीन करण्याची अभिलाषा त्याने धरली. नूक्सना चिरंजीव लोकांपेक्षा, कदाचित पऱ्या किंवा रिल्स सोडून अधिक आश्चर्यकारक सामर्थ्य असते. एखाद्याला वाटेल की नूक त्याच्या साध्या इच्छेने काहीही इच्छित मिळवू शकतो पण तो इतर बाबतीत आनंदी आणि समाधानी राहू शकत नाही. पण असे पोपोपोच्या बाबतीत नव्हते ज्या नूकबद्दल आपण बोलत आहोत. तो हजारो वर्षे जगला आणि त्याला वाटेल त्या सर्व आश्चर्यकारक गोष्टींची मौज लुटलेली होती. तरीही त्याचे जीवन त्याच्यासाठी कंटाळवाणे झाले होते त्याच्यासारखे जो एका साध्या इच्छेनेही समाधानी होऊ शकत नव्हता.

शेवटी योगायोगाने पोपोपोने विचार केला की पृथ्वीवरचे लोक जे शहरात राहतात ते कसे जगतात हे पाहण्यासाठी त्याने त्यांना भेटण्याचा निश्चय केला. ही खात्रीने एक करमणूक होईल आणि कंटाळवाणे तास घालविण्यास त्याचा उपयोग होईल. म्हणून एके दिवशी सकाळी न्याहारीनंतर इतकी सुंदर आणि नाजूक की तुम्ही कल्पनाच करू शकणार नाहीत त्याची, पोपोपो पृथ्वीकडे जायला निघाला आणि लगेच एका मोठ्या शहराच्या मध्यभागी पोहोचला.

त्याचे निवासस्थान इतके शांत आणि स्वस्थ होते की शहराच्या गजबजाटाने त्याला धक्काच बसला. सभोवती तीन मिनिटे बघण्याआधीच त्याची इतकी घाबरगुंडी उडाली की त्याने ते धाडस करायचे सोडून देऊन तो तात्काळ घरी परतला. त्यामुळे पृथ्वीवरील शहरांना भेट देण्याची त्याची इच्छापूर्ती झाली.



" या मित्रांनो दरवाजा उघडला आहे उडून जा बाहेर ! "

परंतु लवकरच त्याच्या कंटाळवाणेपणाच्या अस्तित्वाने त्याला पुन्हा अस्वस्थ केले आणि त्याला विचार करायला लावला. रात्री लोक झोपलेले असतील आणि शहरे शांत असतील. त्याने रात्री भेट देण्याची इच्छा केली.

म्हणून पोपोपोने स्वतःला एका क्षणात एका मोठ्या शहरात आणून सोडले, जेथे त्याने रस्त्यावर फिरायला सुरूवात केली. प्रत्येकजण अंथरूणात होता. पायरस्त्याच्या बाजूला एकाही घोडागाडीचा खडखडाट ऐकू आला नाही की कामात व्यग्र असलेल्या माणसांचा आरडाओरडा करण्याचा किंवा हाका मारण्याचा आवाजही नव्हता.

पोलीस सुद्धा शांतपणे झोपलेले होते आणि कुठलेही चोर चोरी करण्यासाठी चोरपावलांनी फिरत नव्हते.

त्या नीरव शांततेने त्याचे मन शांत झाले, पोपोपोने ती मजा लुटायला सुरूवात केली. त्याने अनेक घरांमध्ये प्रवेश करून त्यांच्या खोल्या मोठ्या जिज्ञासेने तपासल्या. कड्याकुलूपांचा त्या नूकला काही फरक पडला नाही आणि दिवसाच्या प्रकाशाइतकेच तो रात्रीच्या अंधारात बघू शकत होता.

काही वेळानंतर तो शहराच्या व्यापारी पेठेकडे रमत गमत फिरला. दुकानेही अमर्त्यांसाठी अज्ञात असतात ज्यांना पैशांची किंवा विनिमय आणि वस्तूंच्या अदलाबदलीची गरज नसते; म्हणून पोपोपोला कितीतरी वस्तूंचा संग्रह आणि व्यापारी मालाच्या नव्या दृष्टीची खूप मौज वाटली.

त्याच्या फिरतीच्या दरम्यान तो स्त्रियांच्या टोप्यांच्या दुकानात शिरला आणि एका मोठ्या काचेच्या खोक्यात ठेवलेल्या विशिष्ट ठेवण व भुसा भरलेले पक्षी असलेल्या स्त्रियांच्या अनेक हॅट्स पाहून त्याला अचंबा वाटला. खरोखर, काही बहुतकरून नक्षीकाम असलेल्या हॅट्सवर एक किंवा दोन पक्षी होते.

आता नूक्स हे पक्षांचे विशेष पालक असतात आणि त्यांच्यावर खूप प्रेम करतात. त्याचे हे चिमुकले दोस्त काचेच्या पेटीत पाहून तो त्रस्त झाला आणि हेतुपुरस्सर त्या टोप्यांवर ते ठेवले गेले होते ह्या बद्दल त्याला कल्पना नसल्याने त्याला दुःख झाले. म्हणून त्याने एका दरवाज्याची पट्टी मागे सरकवली आणि त्यांना नूक्सच्या चिवचिवची शीळ घातली, जी पक्ष्यांना चांगल्यापैकी ठाऊक होती, आणि त्याने हाक मारली,

“या मित्रांनो दरवाजा उघडला आहे उडून जा बाहेर!” पोपोपोला ठाऊक नव्हते की ते पक्षी भुसा भरलेले होते; परंतु प्रत्येक पक्षी नूक्सच्या शीळेची आणि हाकेची आज्ञा पाळण्यासाठी बांधील होता म्हणून त्यानी हॅट्स सोडल्या आणि काचेच्या पेटीतून बाहेर पडून ते सर्व खोलीभर फडफडू लागले.

“गरीब बिचारे पक्षी!” दयाळू अंतःकरणाचा नूक म्हणाला. “तुम्हाला आता पुन्हा शेतामध्ये आणि जंगलात जायची इच्छा होणार.” नंतर त्याने त्यांच्यासाठी बाहेरचा दरवाजा उघडला आणि ओरडलाः “जा तुम्ही! उडून जा माझ्या गोजिरवाण्यांनो आणि पुन्हा सुखी व्हा.” विस्मयचकित झालेल्या पक्ष्यांनी तात्काळ आज्ञा पाळली आणि जेव्हा त्यांनी रात्रीच्या हवेत उंच भरारी घेतली तेव्हा नूकने दरवाजा बंद केला आणि रस्त्यावरची भटकंती त्याने पुन्हा सुरू केली.

पहाटे पहाटे त्याने खूप लक्षवेधी गोष्टी पाहिल्या, पण दिवस उजाडण्यापूर्वी त्याने शहर हिंडून संपविले आणि दुसऱ्या दिवशी सायंकाळी काही तास लवकर येण्याचे ठरविले.

जेव्हा पुढील दिवशी अंधार पडला तेव्हा तो पुन्हा त्या शहरात आला आणि टोप्या विकणाऱ्याच्या दुकानावरून जाताना त्यात त्याने प्रकाश पाहिला. आत गेल्यावर त्याला दोन स्त्रिया तेथे आढळल्या, एक डोके खाली टेबलावर वाकवून

मोठ्या दुःखाने हुंदके देत होती, तेव्हा दुसरी तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होती. मर्त्य माणसांच्या डोळयांना पोपोपो नक्कीच अदृश्य होता, म्हणून तो त्यांच्या बाजूला उभे राहून त्यांचे संभाषण ऐकू लागला.

“नाउमेद होऊ नकोस ताई,” एक म्हणाली. “जरी तुझे सुरेख पक्षी चोरीला गेले असले तरी हॅट्स तर शिल्लक राहिल्या ना?”

“हाय!” दुसरीने आक्रोश केला, ती टोप्या बनवून विकणारी होती. “ह्या अर्धवट सजावट केलेल्या टोप्या आता कोण विकत घेणार, कारण पक्षी असलेल्या टोप्या घेण्याची आजकाल पद्धत आहे, आणि जर मी माझा माल विकू शकले नाही तर मी पूर्णपणे कंगाल होईन.”

तिने पुन्हा स्फुंदून रडायला सुरूवात केली आणि ज्या नूकने ते पक्ष्यांच्या प्रेमापोटी चोरले आणि बेसावधपणे चूक करून पृथ्वीवरील लोकांपैकी एकाला दुःखी बनवल्याची जाणीव झाल्याबरोबर त्याला शरमल्यासारखे वाटले.

ह्या विचाराने नंतरच्या रात्री त्याला त्या टोप्यांच्या दुकानात पुन्हा आणले तेव्हा त्या दोघी स्त्रिया घरी गेल्या होत्या. त्याची अशी इच्छा होती की काहीतरी मार्ग काढून ते पक्षी त्या हॅट्सवर परत ठेवावेत जेणेकरून ती गरीब बिचारी बाई पुन्हा सुखी होईल. म्हणून त्याने जवळच्या तळघरात येईपर्यंत शोध घेतला जे करड्या रंगांच्या उंदरांनी भरलेले होते आणि जे शेजारच्या घरांच्या भिंतींमधून कुरतडून अन्न साठविण्याच्या खोलीतून चोरून आणून खात होते.

“येथे योग्य तेच प्राणी आहेत,” पोपोपोने विचार केला. “स्त्रियांच्या हॅट्सवर ठेवण्यासाठी त्यांची मृदू लव जवळजवळ पक्ष्यांच्या पिसांसारखीच आहे आणि मला एकदम जाणवले की उंदीर वैशिष्ट्यपूर्णतेने सुंदर आणि डौलदार असतात. तथापि ते आता चोऱ्या करण्यात त्यांचे आयुष्य घालवीत आहेत आणि

आता स्त्रियांच्या हॅटवर राहण्यास त्यांना भाग पाडल्यास त्यांची नैतिकता अधिक सुधारेल."

म्हणून त्याने चेटुक केले आणि तळघरातील सर्व उंदरांना बाहेर खेचले आणि पक्ष्यांनी रिक्त केलेल्या काचेच्या पेटीतील हॅट्सवर ठेवले आणि ते ऐहिक नसलेल्या नूकच्या नजरेत ते कमीतकमी सुंदर तरी दिसत होते. हॅट्स सोडून इकडे तिकडे ते पळू नयेत म्हणून पोपोपोने जादूचा प्रयोग करून त्यांना निश्चेष्ट बनविले आणि मग ह्या कामाबद्दल तो इतका खूष झाला की त्याने सुंदरतेने सजविलेल्या हॅट्स पाहून ती टोप्यांची दुकानवाली येण्याची व ती खूष झालेली पाहण्यासाठी तो तेथे थांबला.

ती सकाळी लवकरच तिच्या बहिणीसोबत आली आणि तिच्या चेहऱ्यावर कटू गोष्ट विसरण्याचा भाव होता. झाडून व धूळ पुसून पडदे ओढल्यावर तिने काचेच्या पेट्या उघडल्या व हॅट्स बाहेर काढल्या.

पण रिबिन आणि नक्षीच्या झालरीत बसलेला इवलासा उंदीर बघितल्याबरोबर तिने जोरात किंचाळी मारली आणि हॅट खाली फेकीत टेबलावर उडी मारली आणि उद्गारली, "काय आहे ते? ओ! काय आहे?"

"उंदीर!" ती टोप्याच्या दुकानवाली धापा टाकीत भीतीने थरथर कापत होती.

पोपोपो हा कल्लोळ पाहत होता, आता त्याला कळून चुकले की विशेषतः मानवी प्राण्याला उंदीर अप्रिय असतात. त्याने त्यांना हॅटवर ठेवून घोडचूक केली होती म्हणून त्याने हळूच आज्ञेची शीळ घातली जी फक्त उंदरांनीच ऐकली.

तात्काळ त्या साऱ्यांनी हॅट्सवरून उड्या मारल्या आणि काचेच्या कपाटाच्या उघड्या दरवाजाबाहेर दुडूदुडू धावत त्यांच्या तळघरात गेले. पण त्या

कृतीने त्या टोपीच्या दुकानवालीला आणि तिच्या बहिणीला इतके घाबरविले की त्या खूप जोरात ओरडत त्यांच्या पाठीवर पडून बेशुद्ध झाल्या.

पोपोपो हा दयाळू अंतःकरणाचा नूक होता, पण मानवी स्वभाव वैशिष्ट्याच्या अज्ञानीपणामुळे उद्भवलेल्या त्यांच्या क्लेशांना त्याला प्रत्यक्ष पहावे लागले, त्यामुळे त्याने सरळ घरी जायचे ठरविले. म्हणून त्याने त्या गरीब बायांना त्यांच्या दुःखातून जितके चांगले सावरता येईल तितके सावरण्यासाठी तो निघून गेला.

अद्याप तो कर्तव्याच्या दुःखीभावनेपासून त्याची स्वतःची सुटका करून घेऊ शकत नव्हता, आणि ह्या गोष्टींवर विचार केल्यानंतर त्याने ठरविले की---

जेव्हापासून तो पक्ष्यांना मुक्त करून टोप्यांच्या दुकानवालीच्या दुःखाला कारणीभूत झाला होता तो प्रश्न त्या पक्ष्यांना पूर्ववत काचेच्या पेटीत ठेवून सोडवू शकत होता. तो पक्ष्यांवर प्रेम करायचा आणि त्यांना पुन्हा गुलाम बनवून शिक्षा करणे त्याला नापसंत होते, पण ह्या दुःखाचा शेवट करण्याचा तोच एकमेव मार्ग दिसत होता.

म्हणून तो त्या पक्ष्यांना शोधण्यासाठी बाहेर पडला. ते खूप लांब अंतरावर उडून गेले होते, पण पोपोपोला त्यांच्यापर्यंत एका क्षणात पोहोचायला काहीच वेळ लागला नाही. एका तांबूस पिंगट रंगाची फळे असलेल्या फांदीवर मोठ्या आनंदाने गात बसलेल्या पक्ष्यांना त्याने शोधून काढले. जेव्हा त्यांनी नूकला पाहिले तेव्हा ते पक्षी ओरडले, “आभारी आहोत, पोपोपो तुझे. आम्हाला मुक्त केल्याबद्दल तुझे आभार मानतो.”

“माझे आभार मानू नका,” नूकने प्रत्युत्तर दिले, “कारण मी तुम्हाला त्या टोप्यांच्या दुकानात पुन्हा पाठवायला आलो आहे”

“का?” निळया जे ने रागाने फर्मावले, जेव्हा इतरांनी त्यांचे गाणे थांबवले होते.

“कारण मला असे दिसले की त्या स्त्रीने तुम्हाला तिची मालमत्ता समजली आहे आणि तुम्हाला गमविल्यामुळे तिला खूप दुःख झाले आहे.” पोपोपोने उत्तर दिले.

“पण आठवा की तिच्या त्या काचेच्या पेटीत आम्ही किती दुःखी होतो ते,” लाल छातीचा दयाळ पक्षी गंभीरपणे म्हणाला, “आणि तिची मालमत्ता म्हणून जर म्हटले तर तुम्ही नूक आहात, आणि तुम्ही सर्व पक्ष्यांचे नैसर्गिक पालक आहात; तुम्हाला ठाऊक आहे की निसर्गाने आम्हाला मुक्त निर्मिले आहे. खात्री करा की दुष्ट माणसांनी आम्हाला गोळया घातल्या आणि आमच्यात भुसा भरला आणि त्या टोपीवाल्यांना विकले. पण आम्ही त्यांची मालमत्ता आहोत ही कल्पना खुळचट आहे.”

पोपोपो गोंधळला. “जर मी तुम्हाला मोकळे सोडले,” तो म्हणाला “दुष्ट माणसे तुम्हाला पुन्हा गोळया घालतील आणि तुम्ही काही उत्तम परिस्थितीत नसाल.”

“शी!” निळा जे उद्गारला. “आम्हाला गोळया लागू शकत नाहीत आता. कारण आमच्यात भुसा भरलेला आहे. आज सकाळीच दोन माणसांनी आमच्यावर अनेक गोळया झाडल्या पण गोळयांनी आमच्या पिसांना फक्त चोळवटले आणि भुशात दडवून घेतले. आता आम्ही माणसांना घाबरत नाहीत.”

“ऐका!” पोपोपो कठोरपणे म्हणाला, कारण ते त्याच्याशी उत्तम वादविवाद करीत होते. “गरीब बिचाऱ्या टोप्यांच्या दुकानदारीनी व्यापाऱ्याचे दिवाळे निघेल, जर मी तुम्हाला तिच्या दुकानात परत पाठविले नाही तर. असं वाटतं की तुम्ही त्या टोप्यांना सजविणं गरजेचं आहे. हॅटच्या चक्रावर पक्षी धारण करणे ही स्त्रियांच्या वेशभूषेची पद्धत आहे. म्हणून जरी गरीब बिचाऱ्या टोप्यांच्या दुकानदारीणीने रिबन आणि नक्षीदार झालरीने मौल्यवान वस्तू कितीही सुंदर रितीने सजविल्या तरी पण त्या स्थानांवर जोपर्यंत तुम्ही बसत नाहीत तोपर्यंत त्या क्षुल्लक आहेत.”

“वेशभूषेची पद्धत,” काळा पक्षी गंभीरपणे म्हणाला. “जी मानवाकडून बनविली गेली. कोणता कायदा आहे तेथे, पक्षी आणि नूक्स ह्यांना वेशभूषेचे गुलाम राहण्याची गरज आहे?”

“असं असलं तरी ह्या वेशभूषेशी आपल्याला काय करायचंय?” गाणारा तपकिरी रंगाचा लिग्रेट पक्षी किंचाळला. जर नूक्सना हॅटच्या किनाऱ्यावरील स्थानावर बसण्याची वेशभूषा असली तर तुम्हाला तेथे राहण्यात आनंद वाटेल? उत्तर द्या मला पोपोपो!”

पण पोपोपो निराश झालेला होता. तो ना पक्ष्यांना पुन्हा त्या टोपीवाल्याच्या दुकानात पाठविण्याची चूक करू शकत होता, ना त्या टोपीच्या दुकानदारीणीला तिला झालेल्या नुकसानीचे दुःख तिने सहन करावे अशी इच्छा करू शकत होता. म्हणून काय करता येईल ह्याचा विचार करण्यासाठी तो घरी गेला. खूप चिंतन केल्यानंतर त्याने नूक्सच्या राजाचा सल्ला घेण्याचे ठरविले. राजेसाहेबांना भेटल्यानंतर त्याने तात्काळ संपूर्ण हकीकत त्यांना सांगितली. राजाच्या कपाळावर रागाने आठ्या पडल्या.

“ह्या गोष्टीत तुला पृथ्वीवरील लोकांच्या कामात अडथळा आणल्याबद्दल शिकवणूक मिळावी,” ते म्हणाले. “पण त्यांच्या त्रासाला कारणीभूत झाल्याबद्दल त्यावर काही उपाय करणे हे तुझे कर्तव्यच आहे. आपले पक्षी गुलाम होऊच शकत नाहीत, हे निश्चित; म्हणून तुला वेशभूषा पद्धती बदलायला हवी, म्हणजे स्त्रियांनी त्यांच्या हॅट्सवर पक्षी बसवून घेण्याची वेशभूषा कधीच करायला नको.”

“कसे करू मी ते?” पोपोपोने विचारले.

“एकदम. पृथ्वीवरील लोकांच्या वेशभूषा ह्या नेहमी बदलत असतात, त्यांना एखाद्या गोष्टीचा लवकरच कंटाळा येतो. जेव्हा ते त्यांच्या वर्तमानपत्र किंवा मासिकात अमुक-तमुक वेशभूषेबद्दल वाचतात तेव्हा ते त्या गोष्टीबद्दल कधीच शंका घेत नसतात, पण ताबडतोब वेशभूषेच्या आदेशाचे पालन करतात. म्हणून तू वर्तमानपत्रे आणि मासिकांना भेट दे आणि मुद्राक्षरांना जादूने भारून टाक.”

“मुद्राक्षरांना जादूने भारून टाकू?” पोपोपोने विचारले.

“म्हणून आत्ताच त्यांना असे वाचायला प्रवृत्त कर की हॅट्सवर पक्षी ठेवायची वेशभूषा फार काळ करायला नको. त्यामुळे तुझ्या गरीब बिचाऱ्या टोप्या विकणाऱ्यांना चिंतेतून सुटका मिळेल आणि अगदी त्याचवेळी आपल्या लाडक्या प्रिय अशा हजारो पक्षांना ते मुक्त करतील ज्यांचा क्रूरपणे वापर केला जात आहे.”

पोपोपोने त्याच्या प्रज्ञावान राजाचे आभार मानले आणि त्याच्या सल्ल्याप्रमाणे अनुसरण केले. शहरातल्या वर्तमानपत्राच्या आणि मासिकाच्या प्रत्येक कार्यालयाला नूककडून भेट दिली गेली, आणि नंतर तो इतर शहरात गेला.




“ आता आम्ही माणसांना घाबरत नाहीत.”

जोपर्यंत त्या प्रदेशात वृत्तपत्रांच्या पानावर " नव्या वेशभूषेचा वृत्तांत" छापला जात नाही. काही काळ पोपोपोने त्या मुद्राक्षरांना जादूने भारून टाकले जेणेकरून ती छापलेली अक्षरे जो कुणी पाहील तो नूकच्या इच्छेप्रमाणेच पाहील. काहीवेळा त्याने कामात गर्क असलेल्या संपादकांना बोलविले आणि जोपर्यंत त्याला हवे ते अचूकपणे ते लिहित नाहीत तोपर्यंत त्यांच्या मेंदूला त्याने गोंधळात पाडले.

मर्त्य माणसांना क्वचितच कळते की किती मोठ्या प्रमाणात पऱ्या, नूक्स आणि रिल्सचा प्रभाव पडतो जे नेहमी त्यांच्या डोक्यात विचार ठेवतात आणि फक्त छोटे सूज्ञ चिरंजीवच ती कल्पना करू शकतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा त्या टोपी विकणाऱ्या बाईने तिचे वर्तमानपत्र तपासून बघितले तेव्हा तिला दिसले की, "कोणत्याही स्त्रीने आता पक्षी असलेली हॅट डोक्यावर घालायची नाही आणि नव्या वेशभूषेसाठी हॅटवर फक्त रिबन्स आणि नक्षीची झालरच लावणं गरजेचं आहे," हे वाचून ती हर्षोत्फुल्ल झाली.

पोपोपोने प्रत्येक टोपीवाल्यांच्या दुकानांना भेट देत मौज लुटली. एका बाजूला निष्काळजीपणे फेकून दिलेल्या त्या भुसा भरलेल्या पक्षांना त्याने नवजीवन दिलेले तो पाहू शकला. आणि ज्या नूकने त्यांना संकटातून वाचविले होते त्याचे आभार मानीत ते पक्षी शेतांवर आणि जंगलाकडे गाणी गात उडून गेले.

काही वेळाने शिकाऱ्याने त्यांच्यावर बंदुकीच्या गोळया झाडल्या. पण त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही हे पाहून त्याला आश्चर्य वाटले. ही गोष्ट वाचल्यावर तुम्हाला समजेल की टोप्या विकणाऱ्यांच्या काही दुकानांपैकी एका दुकानात भुसा भरलेले पक्षी होते जे निश्चितच बंदुकीच्या गोळीने ठार होऊ शकत नाहीत.

* * * * *

# हसणारा पाणघोडा

कांगो नदीच्या वरच्या बाजूला उपनद्यांपैकी एकीवर पाणघोड्यांचे प्राचीन आणि अभिजात कुटूंब राहत होते. ते बढाईखोर वंशाच्या नोहाच्या खूप जुन्या काळातील – मानवाच्या अस्तित्वापलीकडे – दूरस्थ अंधारयुगात, जेव्हा जग नवे होते त्या काळातील होते.

ते ह्याच नदीच्या किनाऱ्यावर नेहमी राहत आले होते, त्यामुळे पाण्याचे प्रत्येक वळण, आणि कक्षा, तळाचा प्रत्येक खोल आणि उथळपणा, प्रत्येक खडक आणि तिच्या किनाऱ्यावर असलेला खड्डा आणि चिखल त्यांच्या आईइतकेच त्यांच्या परिचयाचे होते. आणि मला वाटते ते अद्यापपावेतो तेथे राहत आहेत.

फार पूर्वी ह्या पाणघोड्याच्या जमातीतील राणीला एक बाळ झाले होते, ज्याचे नाव तिने कियो असे ठेवले होते, कारण ते खूप लठ्ठ आणि गोलाकार होते. तथापि त्यासंबंधी मी तुमची चुकीची कल्पना करून देणार नाही.

मी असं म्हणेन की पाणघोड्याच्या भाषेत कियोचे योग्य भाषांतर म्हणजे त्याचा अर्थ लठ्ठ आणि गोलाकार ऐवजी लठ्ठ आणि सुस्त असे होते. कुणीही ही चूक राणीला सांगितली नव्हती, कारण तिचे सुळे अक्राळ विक्राळ होते, आणि तिला कियो हा जगातील सर्वात गोड बाळ वाटायचा.

तो पाणघोडा म्हणून खरोखर ठीक होता. तो नदीकिनाऱ्यावरील मऊ चिखलात लोळायचा, खेळायचा आणि आतल्या प्रदेशात डुलत जाऊन तेथे उगवलेल्या रानटी कोबीची पाने कुरतडायचा आणि सकाळपासून रात्रीपर्यंत खूष आणि समाधानी असायचा.




“ का, हा इप्पी — खेळकर पोरगा नइ.”

आणि असा अतिशय हसरा आणि खेळकर पाणघोडा त्या पुरातन कुटुंबाने कधीही पाहिला नव्हता. त्याचे इवलेसे लाल डोळे गमतीसह लुकलुकत, आणि हसण्यासारखे काही असो वा नसो तो सर्व प्रसंगी हसत असे.

त्या कारणाने काळे लोक जे त्या भूप्रदेशात राहत होते ते त्याला "इप्पी" विनोदी म्हणत, पण तरीही त्याची भयंकर आई, त्याचप्रमाणे काका, आत्या आणि चुलत भाऊ जे नदीकिनाऱ्यावरील विस्तीर्ण वसाहतीत राहत होते, त्यांना भिऊन ते त्याच्याजवळ जात नसत.

आणि जेव्हा हे काळे लोक जे झाडींमध्ये पसरलेल्या छोट्याशा खेड्यांमध्ये राहत होते, ते पाणघोड्याच्या बादशाही कुटुंबावर उघडपणे हल्ला करण्याचे धाडस करीत नव्हते, जेव्हा त्यांना ते मिळू शकले असते तेव्हा ते पाणघोड्याचे मांस अतिशय आवडीने खाण्यास तयार होते. पाणघोड्यापुढे हे रहस्य नव्हते. आणि पुन्हा काळे लोक ह्या प्राण्यांना जिवंत पकडण्याची योजना करीत, तेव्हा ते जणूकाही घोडे होते असे समजून त्यांच्यावर स्वार होऊन जंगलातून त्यांना फिरवीत, अशा रितीने ते त्यांना गुलामगिरीच्या अवस्थेप्रत आणून टाकीत.

म्हणून या गोष्टी मनात ठेऊन जेव्हा जेव्हा काळया जातीच्या लोकांची तेलकट दुर्गंधी येई तेव्हा ते त्यांच्यावर नेहमी बेफामपणे हल्ला करायचे आणि जेव्हा अनपेक्षितपणे त्या शत्रूंशी गाठ पडायची तेव्हा ते त्याला तीक्ष्ण सुळयांनी खसकन् ओढायचे किंवा त्यांच्या अजस्त्र पायांनी त्यांना जमिनीत चिरडून टाकायचे. असे पाणघोडे आणि काळया लोकांमध्ये निरंतर वैर होते.

गोइ हा त्या काळया लोकांच्या खेडेगावातील एका गावात राहत होता. तो प्रमुखाच्या भावाचा मुलगा आणि खेडेगावातील चेटक्याचा नातू होता. नंतर तो वृद्ध झाल्यावर "अस्थिहीन चमत्कार" म्हणून ओळखला जाऊ लागला, कारण तो स्वतःला सर्पासारख्या अनेक वेटोळयात गुंडाळायचा आणि हे करताना त्याच्या शरीरातले कोणतेही हाड कुठल्याही अंगस्थितीत त्याला अडथळा आणीत

नसत. ह्या कारणाने तो थरथर कापत चालायचा, पण काळ्या लोकांना त्याच्याविषयी आदरच वाटायचा.

गोइची झोपडी झाडांच्या फांद्यांमध्ये चिखल भरून बनविलेली होती आणि त्याचे कपडे गवताच्या चटईपासून बनविलेले होते आणि ते चोहीकडून मध्यभागी बांधलेले होते. पण प्रमुखाशी त्याचे संबंध होते आणि चेटक्याने त्याला विशिष्ट प्रतिष्ठा दिलेली होती, आणि एकांतवासाच्या विचारांची त्याला आसक्ती होती. कदाचित ह्या विचारांनी त्याच्या शत्रूंवर, पाणघोड्यांवर हल्ला करण्याचे विचार त्याच्या मनात वारंवार येणे नैसर्गिकच होते की अनेक मार्गांनी त्याने त्यांना पकडावे.

शेवटी त्याने त्याची योजना पूर्ण केली. आणि नदीच्या दोन एकाकी वळणावरच्या अर्ध्या वाटेवर मध्यभागी खोल खड्डा खणावयास तो निघाला. जेव्हा खड्डा पूर्ण झाला तेव्हा त्याने झाडांच्या छोट्या छोट्या फांद्यांनी तो आच्छादून टाकला आणि त्यावर माती पसरली आणि पृष्ठभाग इतक्या कावेबाजपणे मऊसूत केला की त्याच्या खालच्या बाजूला एक मोठे विवर आहे ह्याचा कुणालाही संशय येऊ नये. नंतर गोइ हळुवारपणे स्वतःशीच हसला आणि रात्रीच्या जेवणासाठी घरी निघून गेला.

त्या सायंकाळी राणी कियोला म्हणाली, जो आता त्याच्या वयात छानसा मुलगा म्हणून वाढत होता, “माझी अशी इच्छा आहे की वळणाच्या पलीकडे पळत जाऊन तू तुझ्या निक्की काकाला बोलावून आण. मला एक छानसे विचित्र झाड सापडले आहे, आणि ते खाणे चांगले की नाही ह्याबद्दल मला त्यांना विचारायचे आहे.”

तो खेळकर मनःपूर्वक हसला आणि तो चक्कर मारायला निघाला. कोपऱ्यावरील किराणा दुकानात खमीरची वडी आणायला पाठविलेल्या मुलाला वाटते इतके महत्त्वाचे हे काम त्याला वाटले.

“गुक-डक-डक! गुक-डक-डक-डक!” ही त्याची हसायची पद्धत होती. आणि जरी तुम्ही विचार कराल की पाणघोडा अशा पद्धतीने हसत नाही, पण जर तुम्ही एकाला असं ऐकलं तर तुम्हाला मी बरोबर आहे असे आढळून येईल.

तो चिखलातून सरपटत आणि झुडपांमधून ताबडत चालत असताना पाण्यात अर्धी उभी असलेल्या त्याच्या आईने त्याचे संगीतमय “गुक-डक-डक-डक” लांब अंतरावर नाहीसे होत जाताना ऐकले.

कियो इतक्या आनंदी वृत्तीने जात होता की तो कोठे पावले टाकीत होता त्याकडे त्याचे लक्षच नव्हते, म्हणून त्याच्या हसण्याच्या मध्येच त्याला मैदानाने खालच्या बाजूला नेले, आणि तो गोइच्या खोल खड्ड्याच्या तळाशी पडला तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. तो नुसता खूप जखमी झाला नाही तर तो खाली पडताना त्याच्या नाकाला जबरदस्त मार बसला, म्हणून तो हसणे बंद करून बाहेर कसे पडता येईल ह्याचाच विचार करू लागला. नंतर त्याला आढळून आले की त्या भिंती त्याच्या डोक्यापेक्षाही उंच होत्या. म्हणून तो त्याच्या दुर्दैवावर थोडासा हसला, त्याच्या हसण्याने त्याला शांत केले आणि तो झोपी गेला. परिणामतः तो रात्रभर सकाळ होईपर्यंत घोरत होता.

जेव्हा गोईने त्या खड्ड्याच्या कडेवरून खाली डोकावून पाहिले तेव्हा तो उद्गारला, “का हा इप्पी खेळकर पोरगा तर!”

कियोने त्या काळया माणसाचा वास ओळखला आणि त्याला चावण्यासाठी डोके शक्य तेवढे उंचावण्याचा प्रयत्न केला. त्याने पाहिले की गोई पाणघोड्याची भाषा बोलत होता, जी तो त्याच्या चेटक्या आजोबांकडून शिकला होता.

“शांत रहा, छोट्या बाळा; तू माझा कैदी आहेस.”

“होय मला तुझ्या पायाचा तुकडा मिळेल जर मी त्यापर्यंत पोहोचलो तर,” कियोने प्रत्युत्तर दिले आणि तो त्याच्याच विनोदावर हसला. “गुक-डक-डक-डक!”

पण गोई एक काळा माणूस होता, पुढचे संभाषण करण्याऐवजी तो निघून गेला आणि दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत तो परतला नाही. जेव्हा तो पुन्हा आला, त्याने खड्ड्यावरून वाकून पाहिले तेव्हा कियो भुकेने इतका अशक्त झाला होता की तो हसूही शकत नव्हता.

“तू शरण आलास?” गोईने विचारले, “की तुला अजूनही माझ्याशी लढायचे आहे?”

“काय होईल जर मी शरण आलो तर?” कियोने चौकशी केली.

त्या काळया माणसाने गोंधळून त्याचे लोकरी डोके खाजविले. “हे सांगणं कठीण आहे, इप्पी. तू इतका लहान आहेस की तू काम करू शकणार नाहीस, आणि खाण्यासाठी मी तुला ठार मारलं तर तुझा सुळा मला गमवावा लागेल जो अजून पूर्णपणे वाढलेला नाही. का, अरे खेळकर पोरा, का तू माझ्या विवरात पडलास? मला तुझ्या आईला किंवा तुझ्या काकांपैकी एकाला पकडायची इच्छा होती.”

“गुक-डक-डक-डक!” कियो हसला. “तू मला जाऊ द्यायला हवंस, काळया माणसा; कारण काही झालं तरी माझा तुला काहीच उपयोग नाही!”

“ते मी करणार नाही.” गोई ठामपणे म्हणाला. “जर,” नंतर सुचलेल्या विचाराने तो पुढे म्हणाला, “तुला माझ्याशी सौदा करावा लागेल.”

“ऐकूदे तुझा सौदा मला, काळ्या माणसा, कारण मला भूक लागली आहे.” कियो म्हणाला.

“मी तुला जाऊ देईन पण जर तू माझ्या आजोबांच्या सुळ्याची शपथ घेऊन एक वर्ष एक दिवसाने येथे येऊन रहायचे आणि माझा कैदी बनायचे.”

तो तरूण पाणघोडा विचार करण्यासाठी थांबला कारण त्याला ठाऊक होते की आजोबांच्या सुळ्याची शपथ घेणे ही गंभीर बाब आहे परंतु त्याला पराकोटीची भूक लागली होती आणि एक वर्ष आणि एक दिवस म्हणजे खूप दूरवरचा काळ होता, म्हणून तो दुसऱ्यांदा बेफिकीरीने हसत म्हणाला. “खूप छान, जर तू मला आत्ता जाऊ दिले तर मी माझ्या आजोबांच्या सुळयांची शपथ घेऊन सांगतो की एक वर्ष एक दिवसानंतर परत येईन आणि तुझा बंदिवान होईन.”

गोईला खूप आनंद झाला. कारण त्याला ठाऊक होते की एक वर्ष आणि एक दिवस ह्या काळात कियो जवळ जवळ पूर्णपणे प्रौढ होईल. म्हणून त्याने खड्ड्याच्या कडा खणायला सुरूवात केली आणि मातीची भर टाकून उतार बनविला ज्यामुळे पाणघोड्याला बाहेर येता येईल.

कियोला तो जमिनीवर आहे हे कळल्याबरोबर खूप आनंद झाला इतका की तो हास्याच्या आनंदी झटक्यात मौज करू लागला. त्यानंतर तो म्हणाला, “बराय गोई, एक वर्ष आणि एक दिवसानंतर आपण पुन्हा भेटूया.”

नंतर तो नदीकडे त्याच्या आईला भेटायला आणि सकाळची न्याहारी करायला डुलत डुलत निघाला आणि गोई त्याच्या खेड्याकडे परतला.

त्यानंतरच्या महिन्याच्या दरम्यान काळा माणूस त्याच्या झोपडीत पडला होता किंवा जंगलात शिकारीला जात होता, त्याने त्यावेळी लांबवर, “गुक-

डक-डक-डक!” असा पाणघोड्याच्या हसण्याचा आवाज ऐकला. पण त्याने नुसते स्वतःशी स्मित केले आणि विचार केलाः “एक वर्ष आणि एक दिवस लवकरच निघून जाईल!”

आता जेव्हा कियो सुरक्षितपणे आणि चांगल्या अवस्थेत त्याच्या आईकडे पोहोचला तेव्हा त्या जमातीच्या प्रत्येक सभासदाला आनंद झाला कारण तो खेळकर सर्व सामान्यांचा खूप आवडता होता. पण जेव्हा त्याने सांगितले की एक वर्ष आणि एक दिवसानंतर त्याला पुन्हा त्या काळया माणसाचा गुलाम व्हावे लागेल तेव्हा ते विलाप करू लागले आणि रडू लागले आणि खूप जणांचे अश्रू वाहिल्याने नदीच्या पाण्याची पातळी बऱ्याच इंचांनी वाढली.

नेहमीप्रमाणे कियो त्यांच्या दुःखावर फक्त हसला, पण त्या जातीची मोठी बैठक भरविली गेली आणि ह्या गोष्टीची गंभीर चर्चा झाली.

“त्याच्या आजोबांच्या सुळयांची शपथ घेतली गेली आहे,” निक्की काका म्हणाले. “त्याने त्याचे वचन पाळायलाच हवे. पण त्याला मृत्यूपासून किंवा आयुष्यभराच्या गुलामगिरीपासून काहीतरी मार्ग काढून त्याला वाचविण्याचा प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे.”

ह्यावर सर्वांचे एकमत झाले, पण कियोला त्याच्या दुर्दैवापासून कशा पद्धतीने वाचविता येईल ह्याबद्दल कुणीच विचार करू शकला नाही. अशा रितीने महिने संपले, त्या दरम्यानच्या काळात ह्या खेळकराव्यतिरिक्त, पाणघोड्याचे बादशाही कुटूंब दुःखी आणि खिन्न झाले होते.

शेवटी कियोच्या स्वातंत्र्याचा फक्त एक आठवडा उरला, त्याची आई, राणी इतकी खिन्न, चिंतातूर आणि काळजीग्रस्त झाली होती की त्या जमातीची दुसरी बैठक बोलविण्यात आली. ह्या काळात तो हसणारा पाणघोडा आकाराने

प्रचंड वाढला होता आणि मोजमापात जवळजवळ पंधरा फूट लांब आणि सहा फूट उंच झाला होता. तेव्हाच त्याचे सुळे तीक्ष्ण, अतिशय शुभ्र व एखाद्या हत्तीपेक्षा कठीण बनले होते.

"माझ्या मुलाचा जीव वाचविण्यासाठी काही केले गेले नाही तर," त्याची आई म्हणाली, "शोकाने मरून जाईन मी."

नंतर तिच्या नातेवाईकांनी निरर्थक सूचना करायला सुरुवात केली, पण सूज्ञ आणि अतिशय मोठा पाणघोडा, नेप काका तात्काळ म्हणाले, "आपण ग्लिंकोमॉककडे जायलाच हवे आणि मदतीसाठी त्यांची याचना करायलाच हवी."

नंतर सारे स्तब्ध झाले. कारण बलाढ्य ग्लिंकोमॉकला तोंड देणे अतिशय धीटपणाचे होते. पण आईचे प्रेम कोणत्याही शौर्याच्या तोलाचे होते.

"मी स्वतः त्यांच्याकडे जाईन जर नेप काका माझ्या सोबतीला आले तर," ती तात्काळ म्हणाली.

नेप काकांनी विचारपूर्वक पुढच्या पायांनी चिखल थोपटला आणि त्यांची शेपटी त्यांनी मोकळेपणे इकडून तिकडे हलविली.

"आपण नेहमीच ग्लिंकोमॉकची आज्ञा पाळली आहे आणि त्यांना आदर दाखविला आहे." ते म्हणाले. "त्या कारणास्तव मी त्यांच्या समोर जायला घाबरत नाही. मी येईन तुझ्याबरोबर." त्यांना तेथे न बोलविल्याबद्दल आनंद होऊन त्या सर्वांनी फुरफुर करीत पाठिंबा दिला.

म्हणून राणी आणि नेप काकांच्या मधोमध पोहत कियो प्रवासाला निघाला. ते संपूर्ण दिवस आणि दुसऱ्या दिवसाचा सूर्य बुडेपर्यंत आणि जेथे खडकाळ

उंच भिंतीखालील बलाढ्य ग्लिकोमॉक ज्या गुहेत राहत होता तेथपर्यंत ते नदीतून पोहत गेले.

ह्या भितीदायक प्राण्याच्या शरीराचा काही भाग जनावराचा होता, काही भाग मानवाचा होता, काही भाग कोंबड्याचा तर काही भाग माशाचा होता. जगाच्या आरंभापासून तो जगत होता. वर्षानुवर्षांच्या ज्ञानामुळे तो काहीसा चेटूक करणारा, काहीसा मायावी काहीसा जादूगार तर काहीसा विद्याधारी बनलेला होता. मनुष्यप्राण्याला हे ज्ञान नव्हते पण प्राचीन जनावरांना ते ठाऊक होते आणि त्याला ते भीत होते.

ते तिघेही पाणघोडे त्यांचे पुढील पाय नदीच्या काठावर ठेवून आणि शरीर पाण्यामध्ये ठेवून त्या गुहेसमोर थांबले आणि ग्लिकोमॉकला अभिवादनाच्या समूहगायनाने त्यांनी त्याला आवाहन केले. तद्नंतर क्षणार्धात त्या गुहेचे मुख अंधारले गेले आणि अलगद आणि शांतपणे तो प्राणी त्यांच्याकडे सरकत आला. तो प्राणी जवळ आलेला पाहून ते पाणघोडे घाबरले, आणि त्यांनी दोन्ही पायांमध्ये डोके ठेवून त्याला अभिवादन केले.

“ओ ग्लिकोमॉक, आम्ही तुमच्याकडे दयेची आणि स्नेहशील सहकार्याची याचना करण्यासाठी आलो आहोत!” नेप काकांनी सुरूवात केली, आणि नंतर कियोच्या कैदेची आणि त्याने काळया माणसाला त्याच्याकडे परत जाण्याच्या वचनाची हकिकत सांगितली.

“त्याने त्याचे वचन पाळायलाच हवे,” तो पशू निःश्वास टाकीत म्हणाला.

त्या पाणघोड्याची आई मोठ्या दुःखाने विव्हळली.

“पण मी त्या काळ्या माणसावर मात करण्यासाठी आणि त्याचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी त्याला तयार करीन.” ग्लिकोमॉक पुढे म्हणाला.

कियो हसला.

“तुझी नखे असलेला पंजा उचल,” ग्लिकोमॉकने फर्मावले. कियोने आज्ञा पाळली आणि त्या प्राण्याने त्याला त्याच्या केसाळ लांब जीभेने स्पर्श केला. नंतर त्याने चार लुकडे हात त्याच्या वाकलेल्या डोक्यावर धरले आणि तो, नंतर, मनुष्यास किंवा प्राण्यास किंवा कोंबड्याला किंवा माशाला कळणार नाही अशा अज्ञात भाषेत पुटपुटला. नंतर तो पाणघोड्यांच्या भाषेत पुन्हा बोलला. “तुझी कातडी इतकी चिवट झाली आहे की कोणताही माणूस तुला इजा करू शकणार नाही. तुझी शक्ती दहा हत्तींपेक्षा जास्त झाली आहे. तुझे पाय इतके शीघ्रगती झाले आहेत की वाऱ्यालाही मागे टाकशील. त्या माणसाला भीती वाटू दे, पण तुझ्या मनातली भीती तू कायमची काढून टाक, कारण सर्व स्पर्धांमध्ये तू बलाढ्य आहेस!”

नंतर तो भयंकर ग्लिकोमॉक खाली वाकला आणि त्याच्या कानात अधिक सूचनांची कुजबूज त्याने केली तेव्हा जणू ज्वालेसारख्या श्वासाने त्याला होरपळून काढले. त्या तिघा घोड्यांचे आभार ऐकत तो दुसऱ्या मिनिटाला गुहेत सरकला. ते पण पाण्यात सरकले आणि त्यांनी घराकडच्या प्रवासाला सुरूवात केली.

आईचे हृदय आनंदाने भरून आले होते, नेप काकाला ग्लिकोमॉकचे ओझरते दर्शन घडले होते. त्याची आठवण झाल्याबरोबर एकदोनदा त्यांचा भीतीने थरकाप उडाला होता, पण कियो त्याला जेवढे शक्य होईल तेवढा उल्हसित दिसत होता. त्याच्या प्रतिष्ठित थोरल्यांबरोबर पोहायला तो समाधानी नव्हता. तो त्यांच्या शरीराखालील पाण्यात सुरकी मारायचा. त्यांच्याभोवती स्पर्धा करीत फिरायचा आणि घराकडे जाताना संपूर्ण आनंदाने हसायचा.

नंतर त्या सर्व जमातीने राणीच्या मुलाचा कैवार घेतल्याबद्दल शक्तिमान ग्लिंकोमॉकचे आभार मानण्यासाठी प्रार्थना म्हणून मोठी सभा घेतली आणि जेव्हा त्या हसऱ्या आणि खेळकराची त्याला स्वतःला काळया माणसाकडे स्वाधीन करायची वेळ झाली तेव्हा सर्वांनी त्याचे चुंबन घेतले आणि त्याच्या सुरक्षिततेची भीती न बाळगता त्याला निरोप दिला.

कियो मोठ्या उत्साहाने जंगलात गेला आणि जंगलामध्ये जाताना तो नाहिसा होईपर्यंत “गुक, डक, डक, डक!” असा दूरपर्यंत त्याचा आवाज ते ऐकू शकत होते.

गोईने ते दिवस मोजलेले होते, आणि कियो केव्हा येईल हे त्याला ठाऊक होते पण तो त्याच्या कैद्याचा वाढलेला आकार पाहून थक्कच झाला. आणि जो सूज्ञपणे त्याने सौदा केला होता त्याबद्दल तो स्वतःलाच धन्य समजत होता. कियो इतका लठ्ठ झाला होता की त्याने त्याला खायचा निर्धार केला. हेच तो पूर्णपणे लवकर करू शकत होता. आणि त्याच्या सहकारी खेडूतांना त्याच्या शरीराचा वापर करण्याचेही त्याला आठविले. म्हणून त्याने पाणघोड्याला सुऱ्याने भोसकण्याचा प्रयत्न केला, पण त्याची कातडी इतकी चिवट होती की त्याचा सुराच बोथट झाला. नंतर त्याने दुसरी पद्धत अवलंबिली पण कियोला काहीच इजा झाली नाही.

आणि आता खरोखर त्या हसऱ्या आणि खेळकराने उत्तम हर्षभरीत हास्य केले, इतके की जंगलापर्यंत त्याच्या “गुक-डक-डक-डक!” हा प्रतिध्वनी उमटला. गोईने त्याला न मारण्याचे ठरविले कारण ते अशक्य होते. पण ओझे वाहणारे जनावर म्हणून त्याचा उपयोग करायचा असे त्याने ठरवले. तो कियोच्या पाठीवर चढला आणि त्याने त्याला रपेट करायची आज्ञा सोडली. म्हणून कियो चपळाईने व दुडक्या चालीने खेड्यांमधून धावू लागला, त्याचे छोटे डोळे हर्षोत्फुल्लासह चमकत होते.

इतर काळे गोईच्या कैद्यावर खूष झालेले होते आणि त्या हसऱ्या खेळकराच्या पाठीवर स्वार होण्याची त्यांनी त्याची परवानगी मागितली. म्हणून गोईने त्यांच्याशी मनगट्या, शिंपल्यांचे हार आणि छोटे छोटे सोन्याचे दागिने अशा त्या किडूक मिडूकाचा संपूर्णपणे ढीग होत नाही तोपर्यंत सौदा केला. नंतर डझनभर काळे त्याच्या पाठीवर बसून रपेटीचा आनंद घेऊ लागले आणि एक तर त्याच्या नाकाजवळ जाऊन ओरडला,

"धाव धाव, चिखलाच्या कुत्र्या, धाव!"

आणि कियो धावला. वाऱ्याच्या गतीने टांगा टाकीत खेड्यापासून लांब, जंगलातून थेट नदीकिनाऱ्यावर. ती काळी माणसे भीतीने आकांत करू लागली, खेळकर हसऱ्याने डरकाळी फोडली आणि त्यांची धांदल उडाली.

नंतर त्यांना समोर नदीच्या विरूद्ध दिशेला ग्लिंकोमॉकची गुहा दिसू लागली. कियोने पाण्यात उडी मारली आणि तो त्या लोकांना पाण्यावर गटांगळया खायला सोडून पाण्याच्या तळाशी गेला. पण ग्लिंकोमॉकने कियोचे हसणे ऐकलेले होते आणि काय करायचे हे त्याला ठाऊक होते. जेव्हा तो हसरा खेळकर पाण्याच्या पृष्ठभागावर आला तेव्हा त्याने घशातून पाणी उडविले तेव्हा तेथे त्याला एकही काळा माणूस दृष्टोत्पत्तीस पडला नाही.

कियो एकटाच खेड्यात परत आला तेव्हा गोई आश्चर्याने म्हणाला, "माझे भाऊ कोठे आहेत?"

"मला ठाऊक नाही," कियोने उत्तर दिले, "मी त्यांना लांबपर्यंत घेऊन गेलो आणि मी जेथे त्यांना नेले तेथेच ते राहून गेले." गोईला अजून प्रश्न विचारायचे होते, पण काळया लोकांची दुसरी झुंड त्या हसणाऱ्या पाणघोड्याच्या पाठीवर बसण्यासाठी उतावीळपणे वाट पाहत होती. म्हणून त्यांनी किंमत दिली आणि ते चढून त्यांच्या जागेवर बसले, त्यानंतर त्यांनी सर्वात महत्त्वाचे म्हटले,

"धाव चिखलात लोळणाऱ्या धाव!"

आणि कियो पूर्वीसारखा धावला आणि त्यांना घेऊन ग्लिंकोमॉकच्या गुहेपुढे सोडून एकटाच परतला.

पण आता गोई त्याच्या सवंगड्यांच्या दैवाबद्दल चिंताक्रांत झाला होता, कारण तो एकटाच काळा माणूस उरला होता.

म्हणून तो पाणघोड्यावर बसला आणि ओरडला.

"पळ, नदीमधल्या डुकरा-पळ!"

कियो त्याचे आनंदी हास्य हसला. "गुक-डक-डक-डक!" आणि वाऱ्याच्या गतीने पळाला. पण ह्यावेळी तो नदीच्या काठाकडे सरळ गेला जेथे त्याच्या जमातीचे लोक राहत होते आणि नदीत बुडी मारून गोईला प्रवाहाच्या मध्यभागी तरंगत ठेवून तळाशी गेला.

त्या काळ्या माणसाने उजव्या बाजूला असलेल्या नदीच्या काठाकडे पोहत जायला सुरूवात केली, पण तेथे बादशाही जमातीचे अर्धे पाणघोडे आणि नेप काका त्याला मऊ चिखलात तुडविण्यासाठी त्याची वाट बघत होते. म्हणून तो नदीच्या डाव्या किनाऱ्याकडे वळला आणि तेथे राणी मा आणि निक्की काका रागाने डोळे लाल करून त्यांच्या सुळ्यांनी त्याला फाडून टाकण्याची वाट बघत होते.

नंतर गोईने भीतीने किंकाळी फोडली, त्याच्यावर नजर ठेवून त्याच्याजवळ पोहत असलेल्या कियोला पाहून तो ओरडला. "मला वाचव कियो! वाचव मला! मी तुला गुलामगिरीतून मुक्त करीन!"

"ते काही पुरेसं नाही." कियो हसला.




मला वाचव, किओं! वाचव मला!

“मी आयुष्यभर तुझी सेवा करीन!” गोई म्हणाला, “तू जशी आज्ञा करशील तसे मी सर्व काही करेन!”

“एक वर्ष आणि एका दिवसात तू परत येऊन माझा कैदी होशील, जर मी तुला सुटका करून घ्यायला परवानगी दिली तर?” कियो म्हणाला.

“मी करीन, मी करीन, मी करीन!” गोई ओरडला.

“तुझ्या आजोबांची शपथ घेऊन सांग!” कियोने काळया माणसांना शपथ घेण्यासाठी सुळे नसतात याचे स्मरण ठेवून आज्ञा केली. आणि गोईने त्याच्या आजोबांच्या हाडांची शपथ घेतली.

नंतर कियो त्या काळया माणसाकडे पोहत गेला जो कसाबसा त्याच्या पाठीवर बसला. अशा रितीने ते नदीकिनाऱ्यावर आले जेथे कियोने त्याच्या आईला आणि त्याच्या जमातीच्या लोकांना त्याने केलेल्या एक वर्ष एक दिवस झाल्यावर तो गुलाम बनेल या अटीबद्दल सांगितले होते तेथे घेऊन आला.

त्यामुळे त्या काळया माणसाला शांतपणे सुटका करून घेण्याची परवानगी देण्यात आली आणि पुन्हा एकदा तो हसरा खेळकर त्याच्या लोकांबरोबर राहिला आणि आनंदी झाला.

जेव्हा एक वर्ष आणि एक दिवस संपला तेव्हा कियो गोईच्या परतीची वाट बघू लागला. पण तो परत आला नाही, त्यानंतरही नाही आणि कधीच नाही.

कारण काळया माणसाने मनगट्या, शिंपल्यांचे हार आणि छोट्या सोन्याच्या दागिन्यांचे गाठोडे बनविलेले होते आणि तो खूप मैल प्रवास करून दुसऱ्या देशात गेला जेथे प्राचीन आणि बादशाही जमातीतल्या पाणघोड्यांबद्दल

कुणालाही माहिती नव्हती. आणि तेथे त्याने स्वतःला सर्वश्रेष्ठ अधिकारी बनवून घेतले कारण तो खूप श्रीमंत होता आणि त्यामुळे लोक त्याच्यापुढे वाकू लागले.

दिवसेंदिवस तो अहंकारी आणि गर्विष्ठ बनला पण रात्री जेव्हा तो अंथरूणावर तळमळत पडायचा आणि त्याला झोप यायची नाही. त्याची सद्सद्विवेक बुद्धी त्याला अस्वस्थ करायची. कारण त्याच्याकडून त्याच्या आजोबांच्या हाडांची शपथ घेतली गेली होती आणि त्याच्या आजोबांना हाडे नव्हती.

* * * * *

# जादूची चॉकलेट्स

बोस्टन मध्ये डॉ.डॉस नावाचा एक विद्वान वयोवृद्ध रसायन शास्त्रज्ञ राहत होता ज्याला काहीसा जादूटोण्याचा अभ्यास करण्याची हौस होती. तेथेच बोस्टन मध्ये क्लॅरी बेल सूड्स नावाची तरूणी सुद्धा राहत होती, जिच्याजवळ भरपूर पैसा, थोडीशी बुद्धीमत्ता आणि रंगमंचावर जायची तीव्र इच्छा होती.

म्हणून क्लॅरिबेल डॉ. डॉसकडे गेली आणि म्हणाली, “मी ना गाऊ शकते ना नाचू शकते, ना मी काव्य पाठ करू शकते, ना मी पियानो वाजवू शकते, ना मी दोरीवरून चालू शकते, ना मला उड्या मारता येत ना मला लत्ता प्रहार करता येत; तरी मला रंगभूमीवर जायची इच्छा आहे. तर मी काय करू?”

“ ह्या सिद्धीच्या मोबदल्यात तू मला पैसे देण्यास तयार आहेस काय?”

“निश्चितच,” क्लॅरिबेल पैशांची थैली हलवित छणछणाट करीत म्हणाली. “मग उद्या दोन वाजता तू माझ्याकडे ये,” तो म्हणाला.

त्या संपूर्ण रात्रभर तो, ज्याला जादूटोणा म्हणून ओळखला जातो, त्याचा अभ्यास करीत राहिला, त्यामुळे जेव्हा क्लॅरिबेल सूड्स दुसऱ्या दिवशी दोन वाजता आली तेव्हा त्याने तिला काही मिश्रण असलेली पेटी दाखवली ती फ्रेंच चॉकलेट्स सदृश होती.




"ह्या काही जादुई चॉकलेट्स."

“हे प्रगत युग आहे,” तो म्हातारा म्हणाला, “आणि मला स्वतःला आनंद होत आहे की तुझा डॉस काका त्याच्याबरोबर चालतो आहे. आता तुझा एखादा जुन्या पद्धतीचा जादूटोणावाला असता तर त्याने तुला घाणेरड्या कडू औषधाच्या गोळया गिळायला दिल्या असत्या, पण मी तुझ्या अभिरूचीचा आणि सोईचा विचार केलेला आहे. येथे काही जादूची चॉकलेट्स आहेत. जर तू हे फिकट जांभळया रंगाचे चॉकलेट खाल्लेस तर त्यानंतर तू सहजगत्या आणि डौलदारपणे नृत्य करशील जणू काही तू त्याची आयुष्यभर तालीम केलेली होती. गुलाबी रंगाची गोळी खाल्यावर तू बुलबुल पक्ष्यासारखी गोड गाशील. पांढरे खाल्यावर तू वाक्चातुर्यात ह्या प्रदेशातील सर्वात उत्तम वक्ता बनण्यास समर्थ होशील. तपकिरी रंगाचा तुकडा तुझ्यावर मोहिनी मंत्र टाकून तुला रूबेनस्टाईन पेक्षाही उत्तम पियानो वादक बनविल, लिंबासारख्या पिवळया रंगाची गोळी तू खाल्यास लत्ताप्रहाराने तुझा पाय सहजगत्या तुझ्या डोक्यावर सहा फूट उंचीपर्यंत उडवू शकशील.”

“किती मस्त!” क्लॅरिबेल उद्गारली जी हर्षोत्फुल्ल झाली होती. “तुम्ही खचितच खूप हुशार जादूगार आणि समजदार रसायनशास्त्रज्ञ आहात.” आणि तिने पेटीत हात घालून बाहेर काढला.

“अहं!” तो विद्वान म्हणाला, “चेक कृपया.”

“ओह, होय, हमखास! विसरलेच, किती मूर्ख मी!” तिने उत्तर दिले.

त्याने समजूतदारपणे पेटी त्याच्या हातातच ठेवली आणि जेव्हा तिने मोठी रक्कम भरून सही केली तेव्हाच त्याने तिला स्वतःला त्या पेटीला हात लावू दिला.

“तुम्हाला खात्री आहे का की तुम्ही ते हवे तेवढे परिणामकारक बनविले आहे?” तिने सचिंत पृच्छा केली, “माझ्यावर त्यांचा परिणाम होण्यास खूप वेळ लागेल.”

“माझी एकच भीती आहे,” डॉ.डॉसनी उत्तर दिले. “की मी ते खूपच परिणामकारक बनविलेले आहेत. कारण मला पहिल्यांदाच ही अद्‌भुत चॉकलेट्स तयार करण्यासाठी सांगितले गेले आहे.”

“काही काळजी करू नका,” क्लॅरिबेल म्हणाली. “ते जितकी प्रक्रिया माझ्यावर करतील तेवढी उत्तम कृती मी स्वतः करीन.” असे म्हटल्यावर ती निघून गेली. नंतर ती सुक्या मेव्याच्या दुकानात थांबली, पण ती तिची चित्तरंजक मौल्यवान पैटी रिबनच्या काऊंटरवरच विसरली.

नंतर लहानशी बेसी बोस्टविक त्या काऊंटरकडे केसांची रिबन घ्यायला आली आणि तिने तिचे पार्सल त्या पेटीजवळच ठेवले. जेव्हा ती गेली तेव्हा तिने इतर वस्तूंच्या बरोबर ती पेटीही घेतली आणि दुडूदुडू धावत घरी गेली.

जोपर्यंत दिवाणखान्यातील कपाटात ती कोट टांगत नाही तोपर्यंत आणि तिची पुडकी ती मोजत नाही तोपर्यंत तिला कळलेच नाही की तिच्या पार्सलबरोबर एक पेटी सुद्धा आली आहे. नंतर तिने ती उघडली आणि ती उद्गारली, “काय हे, ही तर चॉकलेटची पेटी! कुणीतरी चुकीने ती विसरलेली आहे. त्याची एवढी काही काळजी करायची गरज नाही. थोडेच तुकडे आहेत ते.” म्हणून तिने त्या वस्तू चॉकलेटच्या ताटलीत टाकल्या. जी हॉलच्या टेबलावर होती. आणि चॉकलेटचा एक तुकडा घेत-तिला चॉकलेटस् आवडायचे- आणि खरेदी केलेल्या वस्तू तपासत चटकन तोंडात टाकले.

ते तिच्यासाठी काही खूप नव्हते, कारण बेसी फक्त बारा वर्षांची होती, आणि दुकानात ती इतके पैसे खर्च करील ह्यावर तिच्या आई वडिलांचा विश्वास नव्हता. पण जेव्हा ती केसांवर रिबन लावायचा प्रयत्न करू लागली तेव्हा अचानक तिला पियानो वाजवायची इच्छा झाली आणि शेवटी ती इच्छा इतकी प्रबळ झाली की ती बैठकीच्या खोलीत गेली आणि तिने पियानो उघडला.

त्या छोट्या मुलीने कमालीच्या उत्साहाने त्या दोन संगीतरचना शिकण्याची युक्ती शोधून काढली जी प्रायः अमलात आणताना तिच्या उजव्या आणि डाव्या हाताला झटके बसले ज्यामुळे संगीतात फारच वाईट विसंवाद निर्माण होत होता. पण चॉकलेट बॉनबॉनच्या परिणामामुळे ती खाली बसली आणि तिची बोटे सफाईदारपणे स्वरमंडलावरून फिरू लागली आणि कुशल स्वरसंवादाचा इतका आविष्कार करू लागली की तिच्या वाद्य वादनाने तीच विस्मयचकित झाली.

तथापि ती नांदी होती. दुसऱ्या क्षणात तिने विदोव्हेन (जर्मन संगीतकार लुडविग व्हॅन) च्या पियानोवरच्या सातव्या संगीतावर झेप घेतली आणि ते अत्युत्तम पद्धतीने वाजविले.

तिची आई तो अपूर्व स्वरमाधुर्याचा आवेश ऐकून हा कोण संगीतकार पाहुणा आला आहे हे पाहण्यासाठी जिन्यावरून खाली आली. पण जेव्हा तिच्या लक्षात आले की ती तिची स्वतःचीच मुलगी होती जी इतक्या सर्वोत्तम पद्धतीने वाजवित होती की तिच्या हृदयाला धडकी भरल्याचा झटका आला (की ती त्याच्या वर्चस्वाखाली आली) आणि तो ओसरत नाही तोपर्यंत ती सोफ्यावर बसली.

दरम्यान बेसी संगीताची दुसरी रचना न थकता उत्साहपूर्ण वाजवीत होती. तिला संगीताची आवड होती आणि आता पियानोवर बसल्यावर तिला ते सारे गवसले होते, आणि ती ऐकत होती आणि स्वरयंत्रावरून सफाईदारपणे फिरणारे हात ती बघत होती.

संधिप्रकाश खोलीत अधिक गडद झाला होता आणि बेसीचे वडील घरी आले होते आणि त्यांनी हॅट आणि ओव्हरकोट टांगला आणि त्यांची छत्री त्यांनी खुंटीला टांगली. नंतर त्यांनी कोण पियानो वाजवीत आहे ते बघण्यासाठी बैठकीच्या खोलीत डोकावून पाहिले.

"अप्रतिम!" ते उद्गारले. पण आई आली आणि ती हळुवारपणे तिच्या ओठांवर बोट ठेवीत कुजबुजली,

"तिला अडथळा आणू नका, जॉन! आपल्या मुलीची तंद्री लागली आहे. इतकं उत्कृष्ट संगीत तुम्ही कधी ऐकलं होतं का?"

"का, अलौकिक प्रतिभाशाली आहे ती बेटी!" दिङ्मूढ झालेले वडील धापा टाकत म्हणाले. "सर्वांवर आधिपत्य गाजवतेय! खूप विस्मयकारक आहे हे!"

जेव्हा ते उभे राहून ऐकत होते तेव्हाच सिनेटचे सदस्य तेथे येऊन पोहोचले, त्यांना त्या संध्याकाळच्या भोजनासाठी आमंत्रित केलेले होते. आणि येलचे प्राध्यापक- विद्वत्ताप्रचुर सखोल ज्ञान असलेले- कोट काढण्याआधीच पार्टीत सामील झाले.

बेसी वाजवितच होती आणि ते तीनही वयोवृद्ध दाटीवाटीने उभे राहून, शांतपणे तो विस्मयचकित झालेला समुदाय संगीताचे श्रवण करीत होता आणि भोजनाच्या घंटेची वाट पाहत होता.

श्रीयुत बोस्टविक यांनी, ज्यांना खूप भूक लागलेली होती, त्यांच्या बाजूला असलेल्या टेबलावरील डिशमध्ये असलेल्या चॉकलेट्सपैकी एक गुलाबी रंगाचे चॉकलेट घेऊन खाल्ले. प्राध्यापक त्यांच्याकडे बघत होते म्हणून श्रीयुत बोस्टविक ह्यांनी मोठ्या नम्रतेने त्यांच्याकडे ती डिश धरली. प्राध्यापकांनी पिवळ्या लिंबू रंगाचे चॉकलेट घेतले आणि सचिवाने त्याचा हात पुढे लांबवून

फिकट जांभळ्या रंगाचे चॉकलेट घेतले. त्यांनी ते खाल्ले नाही कारण जेवणावर परिणाम होईल असा विचार करून त्यांनी ते जाकीटाच्या खिशात टाकले. सौ. बोस्टविक तिच्या मुलीला तिने काय केले हे न विचारता तिचे संगीत एकाग्रतेने ऐकत होती. आपण काय केले ह्याचा विचार न करता तिने उरलेला तुकडा घेतला आणि हळूहळू गट्ट केला.

आता ती डिश रिकामी झाली होती, आणि क्लॅरिबेल सूदची मौल्यवान चॉकलेट्स तिच्या मालकीतून कायमची नाहीशी झालेली होती.

अचानक श्रीयुत बोस्टविक जे खूप मोठे गृहस्थ होते त्यांनी एकेरी तारस्वरात बायकी उच्च स्वरात गायला सुरूवात केली. बेसी वाजवत होती त्या स्वराचे ते गाणे नव्हते, आणि विसंवाद इतका धक्कादायक होता की प्राध्यापकांनी स्मित केले, सचिवाने त्याचे हात कानावर ठेवले आणि सौ. बोस्टविक जोरात किंचाळली:

"विल्यम!"

तिचा नवरा ख्रिस्टिन निल्सनची हुबेहूब नक्कल करण्याचा प्रयत्न करीत होता आणि त्याची पत्नी किंवा पाहुणे जे काही म्हणत असतील त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत होता.

सुदैवाने आता जेवणाची घंटा वाजली होती, आणि सौ.बोस्टविकने बेसीला पियानोवरून ओढले आणि तिच्या पाहुण्यांना भोजनगृहात नेले. श्री. बोस्टविक त्यांच्या मागे जात "ग्रीष्मातील अखेरचे गुलाब पुष्प" हे गाणे गात होते. जणू काही खूप संतुष्ट झालेल्या हजारो श्रोत्यांनी पुन्हा एकदा गाण्याची फर्माईश केली होती.

ती गरीब बिचारी बाई तिच्या नवऱ्याचे अप्रतिष्ठित वर्तन बघून खूप हताश झाली. त्याला कसा आवर घालायचा याचे तिला आश्चर्य वाटत होते.

प्राध्यापक नेहमीपेक्षा अधिक गंभीर झाले होते, सचिवांच्या चेहऱ्यावर अपराधाची भावना होती, आणि बेसी तिची बोटे अजूनही अशी फिरवीत होती की जणू काही तिला अजूनही पियानोवर बयासची इच्छा होती.

जरी तिचा नवरा दुसऱ्या गाण्यात घुसला होता तरी सौ.बोस्टविकने त्यांची बसायची सोय करून दिली. नंतर मोलकरणीने पातळ रस्सा आत आणला.

जेव्हा ती प्लेट घेऊन प्राध्यापकाकडे आली तेव्हा ते क्षुब्ध आवाजात किंचाळले,

“उंच धर ते! उंचावर-मी म्हणतो!”

आणि उसळी मारत अचानक लाथ मारून डिशला त्यांनी छतापर्यंत उडविले, तेथून ती डिश खाली येता येता तिच्यातला रस्सा बेसीवर सांडला आणि डिशच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन त्या प्राध्यापकाच्या टकलावर पडल्या.

ह्या निर्घृण कृत्याला पाहून तो सचिव भीतीने उद्गारला आणि त्याने त्यांच्या यजमानीणबाईंकडे दृष्टीक्षेप टाकला.

काही वेळ सौ.बोस्टविक समोर टक लावून थक्क झाल्याच्या आविर्भावात बघत होती, पण आता सचिवाशी तिची नजरानजर झाल्यावर ती सफाईदारपणे त्यांच्यापुढे वाकली आणि जोमदार सुरात तिने ‘लाईट ब्रिगेडवरच्या आरोपाचे’ गाणे गायला सुरूवात केली.

सचिवाला भीतीने कापरे भरले. असा लांछनास्पद गलथानपणा अशा सभ्य कुटुंबात त्याने ना कधी ऐकला होता ना पाहिला होता. त्याचा नावलौकिक धोक्यात आला होता असा त्याला जाणवले. आता त्या खोलीत उघडपणे एखाद्याला मदतीचे आवाहन करता येईल असे कुणीही दिसत नव्हते.

ती मोलकरीण बेभानपणे स्वयंपाकघरात धावत गेली, श्री. बोस्टविक 'ओ मला वचन दे' हे गाणे म्हणत होते, प्रोफेसर झुंबरावरील गोल दिव्यांना लाथ मारण्याचा प्रयत्न करीत होते, सौ.बोस्टविकने गाण्यात बदल करून आता "बोटीवरील जळत्या तक्तपोशीवरील मुलगा" हे गाणे गायला सुरूवात केली होती आणि बेसी बैठकीच्या खोलीकडे चोरून जात, 'फ्लाईंग डचमॅन' ह्या गीताला सुरूवात करीत होती.

त्या सचिवाला खात्री वाटत नव्हती, आणि लगेचच त्याला वेड लागले नव्हते म्हणून त्या बजबजपुरीतून निघून, हॉलमधून त्याची हॅट आणि कोट घेऊन तो झटकन घाईने त्या घरातून निसटला.

त्या रात्री ते उशीराच त्यांचे राजकीय भाषण लिहायला बसले जे त्यांना दुपारी फानेडल हॉलमध्ये द्यायचे होते, पण बोस्टविक ह्यांच्या घरातील घटनांनी त्यांचा धीर खचला होता. त्यामुळे ते स्वतःच्या विचारांचा तोल कसाबसा सावरीत होते पण पुन्हा पुन्हा त्यांच्या विचारात खंड पडत होता. कारण सामान्यतः सुप्रतिष्ठित कुटुंबात घडलेल्या अशा विचित्र घटनांची आठवण झाल्यावर त्यांना कीव येत होती.

दुसऱ्या दिवशी त्यांना श्री. बोस्टविक रस्त्यात भेटले, पण तिरस्कृतीपूर्ण कठोर रागीट नजरेने त्यांच्याकडे बघत ते पुढे निघून गेले. त्यांना वाटले की- खरोखर भविष्यात ह्या सद्‌गृहस्थाला ओळखण्यात वेळ फुकट घालवायचा नाही. श्री. बोस्टविक त्या उघड उघड दाखविलेल्या तुच्छतेने स्वाभाविकपणे संतापले. तरीही त्या दिवसाच्या संध्याकाळपूर्वीच्या मेजवानीच्या वेळच्या घटनांच्या अस्पष्ट स्मृती त्यांच्या मनात अजूनही रेंगाळत होत्या, त्यामुळे सचिवावर चिडण्याचे धाडस करावे की नाही हे त्यांना कळत नव्हते.

शासकीय बैठक ही त्या दिवसाची विशेष गोष्ट होती, कारण सचिवांचे वक्तृत्व बोस्टनमध्ये चांगलेच प्रसिद्ध होते. म्हणून मोठा हॉल गर्दीने भरून गेला होता, आणि पहिल्या रांगांपैकी एकीत बोस्टविक कुटुंब येलच्या विद्वान प्राध्यापकांच्या बाजूला बसलेले होते. ते थकलेले आणि निस्तेज दिसत होते; जणू काही त्यांनी अतिशय वाईट संध्याकाळ घालविली होती, आणि सचिव त्यांना पाहून इतके खिन्न झाले होते की दुसऱ्यांदा त्यांच्या दिशेने त्यांना पाहवले गेले नाही.

जेव्हा महापौर परिचय करून देत होते तेव्हा तो मोठा माणूस खुर्चीमध्ये चूळबूळ करीत होता, योगायोगाने त्याने त्याचा अंगठा आणि बोट कोटाच्या खिशात घातले आणि त्याला फिकट जांभळ्या रंगाचे चॉकलेट सापडले जे त्याने सायंकाळपूर्वी त्यात ठेवलेले होते.

“ह्यामुळे माझा घसा स्वच्छ होईल,” असा सचिवाने विचार केला आणि चॉकलेट त्याच्या तोंडात टाकले.

काही मिनिटांनंतर अफाट श्रोतृजनांसमोर ते उभे राहिले, ज्यांनी मोठ्या उत्साहाने प्रशंसा करून त्यांचे स्वागत केले.

“माझ्या मित्रांनो,” सचिवांनी गंभीर आवाजात सुरूवात केली. “हा प्रामुख्याने मोलाचा आणि खास प्रसंग आहे.”

नंतर ते थांबले, डाव्या पायावर त्यांनी स्वतःचा तोल सांभाळला आणि नृत्यनाट्य नर्तकाप्रमाणे उजवा पाय हवेत उडविला.

आश्चर्य आणि भीतीने तेथे असलेल्या प्रेक्षकांमध्ये गडबड उडाली पण सचिव त्याकडे काहीच लक्ष देत नव्हता असे दिसून आले.

त्यांनी त्यांच्या पायाच्या बोटावरील टोकावर उभे राहून स्वतःभोवती गिरकी घेतली आणि मोठ्या डौलदारपणे डाव्या आणि उजव्या बाजूला पदन्यास

केला, आणि पुढच्या रांगेत बसलेल्या टक्कल असलेल्या माणसाला आश्चर्याचा धक्काच बसला कारण त्याच्या दिशेने सचिवाने कामोत्सुक नजर टाकली.

योगायोगाने तेथे हजर असलेली क्लॅरिबेल सूद जोरात किंचाळून ताडकन उभी राहिली, नाचणाऱ्या सचिवाकडे आरोप करून बोट दाखवून मोठ्याने ओरडली:

“तोच तो माणूस ज्याने माझे चॉकलेट्स चोरले! धरा त्याला पकडा त्याला! पळून जाऊ देऊ नका त्याला!”

तिला अचानक वेड लागले असावे असा विचार करून चौकीदाराने तिला घाईघाईने सभागृहाबाहेर काढले, आणि सचिवाच्या मित्राने त्याला घट्ट पकडले आणि व्यासपीठाच्या प्रवेशद्वाराकडून रस्त्यावर नेले.

तेथे उघड्या गाडीत त्यांना बसविले आणि ड्रायव्हरला त्यांना घरी पोहचविण्याची सूचना केली.

त्या जादूच्या चॉकलेट्सचा परिणाम इतका जबरदस्त होता की त्या गरीब बिचाऱ्या सचिवाला स्वतःवर ताबा ठेवता आला नाही. इतका, की तो त्या गाडीच्या मागच्या भागावर उभा राहिला आणि घर येईपर्यंत मोठ्या जोमाने नृत्य करीत राहिला. तेव्हा लहान मुलांचा घोळका त्या गाडीच्या मागे जात मौज लुटत होता आणि गंभीर प्रकृतीच्या नागरिकांना त्याचे दुःख वाटत होते, जे दुःखाने माना हलवित कुजबुजत होते की “आणखी एका माणसाच्या डोक्यावर परिणाम झाला.”

त्या सचिवाला ह्या आतताई कृत्यामुळे जी लाज आणि शरम वाटली तिच्यापासून मुक्त व्हायला त्या गरीब सचिवाला अनेक महिने लागले. तो ही चमत्कारिक कृती करायला का प्रवृत्त झाला ह्याची ओझरतीही कल्पना त्याला कधीच आली नाही. कदाचित, सुदैवाने त्याच्याकडून ते शेवटचे चॉकलेट खाल्ले गेले होते, कारण त्याचा नाहीपेक्षा खूपच वाईट परिणाम झाला असता.



" तोच तो माणूस ज्याने माझे ऑम्लेटस् चोरलेत!"

साहजिकच क्लॅरिबेल त्या विद्वान रसायन शास्त्रज्ञाकडे पुन्हा गेली आणि तिने दुसऱ्या जादूई चॉकलेट्सच्या पेटीसाठी त्याला सही करून एक चेक दिला, पण तिला आता खूपच काळजी घ्यावी लागणार होती कारण आता ती सुप्रसिद्ध अष्टपैलू नर्तकी झाली आहे.

* * *

ही कहाणी आपल्याला असे शिकवते की- एखादी कृती आपल्याला समजली नसली तरी त्याबद्दल दुसऱ्याची निर्भत्सना करू नये कारण आपल्या बाबतीत काय घडेल ह्याची आपल्याला काहीच कल्पना नसते. ती अजून असा उपदेशही करते की सार्वजनिक ठिकाणी आपले पुडके विसरायचे नाही याची काळजी घ्यावी आणि प्रसंगवशात लोकांची पुडकी शिस्तीने तशीच सोडून द्यावीत.

* * * * *


# कालपुरूषाची कैद

जिम हा काऊबॉयचा मुलगा होता, आणि तो ऍरिझोनाच्या विस्तृत मैदानांवर राहत होता. त्याच्या वडिलांनी त्याला रानटी घोड्याला किंवा तरण्या सांडाला अचूक व उत्कृष्टपणे फासा लावून कसे पकडायचे हे शिकविले होते, आणि जिममध्ये त्याच्या कौशल्याला पुस्ती देणारी शक्ती होती आणि तो ऍरिझोनामधल्या कोणत्याही उत्कृष्ट काऊबॉयसारखा होता.

जेव्हा तो बारा वर्षांचा झाला तेव्हा त्याने पूर्वेला भेट दिली जेथे त्याच्या वडिलांचे भाऊ, काका चार्ल्स राहत होते. जिमने त्याचा फासा बरोबर घेतला होता कारण त्याला फासा टाकण्याच्या कसबाबद्दल अभिमान होता, आणि त्याच्या चुलत भावांना एक काऊबॉय काय करू शकतो हे दाखविण्याची त्याला इच्छा होती.

सुरूवातीला शहरातील मुली आणि मुले यांना जिमच्या फासा फेकण्याचा खांब आणि निरोधन करणारा खेळ पाहण्यात मौज वाटत होती, पण लवकरच ते कंटाळले, आणि जिमने सुद्धा ठरवले की शहरासाठी तो काही योग्य खेळ नव्हता.

पण एके दिवशी कसायाने जिमला त्याच्या घोड्यांपैकी एकावर स्वार होऊन कुरणाकडे जायला सांगितले होते. जे अगोदर मोकळे नव्हते, आणि जिमने उत्साहाने रुकार दिला. त्याची बऱ्याच दिवसांपासून घोड्याच्या पाठीवर स्वार होण्याची इच्छा होती, आणि जुन्या काळात जसे फासा घेऊन जायचे तसे दिसावे असे त्याला वाटले म्हणून त्याने फासा बरोबर नेला.




"तू तुझ्या मूर्खपणाने पृथ्वीवर सर्व गोष्टी कुंठित केलेल्या आहेत"

तो धीरगंभीरपणे रस्त्यावरून प्रवास करीत होता, पण जेव्हा तो खुल्या प्रदेशातल्या रस्त्यावर पोहोचला तेव्हा त्याचे रक्त सळसळले आणि तो विजयोन्मादाने बेफाम झाला आणि कसायाच्या घोड्याला पूर्णपणे बेफाम दौडवू लागला, त्याने खऱ्या काऊबॉयच्या पद्धतीने मुसंडी मारली.

नंतर त्याला अजूनही अधिक स्वातंत्र्य हवे होते आणि मोठ्या शेतातील दांडा खाली पाडून त्याने कुरणावरून घोडा दामटला आणि काल्पनिक गुराढोरांवर फास फेकीत मनाचं समाधान होईपर्यंत आनंदाने आरोळी मारून चित्कार केला.

फासा लांब फेकल्याबरोबर अचानक दोरीच्या वेढ्यात तो कशावर तरी अडकला आणि मैदानापासून जवळ जवळ तीन फूट अंतरावर स्थिर झाला. त्यावेळी दोर घट्ट ताणला गेला आणि जिम जवळ जवळ घोड्यावरून ओढला गेला.

हे अनपेक्षित होते, त्याहीपेक्षा ते आश्चर्यकारक होते, कारण मैदान इतके मोकळे होते की त्यावर झाडाचा एक बुंधादेखील नव्हता. जिमचे डोळे आश्चर्याने विस्फारले गेले. पण त्याच वेळी ओरडण्याचा आवाज आल्यावर त्याला कळून चुकले होते की त्याने काहीतरी पकडले आहे.

“येथे, जाऊ दे! जाऊ दे मला, मी म्हणतो! तुला दिसू शकत नाही का तू काय केलेस ते?”

नाही, जिम काहीच पाहू शकत नव्हता. त्याच्या फासाच्या दोरीत काय अडकले होते हे दिसल्याशिवाय त्याला सोडण्याचा हेतू नव्हता. म्हणून त्याने त्याच्या वडिलांनी शिकविलेल्या जुन्या क्लृप्तीचा अवलंब केला आणि जेथे त्याचा फास अडकलेला होता त्या जागेभोवती कसायाच्या घोड्यावरून फिरू लागला.

अशा रितीने तो जसा जसा जवळ सरकू लागला तसा त्याच्या शिकारीने दोराचा वेढा वर उचललेला त्याला दिसला. अजून त्याने पाहिले की तो कशालाच नाही तर हवेत वेटोळे घालत चाललेला होता. फासाचे एक टोक

खोगिरात असलेल्या गोलाकार कड्याला घट्ट बांधलेले होते. जेव्हा दोर जवळ जवळ पूर्ण गुंडाळला गेला आणि घोड्याने ओढायला सुरुवात केली आणि भीतीने घोडा फुरफुरला, तेव्हा जिम खाली उतरला. घोड्याला नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याने एका हाताने घोड्याचा लगाम धरला आणि तो दोराच्या मागे गेला, आणि क्षणभरातच त्याने फासाच्या वेढ्यात एक म्हातारा घट्ट पकडला गेलेला पाहिला.

त्याच्या डोक्याला टक्कल होते आणि ते उघडे होते पण त्याचे कल्ले कमरेपर्यंत वाढलेले होते. त्याच्या शरीराभोवती पांढराशुभ्र सैल झगा होता. त्याच्या एका हातात मोठा कोयता होता आणि दुसऱ्या काखेत वाळूचे घड्याळ होते.

जेव्हा जिम त्याच्याकडे आश्चर्याने टक लावून बघत होता, तेव्हा तो आदरणीय म्हातारा रागाच्या आवाजात बोलला, "आता, मग जितक्या जलद तुला शक्य होईल तेवढ्या जलद तो दोर काढ! तू तुझ्या मूर्खपणाने सर्व गोष्टी पृथ्वीवर कुंठीत केल्या आहेत. बरे-काय बघतो आहेस टक लावून? तुला ठाऊक नाही मी कोण आहे ते?"

"नाही," जिम मूढपणे म्हणाला.

"ठीक, मी काल-पुरूष आहे. काल! आता त्वरा कर आणि मला मुक्त कर- जर तुला जग यथायोग्य चालावंस वाटत असेल तर."

"कसं काय पकडलं मी तुम्हाला?" जिमने त्याच्या कैद्याला सोडविण्याची काहीएक हालचाल न करता विचारले.

“मला ठाऊक नाही. मी ह्यापूर्वी कधीही पकडलो गेलो नव्हतो,” तो कालपुरूष गुरगुरला. “पण मला वाटते तू मूर्खपणाने तुझा फासा फेकल्याकारणाने हे घडले.”

“मी तुम्हाला पाहिलं नव्हतं.” जिम म्हणाला.

“खचितच तू पाहिलं नाहीस. मी मनुष्यप्राण्यांच्या दृष्टीसाठी अदृश्य आहे, जोपर्यंत ते तीन फुटांवर राहत नाहीत तोपर्यंत, आणि त्यासाठी त्यांच्यापासून मी अधिक अंतरावर राहण्याची काळजी घेतो. म्हणूनच मी हे शेत ओलांडून जात होतो, जेथे मला वाटलं कुणीच नसावं आणि मी पूर्णपणे सुरक्षित रहायला हवं होतं, तुझ्या त्या अचानक फाश्यापासूनसुद्धा. आता, मग,” तो पुढे रागाने म्हणाला, “तू हा दोर काढणार आहेस ना?”

“का काढावा मी?” जिम म्हणाला.

“कारण तू मला पकडल्याक्षणापासून जगातील प्रत्येक गोष्ट थांबली आहे. मला वाटत नाही की सर्व जगाचे व्यवहार, सुख-समाधान, युद्ध आणि प्रेम, क्लेश आणि महत्वाकांक्षा आणि प्रत्येक गोष्ट थांबावी असे तुला वाटत असेल. तू मला प्रेतासारखे बांधून ठेवल्यापासून घड्याळाची टिक टिक थांबलेली आहे.

जिम हसला. तो म्हातारा दोरखंडाच्या वेटोळयात गुडघ्यापासून ते दाढीपर्यंत संपूर्णपणे गुंडाळला गेला होता हे पाहणे खरोखर गमतीचे होते.

“मी करीन तुमची सुटका चांगली,” मुलगा म्हणाला. “सर्वांकडून मी असं ऐकलेलं आहे की तुम्ही जीवन जरा जास्तच धकाधकीचं बनवलं आहे.”

“खरोखरच मी करतो,” कालपुरूषाने निःश्वास सोडून उत्तर दिले. मी ह्याच मिनिटाला झटपट कामचत्का ह्या व्दिपावर अपेक्षित आहे. आणि मला वाटते हा छोटा मुलगा माझी नेहमीची कामे कोलमडून टाकीत आहे!”

“खूप वाईट!” दात विचकवित जिम म्हणाला. “पण काहीही झाले तरी जग थांबले, तेव्हा थोडीशी विश्रांती घ्यायला तुम्हाला काहीच हरकत नाही. जेव्हा मी तुम्हाला सोडून देईन तेव्हा वेळ पुन्हा धावायला लागेल. कोठे आहेत तुमचे पंख?”

“मला नाहीत ते,” म्हाताऱ्याने उत्तर दिले. “ती एक गोष्ट आहे जी कोणीतरी बनविली होती ज्याने मला कधीही पाहिले नव्हते, वस्तुतः मी काहीसा हळू चालतो.”

“कळलं, तुम्ही तुमचा वेळ घेता.” मुलाने शेरा मारला. “त्या कोयत्याचा कशासाठी उपयोग करताहात तुम्ही?”

“लोकांची कत्तल करण्यासाठी,” तो वयोवृद्ध म्हणाला. “प्रत्येक वेळी जेव्हा मी कोयता फिरवितो तेव्हा कुणीतरी मरतो.”

“मग तुम्हाला असे बांधलेल्या अवस्थेत ठेवल्यास मला जीवन वाचविण्याचे पदक मिळायलाच हवे,” जिम म्हणाला.

“काही लोक बराच काळ जिवंत राहतील. पण त्यांना ते कळू शकणार नाही,” तो कालपुरूष विषण्ण स्मित करीत म्हणाला. “म्हणून त्यांना त्याचा काहीच फायदा नाही. तू मला लवकर मुक्त केलेले बरे.”

“नाही,” जिम निर्धाराचा आविर्भाव आणून म्हणाला. “कदाचित मी तुम्हाला पुन्हा कधीही पकडू शकणार नाही, म्हणून मी तुम्हाला काही काळ पकडून ठेवीन, मग बघू जग तुमच्याशिवाय कसे हालचाल करते ते.”

नंतर त्याने म्हाताऱ्याला, जसा तो बांधलेल्या अवस्थेत होता तसा झोका दिला आणि कसायाच्या घोड्याच्या पाठीवर त्याला बांधले आणि स्वतः खोगिरावर बसत तो शहराकडे जायला निघाला. तेव्हा त्याने एका हाताने म्हाताऱ्याला पकडले आणि दुसऱ्या हाताने कूच करीत लगाम पकडला.

जेव्हा तो रस्त्यावर पोहोचला तेव्हा त्याच्या दृष्टीस विचित्र दृश्य दिसले. एक घोडा आणि बग्गी रस्त्याच्या मध्यभागी उभी होती. घोडा दुडकी चाल करण्याच्या कृतीत असून त्याचे डोके आणि दोन पाय हवेत उंच धरलेले होते. पण स्तब्ध अवस्थेत. त्या बग्गीत एक बाई आणि एक माणूस बसलेला होता, पण त्यांचे रूपांतर एका दगडात झालेले होते. ते अधिक निश्चल आणि ताठर राहू शकत नव्हते.

“त्यांच्याजवळ काळ नाहीए!” म्हाताऱ्याने सुस्कारा सोडला. “मला तू आता जाऊ देऊ शकणार नाहीस का?”

“अजून नाही,” मुलाने उत्तर दिले.

शहर येईपर्यंत तो प्रवास करीत राहिला. जेथे सर्व लोक जिमने काळपुरूषाला फासा टाकला होता तेव्हापासून अगदी बरोबर त्याच अवस्थेत होते. सुक्या मालाच्या मोठ्या दुकानासमोर थांबत मुलाने घोडा बांधला आणि तो आत गेला. कारकून माल आणून देत होता आणि गिऱ्हाईकांच्या रांगेसमोर नमुने दाखवित होता. पण प्रत्येक जण जणू अचानक पुतळा बनले होते.

तेथे काहीतरी दुःखदायक दृश्ये त्यात होती. आणि थरकाप उडविणारा गारठा जिमच्या पाठीवर खालीवर वाढायला सुरुवात झाली होती म्हणून तो घाईघाईने बाहेर पडला.

पदपथाच्या कडेला एक गरीब, अपंग भिकारी त्याची हॅट बाहेर काढून बसला होता, आणि त्याच्या बाजूला एक श्रीमंत दिसणारा सद्‌गृहस्थ उभा होता. जो त्या भिकाऱ्याच्या हॅटमध्ये पैसे टाकण्याच्या बेतात होता. जिमला ठाऊक होते की तो सभ्य गृहस्थ खूप श्रीमंत होता. पण थोडासा चिक्कू होता, म्हणून त्याने धावत जाऊन त्याच्या खिशातून पैशाचे पाकीट बाहेर काढण्याचे धाडस केले, ज्यात २० सोन्याचे डॉलर्स होते. एका पै ऐवजी त्याने ते चकाकणारे सोन्याचे नाणे त्या सद्‌गृहस्थाच्या हातात ठेवले आणि ते पैशाचे पाकीट पुन्हा त्या श्रीमंताच्या खिशात ठेवले.

“जेव्हा तो सजीव होईल तेव्हा ही देणगी मिळाल्याचे त्याला आश्चर्य वाटेल,” असा त्या मुलाने विचार केला.

तो पुन्हा घोड्यावर चढला आणि रस्त्याने प्रवास करू लागला. जसा तो त्याच्या खाटिक मित्राच्या दुकानाजवळ आला तसे त्याच्या लक्षात आले की मांसाचे अनेक तुकडे बाहेर टांगलेले होते.

“मला भीती वाटते की ते मांस खराब होईल,” तो बोलला.

“मांस खराब व्हायला काही काळ लागेल,” म्हाताऱ्याने उत्तर दिले.

हे विचित्र पण सत्य पाहून जिमला धक्काच बसला.

“असं दिसतं की काळ सर्व गोष्टीत हस्तक्षेप करतो.”

“होय, तू जगातील अतिशय श्रेष्ठ अशा व्यक्तीला बंदिवान केलेले आहेस.” तो म्हातारा नापसंती व्यक्त करीत म्हणाला. “आणि त्याला पुन्हा जाऊ द्यायची तुला पुरेशी अक्कल नाही.”

जिमने उत्तर दिले नाही. आणि लवकरच ते त्याच्या काकाच्या घराकडे आले जेथे तो पुन्हा घोड्यावरून खाली उतरला. रस्ता लोकांच्या ताफ्यांनी भरलेला होता, पण सारे काही निश्चल होते. त्याच्या दोन लहान चुलत बहिणी शाळेत जाण्यासाठी नुकत्याच दारातून शाळेत जाण्याच्या रस्त्यावर येत होत्या, त्यांच्याजवळ त्यांची पुस्तके आणि लिहायच्या पाट्या त्यांच्या काखेत होत्या, म्हणून त्यांना खाली पडण्यापासून वाचविण्यासाठी जिमला कुंपणावरून उडी मारणे भाग होते.

पुढच्या खोलीत त्याची आत्या बायबल वाचीत होती. ती नुकतीच पान उलटणार होती तेवढ्यात काळ थांबला. जेवणाच्या खोलीत त्याचे काका जेवण संपवीत होते. त्यांचे तोंड उघडे होते आणि जेवणाच्या वेळी वापरण्याचा काटा त्यांनी तोंडासमोर धरला होता, त्याच वेळी त्यांच्या बाजूला असलेल्या घडी केलेल्या वर्तमानपत्रावर त्यांचे डोळे स्थिर झाले होते.

जिमने स्वतः ते मांस खाल्ले- त्याच्या काकांचे आणि जेव्हा ते त्याने खाल्ले तेव्हा तो बाहेर त्याच्या कैद्याकडे गेला.

“एक गोष्ट आहे जी मला समजत नाही,”तो म्हणाला.

“काय ते?” तो कालपुरूष म्हणाला.

“मीच का इकडे तिकडे फिरू शकतो जेव्हा सर्वजण गोठलेले असतात.?”

“त्याचे कारण म्हणजे मी तुझा बंदिवान आहे.” म्हाताऱ्याने उत्तर दिले. तुला जे हवे ते काळाशी करू शकतोस. पण जर तू सावध राहिला नाहीस तर तुला त्याबद्दल दुःख भोगावे लागेल.

जिमने पावाचा पापुद्रा पक्षांकडे फेकला तो हवेत टांगला गेला, वेळ थांबलेला असल्याने तो तेथेच हवेत तरंगत राहिला.

“काही झालं तरी,” तो हसला, मी कुणाही पेक्षा जास्त दिवस जगतो आहे. कुणीच पुन्हा माझी बरोबरी कधी करू शकणार नाही.”

“प्रत्येक जीवनाला त्याचा जिवितकाळ प्रदान केलेला असतो,” तो म्हातारा म्हणाला. “तू योग्य वेळेपर्यंत जीवन जगल्यानंतर माझा कोयता तुझी हत्या करेल.”

“मी तुमच्या कोयत्याला विसरलोच होतो,” जिम विचारपूर्वक म्हणाला.

नंतर एक खोडी काढण्याची भावना त्या पोराच्या डोक्यात आली, कारण त्याला असे वाटले की गंमत करण्याची सांप्रत संधी पुन्हा कधीही प्राप्त होणार नाही.

त्याने काळाला त्याच्या काकांच्या खांबाला दोराने बांधले, जेणे करून तो निसटून जाऊ नये, नंतर तो रस्त्याच्या पलिकडील कोपऱ्यावरच्या किराणा दुकानात गेला. त्याचदिवशी अनपेक्षितपणे सलगमच्या टोपलीवर जिमने पाय दिल्याने दुकानदार त्याच्यावर खूप रागावला होता म्हणून त्याने काकवीच्या पिंपाचा नळच सुरु करून दिला.

"आता काळ सुरू झाल्यावर काकवी जमिनीवर पसरेल, मग चांगलाच गोंधळ उडेल," जिम हसत म्हणाला.

थोडंसं पुढे खाली रस्त्यावर न्हाव्याचे दुकान होते, आणि खुर्चीवर बसलेल्या माणसाने पाहिले की सर्व मुलांनी त्याला संपूर्ण शहरात अतिशय वाईट प्रवृत्तीचा माणूस म्हणून जाहीर केले होते. त्याला मुले आवडत नसत आणि मुलांना ते ठाऊक होते. न्हावी त्या माणसाचे केस शांपूने धूत होता, तेवढ्यात काळ बंदिवान झाला होता. जिम औषधाच्या दुकानाकडे धावत गेला आणि चिकट गोंदाची बाटली घेऊन आला आणि त्या दुष्ट माणसाच्या पिंजारलेल्या केसांवर त्याने तो ओतला.

"ह्यामुळे नक्कीच त्याला आश्चर्य वाटेल, जेव्हा तो जागा होईल," जिमने विचार केला.

तेथे जवळच शाळा होती. जिमने आत प्रवेश केला आणि त्याला शाळेत फारच थोडी मुले जमा झालेली आढळून आले. शिक्षक त्यांच्या लिहिण्याच्या बाकावर बसलेले असून नेहमीप्रमाणे त्यांची मुद्रा कठोर आणि आठ्या घातलेली होती. खडूचा एक तुकडा घेऊन जिमने मोठ्या अक्षरात खालील ओळी लिहिल्याः

"प्रत्येक विद्यार्थ्याला विनंती की आज त्याने वर्गात प्रवेश केल्याक्षणी ओरडावे आणि त्याने त्याची पुस्तके शिक्षकाच्या डोक्यावर कृपया फेकावीत.

सही, प्रा. शार्प."

"ह्यामुळे चांगलाच गदारोळ माजायलाच हवा," तो खोडकर जाताना कुजबुजला.

कोपऱ्यावर मुलीगन पोलिस कुमारी स्क्रॅपलशी अतिशय वाईट शिळोप्याच्या गप्पा मारीत होती, तिला तिच्या शेजाऱ्याबद्दल अप्रिय बोलण्यात

नेहमी आनंद वाटत असे. जिमला वाटले ही खूप चांगलीशी संधी हुकायला नको. म्हणून त्याने पोलिसाची टोपी आणि पितळी बटनांचा कोट काढला आणि कुमारी स्क्रॅपलच्या डोक्यावर ठेवला आणि तिच्या डोक्यावरची पिसांची आणि रिबन लावलेली हॅट मोठ्या उत्साहाने पोलिसाच्या डोक्यावर ठेवली. त्याचा परिणाम इतका हशा पिकविणारा होता की तो पोरगा मोठ्याने हसला, आणि काही चांगली माणसेही त्या कोपऱ्यावर उभी होती. जिमने ठरविले की कु. स्क्रॅपल आणि अधिकारी मुलीगन हे खूप खळबळ निर्माण करतील जेव्हा काळाचा प्रवास सुरु होईल. मग त्या गुराखी पोराला कैद्याची आठवण झाली, आणि तो हूकने अडकवलेल्या खांबाकडे चालत गेला. तो तीन फुटांवर आला तेव्हा त्याला दिसले की काळपुरूष त्या फासाच्या यातायातीत सोशिकपणे उभा होता. तो खूप संतापलेला आणि त्रस्त दिसत होता, तथापि तो गुरगुरला,

“ठीक, केव्हा सोडायचं ठरविलंस तू मला?”

“मी तुमच्या त्या कुरूप कोयत्याबद्दल विचार करीत आहे,” जिम म्हणाला.

“त्याच्याविषयी काय?” काळपुरूषाने विचारले.

“कदाचित मी तुम्हाला जाऊ दिले तर पहिली गोष्ट म्हणजे माझा सूड घेण्यासाठी तुम्ही तो माझ्याकडे फिरवाल,” तो मुलगा उत्तरला. काळपुरूषाने कठोर नजरेने त्याच्याकडे बघितले, पण तो म्हणाला,

“मला हजारो वर्षांपासून हे ज्ञान आहे की, आणि खचितच मला हे ठाऊक आहे की मुलं ही खोडकर आणि बेपर्वा असतात. पण मला मुलं आवडतात, कारण ती मोठी झाल्यावर माझ्या जगातील माणसे आणि लोक बनतात. आता जर तू जसं मला पकडलंस तसं एखाद्या माणसाने मला योगायोगाने पकडलं असतं तर

मला त्याने तात्काळ सोडावे म्हणून मी त्याला भीती घातली असतीच. पण मुलांना फारशी भीती वाटत नाही. मला ठाऊक नाही तसा मी तुला दोष दिला की काय. फार फार वर्षांपूर्वी जेव्हा जग नवे होते तेव्हा मी स्वतः मुलगा होतोच की. पण नक्कीच तू माझ्याशी खूपच गंमत केली, आणि आता मला आशा वाटते की माझे वृद्धत्व पाहून तू माझा नक्कीच आदर करशील. जाऊ दे मला, आणि मी तुला वचन देईन की माझ्या ह्या कैदेबद्दल मी सर्वकाही विसरून जाईन. असे असले तरी ह्या प्रसंगाने मला काही खूप इजा झाली नाही कारण कुणालाच कधीच कळणार नाही की मी तीन तासांसाठी किंवा अधिक काळ, काळ थांबला होता म्हणून."

"ठिक आहे," जिम आनंदाने म्हणाला. "तुम्ही मला वचन दिले की तुम्ही माझी कत्तल करणार नाही म्हणून मी तुम्हाला जाऊ देतो." पण त्याचा असा समज होता की शहरातील लोक पुन्हा जिवंत होतील तेव्हा त्यांना संशय येईल की काळ थांबला होता म्हणून.

त्याने काळजीपूर्वक त्या म्हाताऱ्याचा दोर काढला. तो मुक्त झाला तेव्हा त्याने कोयता खांद्यावर घेतला, त्याचा पांढरा शुभ्र झगा पुन्हा व्यवस्थित केला आणि मान डोलावून निरोप घेतला.

दुसऱ्या क्षणाला तो मुक्त झालेला होता, आणि वर्दळीचा सळसळाट, गडगडाट आणि डरकाळया फोडीत हलकासा धक्का देत जग पुन्हा नियमित व पूर्ववत झाले.

जिमने त्याचा फास गुंडाळला, खाटकाच्या घोड्यावर बसला आणि हळूहळू खाली रस्त्यावरून प्रवास करू लागला.




ती रागाने तिच्या हाताने मुलिगनच्या तोंडावर मुष्टी प्रहार करीत होती.

मोठी किंचाळी कोपऱ्यावरून आली जेथे लोकांची मोठी गर्दी जमली. घोड्यावरील त्याच्या जागेवरून जिमने बघितले, पोलिसाच्या गणवेशातील कुमारी स्क्रॅपल रागाने मुलीगनच्या तोंडावर मुष्टीप्रहार करीत होती, तेव्हा अधिकारी रागाने स्क्रॅपलची हॅट पायाने तुडवीत होता जी तो डोक्यातून काढताना गर्दी कुचेष्टेने हसत होती.

जेव्हा तो शाळेजवळ आला तेव्हा त्याने मोठ्या जमावाच्या किंचाळया ऐकल्या आणि प्रा. शार्पच्या फळयावरील सहीमुळे जमलेल्या जमावाचे हिंसक वर्तन मोडून काढताना त्यांच्यावर मोठा कठीण प्रसंग गुदरला होता.

न्हाव्याच्या खिडकीतून त्याला दिसले की तो “दुष्ट माणूस” वेडापिसा होऊन न्हाव्याला केस विंचरण्याच्या ब्रशने चोपून काढीत होता, जेव्हा त्याचे केस बंदुकीच्या संगिनीसारखे सर्व दिशांकडे उभे राहिले होते. आणि किराणा दुकानदार, “आग, आग” म्हणून दाराबाहेर पळत होता. तो जेव्हा जिथे पाय ठेवी तिथे त्याच्या बुटाचे काकवीने माखलेले ठसे असत.

जिमचे मन आनंदाने फुलून गेले, ज्या खळबळीला तो कारणीभूत झाला होता ती पाहत तो मजा लुटीत होता. तेव्हाच कुणीतरी त्याचा पाय धरून त्याला घोड्यावरून खाली ओढले.

“काय करतोस येथे तू, ए बदमाश?” तो कसाई रागाने ओरडला, “तू मला वचन दिले नव्हते का की ह्या प्राण्याला प्लिम्पटनच्या गायरानात सोडीन म्हणून? आणि तू ह्या गरीब बिचाऱ्या म्हाताऱ्या घोड्यावर बसून एखाद्या सज्जन गृहस्थासारखा आरामात फिरतोयस!”

“ही खरी गोष्ट आहे,” जिम आश्चर्याने म्हणाला, “मी घोड्याबद्दल पूर्णपणे विसरलो होतो!”

* * *

ही गोष्ट आपल्याला काळाचे अतिशय श्रेष्ठ महत्त्व आणि त्याला थांबविण्यात किती वेडेपणा असतो हे शिकविते. कारण तुम्ही जिमसारखे काळाला अचल बनवू शकण्यात यशस्वी व्हाल तर जग हे अनाकर्षक आणि निखालस असुखावह होईल.


* * * * *

# अद्भुत पंप

फार वर्षांपूर्वी नव्हे, खडकाळ नापीक न्यू इंग्लंडच्या मळयात एक माणूस आणि त्याची पत्नी राहत होती. ते अतिशय विचारशील, प्रामाणिक आणि कष्टाळू असून सकाळपासून अंधार पडेपर्यंत त्यांच्या निकृष्ट जमिनीत त्यांच्या तुटपुंज्या जीवनाला आधार देण्यासाठी खपत असत.

त्यांचे घर छोटेसे, एका मजल्याचे, टेकडीच्या उतारावर होते, आणि त्याच्या अवतीभवती इतके दगड पसरले होते की त्या जमिनीतून तुरळक हिरवळ वाढायची. त्या टेकडीच्या पायथ्याशी घरापासून एक चतुर्थांश मैल वळणावरच्या रस्त्यावर एक निर्झर होता आणि तेथून ती बाई टेकडीवर पाणी भरून घेऊन जायची. हे कंटाळवाणे काम होते, त्यामुळे ह्या कष्टाने वाकून वाकून, झुकून झुकून ती कृश झाली होती. तरीही- ती नम्रपणे आणि एकनिष्ठेने तिचे कर्तव्य पार पाडायची. घरकाम, पाणी भरणे आणि त्यांच्या जमिनीच्या सुपीक भागावर उगवलेल्या तुटपुंज्या पीकपाण्याबाबत ती तिच्या नवऱ्याला कुदळ फावडे घेऊन मदत करायची.

एके दिवशी ती खाली झऱ्याकडील वाटेवरून गेली. तिचे मोठे बूट दगडगोट्यांना डाव्याउजव्या बाजूला विखरीत होते, तिने बघितले की एक मोठा किडा पाठीवर पडलेला होता व तो त्याच्या छोट्या पायांनी धडपड करीत होता जेणेकरून त्याचे पाय जमिनीला लागावे. परंतु ते करण्यात तो यशस्वी होऊ शकत नव्हता. म्हणून ती बाई जी प्रेमळ अंतःकरणाची होती, खाली बसली आणि हळुवारपणे त्या किड्याला तिने बोटांनी उचलून सरळ केले. तात्काळ तो रस्त्यापासून दुडूदुडू धावत गेला आणि ती झऱ्यावर गेली.




" का बोलू नये मग ! " किडा म्हणाला.

दुसऱ्या दिवशी जेव्हा ती पाणी आणायला गेली तेव्हा तिला तो किडा पुन्हा पाठीवर पडलेला दिसला व तो सरळ होण्याचा प्रयत्न करताना पाहून तिला खूप आश्चर्य वाटले. परत एकदा ती बाई थांबली आणि तिने त्याला पुन्हा पायावर उभे केले. तिने वाकून त्या प्राण्याकडे बघितले तेव्हा तिला हलकासा आवाज आला. “ओह, खूप आभारी आहे मी तुमचा! मला वाचविल्याबद्दल मी खूप आभारी आहे तुमचा!”

एक किडा तिच्याच भाषेत बोलत आहे हे पाहून ती काहीशी घाबरली, ती थोडीशी मागे सरकली आणि उद्गारली,

“अरे देवा! तू खात्रीने माणसासारखा बोलूच शकत नाहीस!”

भीतीतून सावरल्यावर ती पुन्हा त्या किड्याजवळ वाकली ज्याने तिला असे उत्तर दिलेः “का बोलू नये मी, जर मला काही सांगायचे असल्यास?”

“कारण तू एक किडा आहेस.” त्या बाईने उत्तर दिले.

“ते खरं आहे, आणि तू माझा जीव वाचविलास- शत्रूंपासून, चिमण्यांपासून तू माझं रक्षण केलंस. आणि ही दुसरी वेळ आहे, तुम्ही मला मदत करायची, म्हणून मी तुमच्या कृतज्ञतेचे देणे लागतो. मनुष्यप्राण्याप्रमाणेच किडेसुद्धा स्वतःच्या जीवाला जपतात किंमत देतात, आणि मी तुमच्यापेक्षा जास्त महत्त्वाचा प्राणी आहे, तुमच्या अज्ञानाची समज असेल. पण मला सांगा तुम्ही दररोज ह्या झऱ्यावर का येता?”

“पाण्यासाठी,” त्या बोलणाऱ्या किड्याकडे वेड्यासारखे टक लावून पाहत तिने उत्तर दिले.

“कष्टाचे काम नाही का ते?” त्या प्राण्याने पृच्छा केली.

“होय, पण टेकडीवर पाणी नाही ना,” ती म्हणाली.

“मग विहीर खोद आणि त्याला पंप लाव,” किड्याने उत्तर दिले.

तिने मान हलवली.

“माझ्या माणसाने एकदा प्रयत्न करून पाहिला, पण तेथे पाणी लागले नाही.” ती मोठ्या दुःखाने म्हणाली.

“पुन्हा प्रयत्न कर,” किड्याने आज्ञा केली. “आणि तुझ्या दयाळूपणाची परतफेड म्हणून मी असे वचन देतो की जर तुम्हाला पाणी मिळाले नाही तर दुसरे काहीतरी तुमच्यासाठी अधिक मौल्यवान मिळेल. तुम्ही आता जायलाच हवं. पण विसरू नका, विहीर खोदा.” आणि नंतर निरोप घेण्यासाठी न थांबता तो त्वरेने पळाला आणि दगडांमध्ये नाहीसा झाला.

त्या किड्याने जे काही सांगितले त्यामुळे ती बाई गोंधळलेल्या अवस्थेत घरी परतली, आणि जेव्हा तिचा नवरा कामावरून घरी आला तेव्हा तिने संपूर्ण गोष्ट त्याला सांगितली.

त्या गरीब माणसाने खोलवर विचार केला आणि नंतर ठामपणे म्हटले, “प्रिये, त्या किड्याने जे काही सांगितले त्यात सत्य असू शकते. अजूनही जगात जादूटोणा असू शकतो, ज्याअर्थी तो किडा बोलू शकतो, आणि जर तेथे जादूटोण्यासारखी काही गोष्ट असेल तर कदाचित मिळेल आपल्याला पाणी त्या विहीरीतून. विहीरीतून पाणी काढण्यासाठी जो पंप मी विकत घेतला होता, पण विहीर कोरडी निघाल्याने तो पंप आता कोठारात पडला आहे. आणि किड्याच्या

सल्ल्याप्रमाणे विहीर खोदण्यासाठी परिश्रम घ्यावे लागतील. परिश्रम तर मी करीन, आणि विहीर खोदेन."

दुसऱ्या दिवशी त्याने सुरूवात केली, आणि खूप खोल खोदले. इतके की त्याला विहीरीतून वर यायला खूप कष्ट पडले, पण पाण्याचा एक थेंबही त्याला गवसला नाही.

"कदाचित तुम्ही पुरेसं खोदलं नसेल." त्याची पत्नी म्हणाली, जेव्हा त्याने त्याच्या अपयशाबद्दल सांगितले.

म्हणून त्याने पुढच्या दिवशी एक शिडी बनवली जी त्याने त्या खड्ड्यात टाकली आणि नंतर तो खोदू लागला, खोदू लागला, अगदी शिडीचे टोक जेमतेम वर पोहचेपर्यंत. पण तरीही अजून पाणी लागले नाही.

दुसऱ्या दिवशी जेव्हा ती बाई बादली घेऊन झऱ्याजवळ गेली तेव्हा तिला तो किडा तिच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर बसलेला दिसला. म्हणून ती थांबली आणि म्हणाली,

"माझ्या नवऱ्याने विहीर खोदली, पण पाणी लागले नाही."

"त्यांनी विहीरीत पंप टाकला का?" किड्याने विचारले.

"नाही," तिने उत्तर दिले.

"मग मी फर्मावल्याप्रमाणे करा, पंप आत टाका आणि मी वचन देतो की जरी पाणी मिळाले नाही तरी काहीतरी अधिक मौल्यवान मिळेल." असे म्हणून किटक दगडाखाली सरकला आणि नाहीसा झाला. ती बाई घरी गेली आणि किटकाने जे सांगितले ते तिने नवऱ्याला सांगितले.

“ठीक,” तो साधाभोळा माणूस उत्तरला, “असा प्रयत्न करण्यात काही नुकसान नाही.”

म्हणून त्याने कोठारातून पंप घेतला आणि विहीरीत बसविला. आणि नंतर त्याने मूठ पकडली आणि उपसायला सुरूवात केली. तेव्हा त्याची पत्नी बाजूला उभी राहून काय होईल ते बघू लागली.

पाणी आले नाही, पण थोड्या मिनिटातच त्या पंपाच्या नळातून सोन्याची नाणी बाहेर पडली. आणि नंतर अजून एक आणि अजून एक असे अनेक पसाभर असा जमिनीवर छोटासा ढीग पडला.

नंतर त्या माणसाने पंप करणे थांबविले आणि मग ती सोन्याची नाणी गोळा करून त्याच्या बायकोच्या वस्त्रात भरायला तिच्या मदतीला धावला. पण ह्या सनसनाटीने आणि हर्षाने त्यांच्या हातांचा थरकाप उडाला व कशीबशी त्यांनी ती चमकणारी नाणी गोळा केली.

शेवटी तिने ती नाणी तिच्या उरापर्यंत गोळा केली आणि ते घरी पळाले, जेथे त्यांनी टेबलावर सर्व नाणी ओतली आणि मोजली.

सर्व नाण्यांवर अमेरिकेच्या टाकसाळीच्या अभिलेखाचा शिक्का होता आणि प्रत्येक नाण्याची किंमत पाच डॉलर्स होती. काही झिजलेली होती व काही वापरून वापरून रंगहीन झालेली होती, तर काही चमकणारी आणि नवीन होती, जणू काही ती फारशी हाताळलेलीच नव्हती.

जेव्हा त्यांनी सर्व नाण्यांचा हिशोब केला, तेव्हा ते तीनशे डॉलर्स भरले. अचानक ती बाई बोलली, “अहो तो किडा खरंच म्हणाला होता की विहीरीतून पाण्यापेक्षाही मौल्यवान वस्तू तुम्हाला मिळेल. पण कुणीतरी ह्या रस्त्याने इकडून जाईल आणि आपले गुपित बाहेर पडेल म्हणून पंपाची मूठ काढा व पळा लगेच.”

म्हणून तो माणूस पंपाकडे पळाला आणि त्याने पंपाची मूठ काढली जी त्याने घरी आणून अंथरूणाखाली लपवून ठेवली. त्या रात्री त्यांचा जराही डोळा लागला नाही. अंथरूणातच पडल्या पडल्या ते त्यांच्या सुदैवाबद्दल आणि त्या पिवळ्या सोन्याचे काय करावे ह्याबद्दल विचार करीत होते. त्यांना त्यांच्या संपूर्ण गतकालीन आयुष्यात त्यांना अल्पशा डॉलर्सशिवाय कधीच काहीच मिळाले नव्हते. आणि आता त्यांच्याकडचे तुटके चहाभांडे सोन्याच्या नाण्यांनी जवळ जवळ खच्चून भरले होते.

पुढचा दिवस रविवारचा होता. ते लवकर उठले आणि त्यांची संपत्ती सुरक्षित आहे की नाही हे पाहण्यासाठी ते पळाले. ते तेथेच होते, चहाच्या भांड्यात खच्चून भरलेला ढीग. त्यामाणसाने शेगडी पेटवण्यापूर्वी आणि त्या बाईने न्याहरी बनविण्यापूर्वी त्यांची नजर त्यावर खिळून रहावी असे त्यांना वाटत होते.

जेव्हा ते त्यांचे साधंसं जेवण घेत होते तेव्हा ती बाई म्हणाली,

“आपण आज चर्चमध्ये जाऊ आणि आपल्याला अचानक लाभलेल्या संपत्तीबद्दल देवाचे आभार मानू. आणि मी त्या धर्मगुरूला ह्या सोन्याच्या नाण्यांपैकी एक देईन.”

“आपण चर्चला जाणं हे उत्तमच होईल.” तिच्या नवऱ्याने उत्तर दिले, “आणि देवाचे आभारसुद्धा मानायला हवेत. पण पैसे कसे खर्च करायचे ते मी रात्रीच ठरवून टाकले आहे म्हणून धर्मगुरूला द्यायला काहीच उरणार नाही.”

“आपण अधिक उपसू शकतो,” ती बाई म्हणाली.

“कदाचित, किंवा कदाचित नाही.” तो दक्षतेने म्हणाला. “जे काही आपल्याजवळ आहे त्यावरच आपण समाधान मानू, कारण विहीरीत अजूनही अधिक असेल की नाही मी सांगू शकत नाही.”

“मग जा आणि शोधा,” तिने प्रत्युत्तर दिले. “कारण मला काळजी वाटते, धर्मगुरूला काहीतरी द्यायला हवं, जो माणूस गरीब आणि लायक आहे.”

म्हणून त्या माणसाने अंथरूणाखालून पंप आणि मूठ घेतली आणि त्या जागी बसविली. नंतर त्याने खूप मोठी लाकडी बादली घेतली व ती नळाखाली ठेवली आणि उपसायला सुरूवात केली. त्या बादलीत सोन्याची नाणी पडायला लागली हे पाहून त्यांना खूप हर्ष झाला, आणि ती काठोकाठ भरून गेलेली पाहून त्या बाईने दुसरी बादली आणली. पण आता ती धार अचानक बंद पडली, आणि तो माणूस मोठ्या आनंदाने म्हणाला,

“प्रिये, आजच्या दिवसासाठी एवढं पुरे! आपण मोठ्या प्रमाणावर संपत्ती जोडली आहे आणि धर्मगुरूला सोन्याचे नाणे मिळणार. खरोखर मला वाटतं की दानपेटीतही आपण पैसे टाकावेत.”

नंतर चहाचे भांडे एवढी सोन्याची नाणी पेलवू शकणार नाही म्हणून त्या शेतकऱ्याने ती बादली लाकडाच्या पेटीत ओतली. आणि झाडांच्या फांद्या आणि वाळलेली पाने त्यावर पसरविली जेणेकरून त्याखाली काय आहे ह्याचा कुणाला संशय येणार नाही.

त्यानंतर त्यांनी उत्तम कपडे परिधान केले आणि ते चर्चला जाण्यासाठी निघाले. प्रत्येकाने त्या धर्मगुरूला भेट म्हणून देण्यासाठी चहाच्या भांड्यातून एक एक चमकणारे सोन्याचे नाणे घेतले.

टेकडीवरून खाली दरीत व ती ओलांडून ते चालत गेले, ते इतके आनंदी आणि उल्हसित झाले होते की तेवढे अंतर चालताना त्यांना काहीच वाटले नाही. शेवटी ते गावातील एका छोट्या चर्चमध्ये आणि प्रार्थना सुरू होण्याच्या वेळेलाच आत पोहोचले.

धर्मगुरूसाठी आणलेल्या त्यांच्या संपत्ती आणि भेटवस्तूबद्दल त्यांना अभिमान वाटत होता. उपधर्मगुरू केव्हा ती दानपेटी त्यांच्याकडे पाठवितात ह्याची ते आतुरतेने वाट पाहत होते. शेवटी ती पेटी आली आणि शेतकऱ्याने त्या पेटीवर त्याचा हात उंच धरला जेणेकरून तो काय टाकतो आहे हे चर्चमध्ये प्रार्थनेसाठी जमा झालेल्या सर्व ख्रिस्ती लोकांच्या लक्षात यावे. त्या बाईनेही तसेच केले, त्यांना त्या सुशील धर्मगुरूला ते देण्यात खूपच महत्त्वाचे व सुखद वाटत होते.

सोन्याची नाणी त्यांना त्या पेटीत टाकताना जेव्हा धर्मगुरूने व्यासपीठावरून पाहिले तेव्हा त्याचा त्याच्या डोळयांवर विश्वासच बसत नव्हता. तथापि जेव्हा ती पेटी टेबलावर ठेवण्यात आली तेव्हा त्याने ती दोन सोन्याची नाणी बघितली तेव्हा तो इतका आश्चर्यचकित झाला की तो त्याचे प्रवचनच विसरला.

जेव्हा प्रार्थना संपून लोक चर्चच्या बाहेर जाऊ लागले तेव्हा त्या सुशील माणसाने त्या शेतकऱ्याला आणि त्याच्या बायकोला थांबविले आणि विचारले, “हे इतके सोने तुम्हाला कोठे मिळाले?”

त्या बाईने मोठ्या आनंदाने सांगितले की तिने त्या किड्याला कसे वाचविले आणि त्या बदल्यात त्यांना त्या आश्चर्यकारक पंपाद्वारे किती मोठे बक्षिस मिळाले. त्या धर्मगुरूने गंभीरपणे सर्व ऐकले आणि जेव्हा गोष्ट संपली तेव्हा तो म्हणाला,

“लोककथेनुसार अशा विचित्र गोष्टी युगानुयुगे घडत असतात, आणि मला आता असे आढळून आले की अशा गोष्टी आजसुद्धा घडतात. कारण तुमच्या गोष्टीत तो किडा आढळला जो बोलू शकत होता आणि तुम्हाला एवढी संपत्ती प्रदान करण्याची त्याच्यात शक्ती आहे.” नंतर त्याने त्या सोन्याच्या नाण्यांकडे काळजीपूर्वक पाहिले आणि तो पुढे म्हणाला,

“हे सोन्याचे नाणे एकतर परिकथेतील सोने असावे किंवा हे खरेखुरे धातूचे आहे ज्यावर अमेरिकन सरकारच्या टाकसाळीचा शिक्का आहे. जर ती नाणी परिकथेतील असतील तर ती चोवीस तासात नाहीशी होतील, म्हणून मग ते कुणासाठीच ठीक नसणार. जर ते खरोखरचे पैसे असतील तर तुमच्या किड्याने ते हमखास कुणाचे तरी चोरलेले असणार आणि ते तुमच्या विहिरीमध्ये ठेवले असणार. कारण सर्व पैसे कुणाच्या तरी मालकीचे असणार आणि जर तुम्ही ते प्रामाणिकपणे कमविले नसतील, पण तुम्ही उल्लेख केल्याप्रमाणे ते खरोखर रहस्यमय पद्धतीने आले असतील तर ते ज्याच्या मालकीचे होते त्याच्या संमतीशिवाय ते घेतलेले असतील. खरे पैसे कोठून येऊ शकले असतील?”

ह्या विधानाने शेतकरी आणि त्याची बायको गोंधळून गेले आणि एकमेकांकडे अपराधीपणे पाहू लागले, कारण ते प्रामाणिक होते आणि कुणावर अन्याय करण्याची त्यांची इच्छा नव्हती.

“मग तुम्हाला वाटतं की त्या किड्याने ते पैसे चोरले असतील?” ती बाई म्हणाली.

“त्याच्या जादूटोण्याच्या शक्तींनी त्याने बहुधा त्याच्या कायदेशीर मालकाकडून ते पैसे घेतले असतील. काही किडे जरी बोलू शकत असतील तरी त्यांना चांगल्या वाईटातील फरक कळू शकत नाही व ते तसे सांगू शकत नाहीत.

तुमच्या दयाळूपणाच्या मोबदल्यात बक्षिस देण्याच्या इच्छेने त्या किड्याने ते पैसे विधीवत त्या मालकाकडून घेतले आणि तुम्ही पंपाने उपसून ते मिळविले."

"कदाचित ते खरोखर काल्पनिक सोनं आहे," त्या माणसाने सुचविले. "जर तसं असेल तर आपण शहरात जाऊ आणि ते नाहीसे होण्याच्या आत खर्च करून टाकू."

"ते चुकीचं होईल," धर्मगुरूने उत्तर दिले. " कारण व्यापाऱ्यांजवळ ना पैसे असतील ना माल असेल, असे खोटे सोने त्यांना देणे म्हणजे त्यांना लुटणे असेल."

"काय करावे मग आम्ही?" ती गरीब बाई तिचे हात काळजीने आणि निराशेने चोळत म्हणाली.

"जा घरी आणि उद्यापर्यंत वाट पहा. जर सोनं तुमच्या ताब्यात असेल तर ते खरं सोनं आहे, काल्पनिक नाही. पण जर ते सोनं खरं असेल तर ते तुम्ही तुमच्या कायदेशीर मालकासाठी राखून ठेवायचा प्रयत्न करायलाच हवा. ही नाणीसुद्धा परत घेऊन जा, जी तुम्ही मला दिलीत कारण ते प्रामाणिकपणे न मिळाल्यामुळे मी ते स्विकारू शकत नाही.

त्यांनी जे काही ऐकलं त्यामुळे अस्वस्थ होऊन मोठ्या दुःखाने ती गरीब माणसे घरी परतली. झोपेशिवाय दुसरी रात्र गेली आणि सोमवारी सकाळी उजाडल्यावर ते उठले आणि सोने अजूनही दृग्गोचर आहे की नाही ते बघण्यासाठी धावत गेले.

"अखेरीस हे खरे पैसे आहेत!" तो माणूस ओरडला, कारण एक नाणे सुद्धा नाहीसे झालेले नव्हते.

जेव्हा ती बाई त्यादिवशी झऱ्याकडे गेली तेव्हा तिने त्या किड्याला शोधले आणि तिच्या अपेक्षेप्रमाणे तो त्या सपाट दगडावर बसलेला होता.

“आता तू खूष आहेस ना?” त्या किड्याने ती बाई त्याच्यापुढे थांबल्याबरोबर तिला विचारले.

“आम्ही अत्यंत दुःखी आहोत,” तिने उत्तर दिले. “कारण जरी तुम्ही आम्हाला खूप सोनं दिलं, तरी आमचे सुशील धर्मगुरू म्हणाले की हे सोने दुसऱ्या कुणाच्या तरी मालकीचे असणार आणि ते तुम्ही आम्हाला बक्षिस देण्यासाठी चोरून आणले असणार.”

“तुमचा धर्मगुरू कदाचित खूप चांगला माणूस असणार,” काहीशा संतापाने त्या किड्याने प्रत्युत्तर दिले. “पण तो निश्चितच खूप मोठा विद्वान नाही. तथापि तुम्हाला जर सोनं नको असेल तर जसं मी तुम्हाला सोनं दिले तसेच मी सहजरित्या ते तुमच्याकडून परत काढून घेऊ शकतो.”

“पण आम्हाला ते हवंच आहे!” ती बाई घाबरून म्हणाली. “ते जर प्रामाणिकपणे येत असेल तर,” ती पुढे म्हणाली.

“ते चोरलेलं नाही,” तो किडा फुरंगटून उत्तरला, “आणि आता कुणाच्याही नाही पण तुमच्या मालकीचे आहे. जेव्हा तू माझा जीव वाचविलास तेव्हा तू गरीब आहेस हे जाणून तुला बक्षिस कसं द्यावं हा विचार मी करीत होतो, मी ठरविलं की कुठल्याही वस्तूपेक्षा सोनंच तुला अतिशय सुखी करू शकेल.”

“तुम्हाला हे ठाऊक असायलाच हवं ,” तो पुढे बोलू लागला, “की मी जरी खूपच लहान आणि क्षुल्लक दिसतो, तरी मी खरोखर सर्व किड्यांचा राजा

आहे. आणि माझी प्रजा माझ्या बारीक सारीक इच्छांची सुद्धा आज्ञा पाळतात. जमिनीच्या तळात राहत असल्याने, त्यांना नेहमी सोन्याची नाणी आणि पैसे सापडतात जे माणसांकडून चिरा किंवा खोल तड्यांमध्ये पडल्यावर ते मातीने झाकले जातात किंवा गवत किंवा रानटी वेलींनी झाकले जातात. जेव्हा जेव्हा माझ्या प्रजेला असे पैसे सापडतात तेव्हा तेव्हा ते ह्या गोष्टींची वार्ता मला कळवितात. पण मी ते तसेच पडू देतो कारण किड्यांना त्यांचा उपयोग असू शकत नाही. तथापि, जेव्हा मी तुला हे सोने द्यायचे ठरविले तेव्हा ते कोणत्याही मनुष्यप्राण्याकडून न चोरता मी ते कसे मिळविले हे मला ठाऊक होते. हरवलेले सोने ह्या टेकडीवर आणण्यासाठी माझ्याकडून हजारो किड्यांना पाठविण्यात येते हे सत्य तू स्वीकारू शकतेस. पण तुझ्या नवऱ्याने ती विहीर रिकामी केली तेव्हा देशाच्या सर्व भागातून ते सोने येथे पोहचू लागले, आणि रात्रीच्या वेळी माझ्या लोकांनी ते त्या विहीरीत टाकले. म्हणून तू स्पष्ट सद्सद्विवेकबुद्धीने आणि तू ते काहीच चुकीचे करीत नाहीस अशी जाणीव ठेवून ते सोने वापरू शकतेस."

ह्या स्पष्टीकरणाने त्या बाईला आनंद झाला. आणि जेव्हा ती घरी परतली आणि तिच्या नवऱ्याला तो किडा काय म्हणाला हे तिने सांगितले तेव्हा त्यालाही खूप आनंद झाला.

म्हणून त्यांनी अचानक खूप नाणी घेतली आणि ते अन्नधान्य, कपडेलत्ते आणि अनेक ज्या वस्तूंची त्यांना गरज होती त्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी ते बाजारपेठेत गेले. पण त्यांना त्यांच्या नव्याने प्राप्त झालेल्या संपत्तीबद्दल इतका गर्व झाला होता की त्यांनी तो लपवायचे कष्ट घेतले नाही. त्यांना असं वाटत होतं की प्रत्येकाला समजावं की त्यांच्याजवळ पैसा होता. त्या खेड्यातील काही दुष्ट माणसांना त्यांच्याजवळ सोने आहे हे पाहून ते सोने आपल्याला मिळावे अशी त्यांना इच्छा झाल्यास त्यात काहीच आश्चर्य नव्हते.

"जर ते एवढ्या मुक्त हस्ताने पैसे खर्च करीत आहेत तर त्यांच्या घरी पैशांचा मोठा साठा असला पाहिजे," असे ते एकमेकांशी कुजबुजत होते. "ते खरे आहे," ती माणसं म्हणाली. "ते घरी परतण्यापूर्वी घाईघाईने जाऊ आणि सर्व घर चाळून टाकू."

म्हणून त्या माणसांनी खेडे सोडले आणि त्वरेने ते टेकडीवरील शेतावर गेले. जेथे त्यांनी दरवाजा तोडला आणि जोपर्यंत त्यांना लाकडी पेटीतील आणि चहाच्या भांड्यातील सोने सापडत नाही तोपर्यंत त्यांनी सर्व सामान अस्ताव्यस्त करून टाकले. ते सोने गाठोड्यात बांधण्यात त्यांना फार वेळ लागला नाही. ते त्यांनी पाठीवर घेतले आणि तेथून निघून गेले. कारण बहुधा ते खूप घाईत होते म्हणून त्यांनी अस्ताव्यस्त केलेले सामान पुन्हा नीट लावले नाही.

लवकरच ती सुशील स्त्री आणि तिचा नवरा काखेत सामानाचे बोचके घेऊन खेड्यातून टेकडीवर आले. त्यांच्यामागे त्यांनी विकत घेतलेली बोचकी उचलण्यासाठी भाड्याने लावलेली मुलांची गर्दी होती. नंतर दुसरे तरूण आणि खेड्यातील धटिंगण आणि त्या उधळपट्टी करणाऱ्या जोडप्याला पाहून आकर्षित झालेली लोकं होती. ते सर्व साध्या जिज्ञासेने त्यांच्यामागे धूमकेतूच्या शेपटीसारखे जाऊन जयोत्सवाच्या मिरवणूकीत भटकत होते. सर्वात शेवटी गुगीन्स हा दुकानदार होता जो त्याच्याजवळच्या रेशमी कपड्याला मोठ्या नाजूकतेने आणीत होता ज्याचे पैसे त्याला घरी पोहोचल्यावर मिळणार होते. कारण त्यांनी जेवढे पैसे नेले होते ते सर्व मुक्त हस्ते खर्च केलेले होते.

तो शेतकरी जो खूप विनम्र होता, तो आता गर्वाने इतका फुगला होता की त्याने त्याच्या डोक्यावरील हॅटचा काठ डाव्या कानावर कलंडवला आणि मोठी सिगार प्यायला ज्याने त्याला जलद आजारी पाडले. त्याची बायको त्याच्या बाजूने मोरासारखी ठुमकत चालत होती आणि पूर्वी जिच्याकडे कधीही लक्ष गेले नाही, ते

लोक तिच्याकडे कटाक्ष टाकीत होती. तो संपत्तीमुळे मिळालेला आदर आणि मानवंदना पाहून त्यांना खूप आनंद झाला होता. त्या मिरवणुकीचं त्यांना कौतुक वाटत होतं जी त्यांच्या मागे होती.


पण, अरेरे त्यांना नव्याने प्राप्त झालेले समाधान! जेव्हा ते त्यांच्या घरी परतले तेव्हा त्यांना घराचा दरवाजा मोडलेला दिसला, त्यातील फर्निचर इतस्ततः विखुरलेले होते आणि त्यांचे सोन्याचे अखेरचे प्रत्येक नाणे चोरीस गेले होते.

त्या जमावाने दात विचकले आणि त्यांच्या व्यक्तिगत स्वभावाप्रमाणे अवहेलनापूर्वक शेरे मारले आणि गुगीन्स दुकानदाराने आणलेल्या रेशमी पोषाखाच्या किंमतीची मोठ्या आवाजात मागणी केली.

नंतर ती बाई नवऱ्याच्या कानात कुजबुजली की जा पळा आणि काही सोन्याची नाणी उपसून आणा. तोपर्यंत ती गर्दीला शांत ठेवील आणि त्याने तात्काळ आज्ञा पाळली. पण काही क्षणातच तो पांढऱ्या फटक चेहऱ्यानिशी परतला आणि तिला पंप कोरडा असल्याचे व आता नळातून सोन्याची नाणी बाहेर पडू शकत नाहीत असे सांगितले.

ती मिरवणूक शेतकरी आणि त्याच्या बायकोच्या श्रीमंतीच्या ढोंगावर हसत आणि कुचेष्टा करीत खेड्यात परतले. आणि काही खोडकर मुलांनी टेकडीवरून त्यांच्या घरावर दगड फेकले. गुगीन्सने त्या बाईला फसवले म्हणून अतिशय कठोरपणे फैलावर घेऊन रेशमी वस्त्रे परत घेतली आणि शेवटी त्या जोडप्याला त्यांच्या गर्वाचे आणि आनंदाचे रूपांतर अपमानात झालेले पाहून त्यांना अतिशय कडवट दुःख झाले.

नुकताच सूर्य अस्ताला जाण्यापूर्वी त्या बाईने डोळे पुसले आणि नेहमीप्रमाणे पुन्हा सर्वसामान्य पोषाख घातला. आणि झऱ्याकाठी पाण्याला गेली. जेव्हा ती त्या सपाट दगडाजवळ आली तेव्हा तो कीटकराज त्यावर बसलेला तिने पाहिला.




" का बोलू नये मी ? " ।

पाणी नव्हे, पण सोन्याच्या लिरा .

“विहीर कोरडी पडली!” ती रागाने ओरडली.

“होय,” कीटकाने शांतपणे उत्तर दिले, “माझ्या प्रजेने शोधून आणलेले सर्व सोने तू उपसून नेले आहेस.”

“पण आम्ही आता कंगाल झालो आहोत,” ती बाई रस्त्यावर बसून रडत म्हणाली. “कारण आमच्याजवळ असलेली पै न् पै चोरांनी लुटून नेली.”

“माफ करा,” कीटकाने प्रत्युत्तर दिले. “पण ही तुझी स्वतःची चूक आहे. स्वतःच्या संपत्तीचे तू मोठे प्रदर्शन मांडून दुसऱ्यांना त्याबद्दल संशय येईल असे वागायला नको होतेस. जसे आहे तसे- तू केवळ ते सोने गमावलेस जसे ह्यापूर्वी इतरांनी गमावले. असे जगाच्या अंतापूर्वी बहुतकरून अनेकदा ते गमावले असतील.”

“पण आता आम्ही काय करावे?” तिने विचारले.

“मी तुला पैसे देण्यापूर्वी तू काय करीत होतीस?”

“आम्ही सकाळपासून सायंकाळपर्यंक काम करीत होतो.” ती म्हणाली.

“तर मग काम अजूनही तुमच्यासाठी उरलेले आहे,” कीटकाने स्वतःला सावरीत शेरा मारला. “ते काही तुमच्याकडून कुणी चोरून घेण्याचा प्रयत्न करणार नाही तुम्हाला खात्री असेल!” आणि तो दगडावरून घसरला आणि शेवटी कायमचा नाहीसा झाला.

* * *

ही गोष्ट आपल्याला असे शिकविते की निरहंकारी मनाने सुदैवाचा स्वीकार करावा आणि नेमस्तपणाने त्याचा वापर करावा. कारण त्या शेतकऱ्याने आणि त्याच्या बायकोने त्यांच्या संपत्तीच्या प्रदर्शनाचा मोह टाळला असता तर अखेरच्या दिवसापर्यंत त्यांना ती टिकवून ठेवता आली असती.

* * * * *

# पुतळा, जो सजीव झाला

समस्त पऱ्यांच्या देशात टन्को मांकी ह्या पिवळ्या चेटक्यासारखा खूप खट्याळ कोणीही नाही. तो एके दिवशी शहरातून उडत होता, मर्त्य माणसांच्या दृष्टीस पूर्णपणे अदृश्य होता. पण तो स्वतः मात्र सर्वकाही गोष्टी बघू शकत होता. त्याच्या नजरेला आले की श्री. फ्लोमॅनच्या विविध वस्तू भांडाराच्या दुकानात काचेच्या तावदानामागे एक मेणाची बाई उभी होती. त्या मेणाच्या बाईला सुंदरतेने पोषाख चढविलेला होता, आणि तिच्या ताणलेल्या ताठ हातात एक कार्ड होते ज्यावर शब्द लिहिलेले होतेः

“दुर्लभ किंमत!”
हा फॅशनेबल छानदार वेष
पॅरीसहून आयात केलेला असून
किंमत २० डॉलर्स
कमी केलेल्या किंमतीत फक्त १९.९८ डॉलर्स

ही चित्ताकर्षक घोषणा गिऱ्हाईक स्त्रियांच्या गर्दीत खिडकीपुढे उभी करण्यात आली होती. जो चिकित्सक दृष्टीने त्याच्याकडे बघत होता. टन्को मांकी स्वतःशीच हळुवार व खळखळत हसत होता ज्याचा अर्थ खट्याळपणा होता. नंतर तो त्या मेणाच्या मानवी आकृतीजवळ उडत गेला आणि त्याने त्याच्या कपाळावर दोनदा श्वास सोडला. तेव्हापासून तात्काळ तो पुतळा सजीव झाला, पण भांबावलेल्या अवस्थेत अनपेक्षित संवेदनेसह ती तशीच पूर्वीप्रमाणे घोषणापत्र हातात धरून बाहेरील स्त्रियांकडे टक लावून बघत होती.



त्या क्षणा पासून तो पुतळा सजीव झाला.

तो चेटक्या पुन्हा हसला आणि उडून गेला. टन्को मांकीच फक्त काय तो त्या मेणाच्या बाईची त्रासापासून सुटका करायला उरला होता, ते अगदी खात्रीने तिच्यासाठी अनपेक्षितपणे घडले होते असा त्या खोडकर चेटक्याने विचार केला. ह्या अननुभवी स्त्रीला ह्या स्नेहशून्य आणि निर्दय जगापासून सोडविण्यात खरी गंमत आहे असाही त्याने विचार केला.

सुदैवाने जवळ जवळ सहा वाजले होते जेव्हा त्या पुतळयाला पहिल्यांदा जाणवले की तो जिवंत झाला आहे आणि त्या पुतळयाने काही विचार करण्याआधीच एका माणसाने तिथे येऊन सर्व खिडक्यांच्या काचा खाली ओढून जिज्ञासू गिऱ्हाईकांच्या दृष्टीपासून ते बंद केले.

नंतर कारकून आणि रोखपाल आणि तक्तपोशीवर फिरणारी माणसे आणि पैसा जमा करणाऱ्या मुली घरी गेल्या आणि रात्रभरासाठी दुकान बंद झाले, फक्त दुसऱ्या दिवसासाठी फरशी साफ करणारेच थांबले होते.

त्या मेणाच्या बाईला छोट्या खोलीसारख्या पेटीकेत ठेवलेले होते, त्या दरवाज्याच्या बाजूला आत बाहेर जाण्यासाठी थोडीशी जागा ठेवलेली होती. म्हणून त्या फरशी पुसणाऱ्या बाईने त्या पुतळयाकडे लक्षच दिले नव्हते, तिने घोषणापत्र जमिनीवर फेकून दिले होते आणि रेशमी वस्त्रांच्या ढिगाऱ्यावर बसून ती कोण होती आणि कोठे होती आणि ती सजीव कशी झाली होती याचेच आश्चर्य करीत होती.

प्रिय वाचकहो तुम्हाला विचार करायलाच हवा की ती दिसायला जरी मोठी, श्रीमंती थाटाचा पोषाख घातलेली, गुलाबी गालाची, मऊ भुरभुरणाऱ्या सोनेरी केसांची दिसत असली तरी ती वयाने अजून खूपच लहान होती- अगदी अर्ध्या तासापूर्वी जन्मलेल्या नवजात बाळाइतकी. जे काही जग तिला ठाऊक झाले होते ते म्हणजे खिडकीतून होणारे ओझरते दर्शन; जे काही तिला लोकांबद्दल ठाऊक झाले होते ते हे की स्त्रियांच्या घोळक्यातील कृती, ज्या तिच्यासमोर खिडकीच्या

तावदानासमोर उभे राहून तिचा पोषाख बरोबर मापात आहे की नाही हे बघत होत्या आणि तिच्या छान पेहेरावाबद्दल शेरे मारीत होत्या.

म्हणून तिला त्याविषयी फारच थोडा विचार करावा लागला आणि तिचे विचार करणे काहीसे हेलावले, तरी तिने एक गोष्ट करायची खरोखर निश्चित ठरवली, ती म्हणजे तिच्यासारख्या सुंदर पोषाख न केलेल्या व तिच्या इतक्या सुंदर देखण्या ज्या अनेक स्त्रिया तिच्याकडे उर्मटपणे टक लावून पाहत होत्या, त्यांच्या पुढे खिडकीत इथून पुढे उभे रहायचे नाही.

पण जोपर्यंत ती एका महत्त्वाच्या निर्णयाप्रत पोहोचली होती, तोपर्यंत मध्यरात्र उलटून गेली होती, त्या मोठ्या निर्मनुष्य दुकानातील दिवे मंद प्रकाशात जळत होते म्हणून ती तिच्या खिडकीतून रांगत बाहेर आली आणि दुकानाच्या मांडण्यांमधील रस्त्यात चालू लागली आणि मोठ्या उत्सुकतेने तिच्या आजूबाजूला असलेल्या भरजरी संपत्तीतून थांबत थांबत ती जात होती.

जेव्हा ती कडा सजविलेल्या हॅट्स असलेल्या काचेच्या खोक्यांजवळ आली तेव्हा तिला आठवले की रस्त्यावरील स्त्रियांच्या डोक्यावर अगदी तशाच बनावटीच्या हॅट्स होत्या. म्हणून तिने तिला साजेल अशी टोपी निवडली आणि काळजीपूर्वक तिच्या सोनेरी बटांवर बसविली. तिची काय स्वभावप्रवृत्ती होती ह्याचे स्पष्टीकरण देण्याची मला इच्छा नाही. तिने आरशात ती टोपी व्यवस्थित बसली की नाही हे पाहण्यासाठी एक दृष्टीक्षेप टाकला आणि हे तिने निश्चितपणे केले. ती तिच्या पोशाखाला मिळती जुळती नव्हती. पण ती गरीब बिचारी इतकी लहान होती की तिला रंगसंगतीची अभिरूची नव्हती.

जेव्हा ती हातमोज्याच्या खिडकीजवळ गेली तेव्हा तिला आठवले की तिने पाहिलेल्या स्त्रियांनी तसेच हातमोजे घातलेले होते. तिने पेटीतून एक जोडी घेतली आणि मेणाचे आवरण असलेल्या कडक बोटांवर ठाकठीक बसविण्याचा प्रयत्न केला. पण ते हातमोजे इतके लहान होते की ते जोडाजवळच फाटले. नंतर तिने

दुसरी जोडी घेऊन प्रयत्न केला आणि आणखी खूप तसेच फाटले. पण एक तास संपण्यापूर्वी ती हिरवे हातमोजे हातावर चढविण्यात यशस्वी झाली.

नंतर तिने दुकानामागे असलेल्या प्रतवारीने लावलेल्या विविध वस्तूंच्या मोठ्या संग्रहातून उन्हात वापरायची छत्री निवडली. पण तिला ती कशासाठी वापरायची असते त्याची कल्पनाच नव्हती. पण इतर स्त्रिया अशा वस्तू बाळगतात हे पाहून तिलाही एक आपल्याजवळ असावेसे वाटले.

जेव्हा ती आरशासमोर उभी राहून स्वतःचे गंभीररीत्या परीक्षण करू लागली तेव्हा तिला खिडकीबाहेर उभ्या राहिल्या होत्या त्या स्त्रियांमध्ये आणि तिच्यामध्ये तिच्या अननुभवी डोळयांना काहीही लक्षणीय असा फरक जाणवला नाही. त्यानंतर तिने दुकानाबाहेर पडण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्येक दरवाजाचे कुलूप घट्ट लावलेले असल्याचे तिला आढळून आले.

त्या मेणाच्या बाईला काही घाई नव्हती. तिने पूर्वीच्या अस्तित्वापासून संयमाचा वारसा घेतलेला होता. सांप्रत सजीव असणे आणि सुंदर कपडे परिधान केलेले असणे हाच तिचा पुरेपूर आनंद होता. म्हणून ती एका स्टूलावर बसली आणि सकाळ व्हायची वाट पाहू लागली.

जेव्हा रक्षकाने कुलूप उघडले तेव्हा ती मेणाची बाई एका झटक्यात त्याच्या बाजूने बाहेर गेली आणि ताठरपणे पण दिमाखात टांगा टाकीत खाली रस्त्यावर चालत आली. ती सुप्रसिद्ध स्त्री दुकानाच्या खिडकीतून बाहेर पडून शिस्तबद्धरित्या चालत गेलेली पाहून तो गरीब बिचारा माणूस पूर्णपणे भांबावून गेला आणि दरवाजाच्या पायरीवर कोपराचा संवेदनशील भाग आपटल्याने स्वतःला बेशुद्ध होण्यापासून सावरण्यासाठी तो त्या ढिगावर पडला. जेव्हा तो शुद्धीवर आला तेव्हा ती कोपऱ्यावर वळून नाहीशी झालेली होती.

त्या मेणाच्या बाईच्या बालिश मनाने तर्क लावला, जेव्हा ती सजीव झाली तेव्हा तिचे प्रत्यक्ष कर्तव्य असे होते की तिने त्या जगाशी समरस व्हावे जे

इतर लोक करीत होते. तिला हे कळू शकत नव्हते की रक्तामांसाच्या लोकांपेक्षा ती किती भिन्न आहे, ना तिला हे कळत होते की ती अगोदर एक पुतळा होती आणि खोडकर टान्को मांकीच्या खोड्या करण्यावरील प्रेमामुळे ती एक अपूर्व अनुभव घेत होती. तिच्या खूपशा अज्ञानीपणाने तिला स्वतःला आत्मविश्वास दिला होता ज्याचा तिला योग्य रितीने हक्क दिला गेलेला नव्हता.

अद्याप सकाळच होती आणि खूप थोड्याशा लोकांना तिने पाहिले जे रस्त्यामधून घाईने जात होते. त्यांच्यापैकी बरेचसे उपाहारगृहात आणि जेवणाच्या दुकानाकडे वळत होते आणि त्यांचे उदाहरण समोर ठेवून त्या मेणाच्या बाईने एकात प्रवेश केला आणि जेवणाच्या टेबलासमोर स्टूलावर बसली.

“कॉफी आणि रोल्स!” दुसऱ्या टेबलावरची ती दुकानातली मुलगी म्हणाली.

“कॉफी आणि रोल्स!” त्या पुतळ्याने पुनरुक्ती केली, आणि लवकरच उपाहारगृहातील सेवकाने तिच्यापुढे ते ठेवले. खचितच तिला भूक नव्हती. तिची प्रकृती प्रामुख्याने लाकडाची होती आणि तिला अन्नाची गरज नव्हती, पण तिने त्या दुकानातील मुलीकडे लक्ष दिले आणि तिने पाहिले की त्या मुलीने कॉफी उचलली आणि तोंडाला लावून पिऊन टाकली. म्हणून त्या स्त्रीनेही तसेच केले आणि दुसऱ्याच क्षणाला काय आश्चर्य की तो गरम द्रवपदार्थ तिच्या लाकडी बरगड्यांमधून ओघळू लागला. त्या कॉफीने तिच्या मेणाच्या ओठांवर फोड आले आणि तो अनुभव इतका अप्रिय होता की ती उभी राहिली आणि नोकराच्या “वीस सेंट्स मॅम” या मागणीकडे लक्ष न देता तिने उपाहारगृह सोडले. तिचा त्यांना फसविण्याचा हेतू नव्हता, तर त्या गरीब प्राण्याला “वीस सेंट्स मॅम” ह्याची कल्पनाच नव्हती.

जशी ती बाहेर पडली तशी फ्लोमॅनच्या दुकानातील खिडक्यांच्या तावदानाची सजावट करणाऱ्याशी तिची गाठ पडली, पण तो माणूस किंचित ऱ्हस्व

दृष्टीचा होता. पण त्या स्त्रीची चेहरेपट्टी काहीशी परिचित वाटल्याने त्याने नम्रपणे त्याची टोपी उंच धरली. त्या मेणाच्या बाईने सुद्धा तिची हॅट, आपण काहीतरी उचित करीत आहोत हा विचार करून उंच धरली आणि तो माणूस भेदरलेल्या चेहऱ्याने घाईने निघून गेला.

नंतर एका बाईने तिच्या बाहूला स्पर्श केला आणि म्हणाली, “क्षमा करा, बाईसाहेब, पण तुमच्या पोषाखामागे किमतीचे घोषणापत्र लोंबत आहे.”

“होय ठाऊक आहे मला,” त्या मेणाच्या बाईने ताठरपणे उत्तर दिले. “मूळ किंमत २० डॉलर्स होती पण ती कमी करून १९ डॉलर्स ९८ सेंट्स ठेवलेली आहे.”

त्या बाईला अशा उदासीनतेकडे पाहून आश्चर्य वाटले आणि ती निघून गेली. काही घोडागाड्या रस्त्याच्या कडेला उभ्या होत्या. तो पुतळा कांकूं करीत आहे हे पाहून चालक तिच्याकडे पोहोचला आणि स्वतःच्या टोपीला स्पर्श करीत “गाडी बाईसाहेब?” असे त्याने विचारले.

“नाही,” ती म्हणाली, त्याला न समजून, “मी मेण आहे.”

“ओह!” तो उद्गारला आणि तिच्याकडे आश्चर्याने पाहू लागला.

“हे तुमचे सकाळचे वर्तमानपत्र!” वर्तमानपत्रे विकणारा मुलगा मोठ्याने ओरडला.

“माझे, असे तू म्हणालास?” तिने विचारले.

"नक्कीच! इतिहास, कागदांचा दस्ता, प्रजासत्ताकाचे! घेणार नाहीत का तुम्ही?"

"कशासाठी असतं ते?" त्या मेणाच्या बाईने साधेपणाने विचारले.

"का, वाचण्यासाठी खचितच, सर्व बातम्या, माहित आहे तुम्हाला?" तिने मान हलवली आणि वृत्तपत्रावर नजर टाकली.

"ते सर्व ठिपक्यांसारखे दिसतात आणि एकत्रित मिसळलेले." ती म्हणाली. "मला खेद वाटतो, मी ते वाचू शकत नाही."

"कधी शाळेत गेला नाहीत?" त्या मुलाने उत्सुक होऊन विचारले.

"नाही, कोणती शाळा?" तिने चौकशी केली.

त्या मुलाने तिच्याकडे संतापाने बघितले.

"दिसतेच आहे!" तो ओरडला, "तुम्ही फक्त पुतळा आहात. तेच काय ते आहात!" आणि तो दुसऱ्या आशादायक ग्राहकाच्या शोधात पळाला.

"त्याला काय म्हणायचं याचं मला आश्चर्य वाटते." त्या गरीब बाईने विचार केला. "खरंच का मी काही प्रकारे वेगळी आहे? मी त्यांच्यासारखी दिसते हे निश्चितच, मी त्यांच्यासारखी कृती करण्याचा प्रयत्न करते, तरीही तो मुलगा मला पुतळा म्हणाला आणि मी विचित्रपणे कृती करते असे त्याला वाटत असावे, असे दिसते."

ह्या कल्पनेने ती किंचित चिंताक्रांत झाली, पण ती कोपऱ्यावर चालत गेली जिथे तिने पाहिले की लोकांना आत बसवून घेण्यासाठी एक ट्रॅम उभी होती. त्या मेणाच्या बाईने तरीही इतर जसे वागतील तसेच वागायचे ठरवले आणि गाडीत कोपऱ्यात बसलीसुद्धा. काही इमारतींचे संकुल ओलांडल्यानंतर वाहक तिच्याजवळ आला आणि म्हणाला, " भाडे, कृपया!"

"ते काय असते?" तिने निरागसपणे विचारले.

"तुमचे भाडे!" त्या माणसाने सांगितले.

ती वेड्यासारखी त्याच्याकडे टक लावून बघत त्याला काय म्हणायचे ह्याचा विचार करण्याचा प्रयत्न करू लागली.

"चला, आटपा!" तो वाहक गुरगुरला, "एक तर पैसे भरा नाहीतर खाली उतरा!" तरीही तिला काहीच समजले नाही, आणि त्याने रानटीपणाने तिचे बाहू पकडले आणि तिला तिच्या पायांवर उभे केले. पण कठीण लाकडापासून बनविलेल्या तिच्या हातांशी संपर्क आला तेव्हा तो आश्चर्यचकित झाला.

तो खाली वाकला आणि त्याने तिच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिले तेव्हा ती रक्तामांसाची नसून मेणाची आहे हे पाहून तो भीतीने मोठ्याने ओरडला आणि त्याने गाडीतून खाली उडी मारली. जणू काही त्याने एखादे भूत पाहिले होते म्हणून तो पळू लागला.

ह्यामुळे इतर प्रवासीसुद्धा जोरात ओरडले आणि टक्कर झाली असावी ह्या भीतीने त्यांनी गाडीतून उड्या मारल्या आणि चालकाला काहीतर अनिष्ट घडले आहे हे कळून त्यानेही तसेच केले. त्या मेणाच्या बाईने इतरांना पळताना पाहून सर्वात शेवटी तिनेही उडी मारली आणि विरूद्ध दिशेकडून जोरात येणाऱ्या गाडीत बसली. तिला भीतीयुक्त आरडाओरडा आणि धोक्याच्या सूचनांचा आरडा ओरडा

सर्व बाजूंनी ऐकू आला पण तिला तिचा धोका कळण्याआधी ती खाली धडकली आणि इमारतीचा अर्धा संकुल ओलांडेपर्यंत फरफटत गेली.

जेव्हा गाडी थांब्यापर्यंत आणली गेली, तेव्हा एक पोलीस तेथे पोहोचला आणि त्याने तिला चाकांखालून बाहेर ओढले. तिचा पोषाख मोठ्या प्रमाणात फाटला गेला होता आणि मातीने माखला होता. तिचा डावा कान पूर्णपणे नाहीसा झाला होता आणि डाव्या बाजूचे डोके आत घुसले होते. पण ती पटकन हात टेकीत तिच्या पायांवर उभी राहिली आणि तिने तिची हॅट मागितली. एका सभ्य गृहस्थाने ती आधीच उचलली होती. पोलिसाने तिच्या हातात ती दिली आणि त्याने पाहिले की तिच्या डोक्याला मोठे भोक पडलेले होते आणि ती पोकळी उघडी पडलेली होती. तो गरीब माणूस भीतीने इतका थरथर कापू लागला की खरोखर त्याचे दोन्ही गुडघे एकमेकांवर आपटू लागले.

“का- का बाई, तुम्ही मेलात की काय!” तो धापा टाकीत म्हणाला.

“मेलेले म्हणजे काय तुमच्या म्हणण्याचा अर्थ?” ती मेणाची बाई म्हणाली.

त्या पोलिसाला कापरे भरले आणि तो कपाळावरील घाम पुसू लागला.

“तुम्ही आहात तशाच?” त्याने दुःखाने विव्हळत उत्तर दिले. गोळा झालेली गर्दी आश्चर्याने तिच्याकडे बघत होती आणि एक मध्यमवयीन सद्‌गृहस्थ आता उद्गारला,

“का, ती मेणाची आहे!”

“मेण!” पोलिस फिरून म्हणाला.

“निश्चितच ती खिडकीत ठेवलेल्या पुतळयांपैकी एक आहे.” त्या मध्यमवयीन माणसाने जाहीर केले.

तेथे ज्या लोकांची गर्दी जमली होती ती सर्व ओरडली, “तुमचं म्हणणं बरोबर आहे, म्हणूनच ती अशी आहे! ती पुतळा आहे!”

“तू पुतळा आहेस?” पोलिसाने करारी भाषेत चौकशी केली. त्या मेणाच्या बाईने उत्तर दिले नाही. ती आता अडचणीत येणार ह्याची तिला भीती वाटू लागली. कारण टक लावून बघणाऱ्या गर्दीने तिची पंचाईत केली होती.

अचानक तेथे एक बूटपॉलिशवाला समस्या सोडविण्याच्या प्रयत्नात म्हणाला, “तुम्ही सर्व चुकताहात! पुतळा बोलू शकतो का? पुतळा चालू शकतो का? पुतळा जिवंत असू शकतो का?”

“शांत!” तो पोलिस हलक्या आवाजात म्हणाला. आणि त्याने “इकडे बघा!” असे म्हणून त्याने त्या बाईच्या डोक्याला पडलेल्या भोकाकडे निर्देश केला. वर्तमानपत्रवाल्या मुलाने पाहिले आणि त्याचा चेहरा पांढरा पडला आणि थरकाप होऊ नये म्हणून त्याने शिटी वाजवली.

आता दुसरा पोलिस पोहोचला आणि थोड्याशा चर्चेनंतर त्या विचित्र प्राण्याला मुख्य कार्यालयात नेण्याचे ठरविण्यात आले. म्हणून त्यांनी तात्काळ घोडागाडी मागविली आणि खराब झालेल्या मेणाच्या बाईला पोलिस स्टेशनला नेण्यात आले. तेथे पोलिसांनी तिला तुरूंगातल्या खोलीत कोंडून कुलूप लावले आणि मोठ्या घाईने इन्स्पेक्टर मगला ती आश्चर्यकारक गोष्ट सांगितली.

पोलिस अधिकारी मगने नुकतीच निकृष्ट प्रतीची न्याहरी खाल्ली होती आणि ते काही चांगल्या मनःस्थितीत नव्हते. म्हणून ते मोठयाने ओरडले आणि

त्यचा अभागी पोलिसांवर ते डाफरून म्हणाले, “एका विवेकशील माणसाकडे काल्पनिक गोष्टी घेऊन येणारे तुम्हीच स्वतः पुतळे आहात!” त्याने निर्देश केला की त्यांच्या उतावळेपणामुळे ते किती दोषी आहेत.

त्या पोलिसाने स्पष्टीकरण करण्याचा खूप प्रयत्न केला पण पोलिस अधिकारी मगने काहीही ऐकून घेतले नाही. आणि अजूनही जेव्हा ते त्यावर वादविवाद करीत होते तेव्हा श्री. फ्लोमॅन- विविध वस्तूंच्या भांडाराचा मालक घाईघाईने तेथे आला.

“मला एक डझनभर गुप्तचर ताबडतोब हवेत इन्स्पेक्टर!”

“ कशासाठी?” मगने फर्मावले.

“माझ्या दुकानातील मेणाच्या बायांपैकी एक माझ्या दुकानातून १९.९८ डॉलर्सचा पोषाख, ४.२३ डॉलर्सची हॅट व २.१९ डॉलर्सची छत्री आणि ७६ सेंटसच्या हातमोज्यांची जोडी घेऊन पळून गेली आणि मला तिला अटक करुन घ्यायची आहे!”

जेव्हा तो श्वास घेण्यासाठी क्षणभर थांबला तेव्हा तो इन्स्पेक्टर विस्मयचकित होऊन डोळे फाडून बघू लागला.

“एकाच वेळी प्रत्येकाला वेड लागले आहे काय?” त्याने उपरोधिकपणे चौकशी केली. “मेणाचा पुतळा कसा काय पळून जाऊ शकेल?”

“मला ठाऊक नाही. जेव्हा माझ्या द्वारपालाने आज सकाळी दरवाजा उघडला तेव्हा त्याने तिला बाहेर पळून जाताना पाहिले.”

“त्याने का अडवले नाही तिला?” मगने विचारले.

“तो खूप घाबरला होता. पण ती माझ्या दुकानातल्या वस्तू घेऊन पळाली, सन्माननीय महाशय, आणि तिला अटक करून हवी मला!” त्या दुकानदाराने जाहीर केले.

त्या इन्स्पेक्टरने क्षणभर विचार केला. “तुम्हाला तिच्यावर फौजदारी करता येणार नाही. कारण पुतळयाने चोरी केल्यावर त्यांच्या विरोधात कायदा नाही.”

श्री. फ्लोमॅनने दुःखाने निःश्वास सोडला. “म्हणजे मी १९.९८ डॉलर्स पोषाखाचे आणि ४.२३ डॉलर्सची हॅट आणि--”

“त्याला काही अर्थ नाही.” पोलिस अधिकारी मगने त्यांना मध्येच थांबवीत म्हटले. “ह्या शहरातील पोलिस आदरणीय नागरिकांच्या संरक्षणासाठी नेहमीच तत्पर असतात. आम्ही अगोदरच त्या बाईला अटक केलेली आहे आणि तिला तुरूंगाच्या खोली नंबर १६ मध्ये बंद करून ठेवले आहे. तुम्ही तुमच्या चोरीस गेलेल्या वस्तू परत घेऊ शकता. जर तुमची इच्छा असेल तर, पण चोरीसाठी तिच्यावर फौजदारी करण्यापूर्वी पुतळयांवर लागू पडणारा कायदा शोधा.”

“सर्व हवे मला,” श्री.फ्लोमॅन म्हणाले, “ते १९.९८ डॉलर्स पोषाखाचे आणि.....”



" तुम्ही आहात तसाच ? " त्याने दुःखाने विव्हळत उत्तर दिले.

“या इकडे,” पोलिसाने त्याला मध्येच थांबविले. “मी तुम्हाला तुरूंगाकडे नेतो.”

पण जेव्हा त्यांनी नंबर १६ मध्ये प्रवेश केला तेव्हा त्यांना फक्त निर्जिव पुतळा जमिनीवर आडवा पडलेला दिसला. त्याच्या मेणाला भेगा गेल्या होत्या आणि पोपडे निघालेले होते. त्याचे डोके भयंकररित्या खराब झालेले होते आणि तो तयार केलेला पोषाख धुळीने माखला होता. मळकटलेला आणि खूप विस्कटलेला होता. कारण खोड्या करणाऱ्या त्या टन्को मांकीने एक श्वासाची फुंकर त्या गरीब बिचाऱ्या मेणाच्या बाईच्या शरीरात टाकून तिला जिवंत केले होते. ते क्षणभंगुर जीवन तात्काळ संपले होते.

“हे मी विचार केल्याप्रमाणे घडले.” असे तो पोलिस अधिकारी मग खुर्चीत संतोषाने पाठ टेकीत म्हणाला. “मला ठाऊक होते, सर्व काळ ती गोष्ट खोटी होती. असे दिसते की जर ह्या संपूर्ण जगात स्थिरबुद्धीचे लोकं समज घालण्याकरिता नसते तर सर्व जग भ्रमिष्ट झाले असते. पुतळे हे मेणाचे आणि लाकडाचे आणि असेच काहीतरी असतात.”

“तो नियम असेल कदाचित,” पोलिस स्वतःशीच पुटपुटला, “पण हा पुतळा जिवंत होता हे खरे!”

## उत्तर ध्रुवावरील पांढऱ्या अस्वलांचा राजा

उत्तरेकडील अतिदूर देशातील हिमनगांमध्ये उत्तर ध्रुवावरील पांढऱ्या अस्वलांचा राजा रहात होता. तो अक्राळ विक्राळ व अवाढव्य होता. तो ज्या सर्वांना परिचित होता त्यांच्याशी तो अतिशय सूज्ञपणे व स्नेहपूर्ण वागत असे. त्याचे शरीर लांब दाट पांढऱ्या केसांनी आच्छादिलेले होते. मध्यरात्रीच्या सूर्याच्या किरणांमध्ये त्याचे केस चांदीसारखे चमकायचे. त्याची नखे अतिशय मजबूत आणि तीक्ष्ण होती, ज्यामुळे तो मऊसूत बर्फावरून सुरक्षितपणे चालू शकत असे किंवा तो मासे आणि समुद्रातील जलचर प्राण्यांना फाडून टाकीत असे जे त्याचे अन्न होते.

जेव्हा तो जवळ यायचा तेव्हा सील मासे त्याला घाबरायचे आणि त्याला टाळायचा प्रयत्न करायचे. पण कुरव पक्षी, सफेद आणि राखाडी रंगाचे, दोन्ही त्याच्यावर प्रेम करायचे कारण त्याच्या मेजवानीतील त्यांना खायला देण्यासाठी तो उरवून ठेवायचा.

अनेकदा त्याची प्रजा, पांढरी अस्वले आजारी किंवा काही त्रासात असायचे तेव्हा ते त्याचा सल्ला घेण्यासाठी यायचे, पण ते सूज्ञपणे त्याच्या शिकारीच्या जागेपासून स्वतःला लांब ठेवायचे जेणेकरून त्याच्या खेळात अडथळा येऊ नये आणि त्याला राग येऊ नये.

अस्वले जी काही उत्तरेकडून हिमनगासारखी यायची तेव्हा ती आपापसात कुजबुजायची की हा पांढऱ्या अस्वलांचा राजा हा एकतर जादूगार असला पाहिजे किंवा त्याला सामर्थ्यशाली संरक्षण असले पाहिजे. कारण कोणतीही ऐहिक गोष्ट त्याला इजा करू शकत नाही, विपुल अन्न मिळविण्यात तो कधीही अपयशी होऊ शकत नाही, आणि तो दिवसागणिक आणि वर्षामागून वर्षे तो अधिकाधिक मोठा आणि शक्तिमान होत आहे. तरीही ह्या उत्तरेच्या सम्राटाची जेव्हा माणसाशी गाठ पडली तेव्हा त्याच्या सुजाणतेने त्याला निराश केले.



त्या विचित्र हलासने मोठा "ॲंग!" आवाज काढला.

एके दिवशी हिमनगामधल्या गुहेतून तो बाहेर आला. उन्हाळयामुळे बर्फ वितळून तयार झालेल्या पाण्याच्या लाटांमधून एक नौका हालचाल करताना त्याने पाहिली. त्या नौकेत माणसे होती.

त्या भल्या मोठ्या अस्वलाने असे प्राणी कधीही पाहिले नव्हते. विचित्र वास हुंगत उद्भवलेल्या जिज्ञासेने त्यांना शत्रू समजावे की मित्र किंवा अन्न समजावे की कुजके मांस समजावे ह्याबद्दल तो आश्चर्य करीत होता.

जेव्हा तो राजा पाण्याच्या किनाऱ्याजवळ आला तेव्हा तो माणूस त्याच्याजवळील विचित्र हत्यारासोबत नौकेत उभा राहिला आणि त्याने मोठा 'आवाज' केला. त्या पांढऱ्या अस्वलाला धक्का बसला, त्याचा मेंदू बधीर झाला, तो विचारशून्य झाला, त्याचे अवयव हादरले आणि त्यांनी त्याला खाली आणले आणि कडक बर्फावर त्याचे शरीर जोरात कोसळले.

हेच सर्वकाही काही काळापुरते त्याला आठवत होते.

जेव्हा तो जागा झाला तेव्हा त्याच्या अवाढव्य शरीराचा प्रत्येक इंच वेदनेने ठणकत होता. त्या माणसांनी त्याच्या चामडीवरचे तेजस्वी केस कापून टाकलेले होते आणि त्याला ते दूरवरच्या जहाजाकडे नेत होते.

त्याच्यावर हजारो कुरव मित्र वर्तुळाकार फिरत होते आणि आश्चर्य करीत होते की त्यांचा उपकारकर्ता खरोखर मेला की काय, आणि त्याला खाऊन टाकणे यथायोग्य होते काय. पण जेव्हा त्यांनी त्याला त्याचे डोके वर काढताना व थरथर कापताना पाहिले तेव्हा त्यांना कळले की तो अजूनही जिवंत आहे आणि त्यांच्या सवंगड्यांपैकी एक त्याला म्हणाला,

"लांडग्यांचं बरोबर होतं. राजा हा मोठा जादूगार आहे. कारण माणसे सुद्धा त्याला मारून टाकू शकत नाहीत. पण त्याच्यावर काही आवरण नसल्याने

त्याला काही त्रास होतो आहे. चला, प्रत्येकाला त्याला जेव्हढी पिसे देता येतील तेवढी देऊन त्याच्या दयाळूपणाची परतफेड करू या.”

ह्या कल्पनेने त्या कुरव पक्ष्यांना आनंद झाला. एकामागून एकाने त्यांच्या चोचीने पंखाखालील मऊ पिसे उपटून खाली येऊन हळुवारपणे त्या उत्तरेकडील पांढऱ्या अस्वलाच्या शरीरावर पसरविली. नंतर त्यांनी समूहगीताने त्याला आवाहन केले,

“धैर्य धर, मित्रा! तुमच्या राठ केसांपेक्षा आमची पिसे अधिक मऊ आणि सुंदर आहेत. ते तुझा थंडीवाऱ्यापासून बचाव करतील आणि तू झोपशील तेव्हा तुला ते ऊब देतील. धैर्य धर, आणि उत्साहित रहा.” आणि त्या अस्वलांच्या राजाला वेदना सहन करायचे धैर्य मिळाले आणि तो पुन्हा उत्साही आणि शक्तिशाली झाला.

पक्षाच्या अंगावर वाढावी तशी त्याच्या अंगावर पिसे वाढली आणि त्याच्या शरीराला त्याच्या स्वतःच्या केसांप्रमाणे झाकून टाकले. बरीचशी पिसे रंगाने शुभ्र होती पण काही कुरव करड्या रंगाचे असल्याने महाराजांचे दर्शन जरासे रंगहीन झाले होते.

उर्वरीत उन्हाळयात आणि सर्व सहा महिन्यांच्या रात्रीतून राजा फक्त मासे आणि सील मासे खाण्याकरीता पकडण्यासाठीच त्या बर्फाच्छादित कपारीतून बाहेर पडायचा. पिसांच्या आच्छादनाची त्याला काहीही लज्जा वाटायची नाही. पण त्याला ते अजूनही विचित्र वाटायचे त्यामुळे त्याने त्याच्या कोणत्याही अस्वल बंधूला भेटायचे टाळले होते.

त्याच्या त्या एकलकोंड्या काळात ज्या माणसांनी त्याला इजा केली होती, त्या माणसांचा त्याने खूप विचार केला आणि त्यांनी केलेला “प्रचंड आवाज”

त्याला आठवला. त्याने ठरविले की त्या भयंकर प्राण्यांपासून दूर राहिलेलेच उत्तम. अश रितीने त्याने त्याच्या बुद्धीत भर टाकली.

जेव्हा चंद्र आकाशातून काहीसा खाली कलला आणि सूर्याने हिमनगांना इंद्रधनुच्या आकर्षक छटा देऊन चमकविले होते तेव्हा दोन पांढरी अस्वले शिकारीच्या मोसमाबद्दल सल्ला घेण्यासाठी त्या राजाच्या कपारीकडे आले, पण जेव्हा त्यांनी त्याचे शरीर केसांऐवजी पिसांनी आच्छादिलेले पाहिले तेव्हा त्यांनी हसायला सुरुवात केली आणि एक म्हणाला,

“आपला शक्तिमान राजा पक्षी बनला! कधी उत्तर ध्रुवावरील पिसे असलेले अस्वल कुणी ऐकले आहे का?”

नंतर राजाचा क्रोध उफाळून आला. तो मोठ्याने गुरगुरला आणि दिमाखदारपणे त्यांच्यावर चालून गेला. आणि त्याने त्याच्या अक्राळ विक्राळ पंजाने टवाळी करणाऱ्याला ठोसा मारला आणि तो त्याच्या पायापाशी निर्जीव होऊन पडला.

दुसरा त्याच्या सवंगड्यांकडे धावत गेला आणि राजाच्या विचित्र रूपाची बातमी त्याने त्यांच्यापर्यंत पोहोचवली. त्याचा परिणाम असा झाला की बर्फाच्या विस्तीर्ण मैदानावर उत्तर ध्रुवावरील सर्व पांढऱ्या अस्वलांची बैठक भरली, जेथे त्यांनी त्यांच्या सम्राटाच्या अद्भूत बदलाबद्दल गंभीरपणे चर्चा केली.

“तो वास्तवात फार काळपर्यंत अस्वल राहू शकणार नाही,” एक म्हणाला. “ना तो न्यायतः पक्षी म्हणवू शकतो, पण तो अर्धा अस्वल आणि अर्धा पक्षी त्यामुळे तो आपला राजा व्हायला अपात्रच राहील.”

“मग कोण त्याची जागा घेणार?” दुसऱ्याने विचारले.

“तोच तो जो त्याच्याशी युद्ध करून त्याचा पराभव करेल,” त्या गटातील वृद्ध अस्वलांपैकी एक म्हणाला. “जो सर्वात जास्त शक्तिमान असेल तोच आपल्या प्रजातीचे रक्षण करण्यास योग्य आहे.”

काही काळ तेथे शांतता पसरली होती, पण सरते शेवटी एक मोठे अस्वल पुढे येऊन म्हणाले, “मी करीन त्याच्याशी युद्ध; भूऽ भूऽ आपल्या प्रजातीमध्ये सर्वात शक्तिमान आहे मी! आणि मी उत्तर ध्रुवावरील अस्वलांचा राजा होईन.”

इतरांनी संमतीदर्शक मान हलविली, आणि राजाकडे दूताला पाठवून त्याने मोठ्या अस्वलाशी युद्ध करावे व त्याला जिंकावे किंवा त्याच्या सार्वभौमत्वाचा त्याग करावा, असा निरोप पाठविला.

पुढे तो दूत असेही म्हणाला, “कारण पिसे असलेले अस्वल हे अस्वल नसतेच मुळी. ज्याची आज्ञा आम्ही पाळू तो आमच्यासारखाच असायला हवा.”

“मी पिसे पांघरली कारण त्याने मला आल्हाद वाटतो.” राजा गुरगुरला. “मी काही फार मोठा जादूगार नाही. तथापि मी युद्ध करीन आणि जर त्या अस्वलाने मला हरविले तर तो माझ्या जागी राजा होईल.”

नंतर तो त्याच्या मित्रानां, कुरवांना भेटला जे अजूनही मृत अस्वलांच्या शरीरावर ताव मारीत होते आणि त्यांना त्याने आगामी युद्धाबद्दल सांगितले.

“मी जिंकेन,” तो अभिमानाने म्हणाला. “जरी माझी प्रजा बरोबर असली, कारण त्यांना स्वतःला त्यांच्यासारख्या केसाळ अस्वलाची आज्ञा पाळणे आवडते.”

कुरव पक्ष्यांची राणी म्हणाली, “मी काल गरूड पक्ष्याला भेटले, ज्याने मानवाच्या मोठ्या शहरापासून स्वतःची सुटका करून घेतली होती आणि त्या गरूड पक्ष्याने सांगितले की त्याने एक अक्राळविक्राळ पांढऱ्या अस्वलाची कातडी रस्त्यावर गाडीच्या मागे घरंगळत जाताना पाहिली होती. ती कातडी तुमचीच असली पाहिजे महाराज, आणि तुमची इच्छा असेल तर मी शेकडो कुरव पक्षी शहरात पाठवीन आणि ती तुमच्याकडे परत पाठवीन.”

“जाऊ द्या त्यांना! ” राजा कठोरपणे म्हणाला आणि शेकडो कुरव पक्षी दक्षिणेकडे वेगाने झेपावले.

तीन दिवस ते सरळ बाणासारखे विखुरलेल्या घरांवरून, खेड्यांकडे आणि शहरांकडे उडाले. नंतर त्यांचा शोध सुरू झाला. ते कुरव पक्षी शूर आणि धूर्त आणि सूज्ञ होते. चौथ्या दिवशी ते एका मोठ्या महानगरीत पोहोचले आणि एका गाडीच्या मागे बैठकीवर मोठया पांढऱ्या अस्वलाचा पोषाख रस्त्यावर घरंगळत जाताना त्यांना दिसला. नंतर त्या पक्ष्यांनी खाली झडप घातली- त्या सर्व शेकडोंनी- कातडी चोचीत पकडली आणि झटपट उडून गेले.

त्यांना उशीर झाला होता. त्या राजाचे महायुद्ध सातव्या दिवशी होते आणि त्वरेने त्यांना त्या उत्तर ध्रुवाच्या प्रदेशात वेळेवर पोहोचायचे होते.

दरम्यानच्या काळात तो अस्वल-पक्षी युद्धासाठी तयारी करीत होता. त्याने बर्फाच्या लहान कपारीत त्याची नखे धारदार केली. त्याने सील मासा पकडला आणि त्याच्या पिवळया मोठ्या दातांखाली त्याची हाडे चिरडून दातांची परीक्षा घेतली. आणि कुरव पक्ष्यांच्या राणीने तिच्या टोळीला त्याच्या शरीरावरची पिसे मऊसूत होईपर्यंत साफ करण्यासाठी सोडले.

पण प्रत्येक दिवशी ते चिंताक्रांत होऊन दक्षिणेच्या आकाशात दृष्टीक्षेप टाकायचे. शेकडो कुरव त्या राजाची त्वचा परत आणतात का याची ते वाट बघत होते.

सातवा दिवस उजाडला आणि उत्तर ध्रुवावरील सारी अस्वले राजाच्या कपारी भोवतालच्या प्रदेशात जमा झाली. त्यातच तो वूफ खंबीर विजयाच्या आत्मविश्वासासह तेथे हजर होता.

“जेव्हा माझी नखे त्यावर चाल करून जातील तेव्हा त्या अस्वल पक्ष्याची पिसे भराभर उडून जातील!” त्याने फुशारकी मारली, आणि इतर हसले आणि त्यांनी त्याला प्रोत्साहन दिले.

त्या राजाची त्वचा त्याला पुन्हा परत न मिळाल्याने तो निराश झाला होता, पण त्याविना त्याने शूरपणे लढण्याचा निश्चय केला होता. त्याने त्याच्या कपारीबाहेर येण्याच्या मार्गातून राजाच्या रूबाबाने आणि गर्वाने आगेकूच केले आणि जेव्हा तो त्याच्या शत्रूच्या सन्मुख आला तेव्हा त्याने भयंकर डरकाळी फोडली ज्यामुळे वूफच्या हृदयाची स्पंदने क्षणभर बंद पडली, आणि त्याला जाणीव झाली की त्याच्याच वंशाच्या अशा सूज्ञ आणि बलवान राजाशी झुंज देणे किती गंभीर बाब होती.

एक किंवा दोन जोरदार फटक्यांची देवाण घेवाण झाल्यावर त्याचा शत्रू वूफचे धैर्य माघार घेऊ लागले आणि त्याने ठरविले की जोरात आरडाओरडा करून त्याच्या वैऱ्याला घाबरवून सोडायचे.

“ये जवळ अस्वल- पक्ष्या!” तो ओरडला. “अधिक जवळ ये, म्हणजे तुझ्या अंगावरचा पिसारा मी उपटून काढेन!”



त्याने त्याची पिसे पक्ष्यासारखी पिंजारली आणि कूफला जोरदार ठोसा मारला.

त्या अवमानाने राजाला क्रोध आला होता त्यापेक्षा दुप्पट आकाराचा होईपर्यंत त्याने त्याची पिसे पक्षासारखी पिंजारली आणि नंतर टांगा टाकीत तो पुढे आला आणि त्याने वूफला इतका जोरदार ठोसा मारला की ज्यामुळे त्याची कवटी अंड्याच्या टरफलासारखी तडतड आवाज करीत फुटली आणि तो जमिनीवर आडवा पडला.

जेव्हा अस्वलांचा जमाव भीती आणि आश्चर्याने त्यांच्या कैवाऱ्याचे कोसळणे पाहत होते तेव्हा आकाश अंधारून आले होते. त्याचवेळी शेकडो कुरव पक्षी खाली आले आणि त्यांनी राजाच्या शरीराला नितळ पांढऱ्या केसांनी झाकले. तेव्हा ते सूर्याच्या प्रकाशात चांदीसारखे लखलखू लागले.

आणि बघा! त्या अस्वलांनी त्यांच्या समोर उभ्या असलेल्या ख्यातनाम राजाच्या रूपात त्यांच्या सूज्ञ आदरणीय स्वामीला पाहिला. आणि एकमताने त्यांनी त्यांच्या राठ केसाळ डोक्यांनी उत्तर ध्रुवावरच्या पांढऱ्या अस्वलांच्या शक्तिमान राजाला आदरयुक्त वंदन केले.

***

ही गोष्ट असे शिकविते की खरी प्रतिष्ठा आणि धैर्य बाह्य देखाव्यावर अवलंबून नसते तर तो आतून यावा लागतो. बढाया आणि व्यर्थ गर्जना ह्या युद्धामधील तुच्छ हत्यारे होत.

* * * * *

## उच्चपदस्थ अधिकारी आणि फुलपाखरू

एक उच्चपदस्थ अधिकारी कियांग हो येथे रहायचा, ज्याचा स्वभाव पराकाष्ठेचा चिडखोर आणि फटकळ होता. त्यामुळे सर्व त्याचा तिरस्कार करायचे. तो प्रत्येक व्यक्तीवर गुरगुरायचा, डाफरायचा आणि त्याला कुणीही, कधीही, कुठल्याही परिस्थितीत हसताना किंवा आनंदी असलेले पाहिले नव्हते. विशेषतः तो मुलांचा आणि मुलींचा तिटकारा करायचा, कारण मुले त्याची थट्टा करायची, ज्यामुळे त्याला संताप यायचा. आणि मुली त्याची टर उडवायच्या, त्यामुळे त्याचा स्वाभिमान दुखावला जायचा.

जेव्हा तो इतका कुप्रसिद्ध बनला की कुणीही त्याच्याशी बोलेनासे झाले, जेव्हा ह्या विषयीची बातमी सम्राटाच्या कानावर गेली तेव्हा त्याने त्याला अमेरिकेत स्थलांतर करायचा हुकूम सोडला. हे त्याच्या खूप चांगल्या सोयीचे होते. पण चीन सोडण्यापूर्वी त्याने प्रज्ञावान जादूगार हावोत्-साइच्या मालकीचे अतिशय उत्कृष्ट असे जादूचे पुस्तक चोरून नेले. नंतर त्याने साठविलेले थोडेसे पैसे जमा केले आणि अमेरिकेला जाण्यासाठी जहाज पकडले.

पश्चिमेच्या मध्यभागी असलेल्या एका शहरात तो स्थायिक झाला आणि अर्थातच त्याने धोब्याचा धंदा सुरू केला कारण मजूर किंवा उच्चपदस्थ अधिकाऱ्यापेक्षा प्रत्येक चिनी माणसाचा हा आवडता व्यवसाय म्हणून त्याने तो स्वीकारला.

त्या शहरातील दुसऱ्या कुठल्याही चिनी माणसाशी त्याने परिचय करून घेतला नाही. ज्यांच्याशी जेव्हाही त्याची गाठ पडायची आणि ते त्याच्या हॅटवरील लाल बटन पाहून तो खराखुरा उच्चपदस्थ अधिकारी असावा म्हणून त्याला वाकून नमस्कार करायचे. तो लाल आणि पांढरे चिन्ह धारण करायचा. तेव्हा लोक त्याच्याकडे कपडे धुण्यासाठी आणून द्यायचे.



“तू माझा कैदी आहेस,” तो अधिकारी म्हणाला.

चिनी अक्षरे असलेले कागद ते आणून द्यायचे तेव्हा तो ती तपासायचा, हीच काय ती फक्त त्या अक्षरांची देवाणघेवाण त्याच्यामागे तो ठेवायचा.

एके दिवशी एक विद्रूप माणूस २६३ १/२ मेन स्ट्रीटच्या तळघरातील दुकानात इस्त्री करीत होता. त्याने वर बघितले आणि त्याला दिसले की त्याच्या खिडकीजवळ पोरकट चेहरे ढकलाढकली करीत होते. बहुतेक चिनी लोकांनी त्या मुलांशी मैत्री केली होती आणि हा त्यांचा तिरस्कार करून त्यांना हाकलून लावण्याचा प्रयत्न करीत होता. पण जेव्हा तो त्याच्या कामावर परत आला तेव्हा त्याला ती मुले पुन्हा खिडकीजवळ उभी राहून खोडकरपणे त्याच्याकडे बघून हसत होती.

त्या अश्लाघ्य गुंड अधिकाऱ्याने त्यांच्यावर मॉंचू भाषेतून भयंकर शब्दांचा भडिमार केला, पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. त्या मुलांना तेथे थांबण्यात मौज वाटत होती आणि दुसऱ्या दिवशी शाळा सुटते ना सुटते तोच ती तेथे हजर झाली आणि त्याचप्रमाणे नंतरच्या दिवशीही आणि पुढील दिवशीही. खिडकीच्या सान्निध्यात त्या चिनी माणसाला त्रास देण्यात त्यांना आनंद वाटत होता म्हणून.

पुढच्या दिवशी रविवार असल्यामुळे मुले दिसली नाहीत. पण तो म्लेंच्छ माणूस त्याच्या छोट्याशा दुकानात काम करीत होता तेव्हा एक फुलपाखरू उघड्या दरवाजातून आत आले आणि त्या खोलीत फडफडू लागले.

त्या अधिकाऱ्याने दरवाजा बंद केला आणि जोपर्यंत तो त्याला पकडू शकला नाही तोपर्यंत त्याने त्याचा पाठलाग केला. त्याने त्या फुलपाखराच्या सुंदर पंखांवर दोन टाचण्या खुपसून त्याला भिंतीवर लटकवले. त्यामुळे त्या फुलपाखराला इजा झाली नाही, पंखांमध्ये त्याला दुखापत झाली नाही, पण तो सुरक्षित कैदी बनला.

ते फुलपाखरू आकाराने खूप मोठे होते. आणि त्याचे पंख कुशलतेने व आकर्षक रंगांनी रंगलेल्या मोठ्या चर्चमधल्या खिडकीवर असलेल्या नक्षीदार रंगीत काचांसारखे होते.

त्या अधिकाऱ्याने लाकडी पेटी उघडली आणि त्याने चोरलेल्या हाओत्-साइचे उत्कृष्ट जादूचे पुस्तक काढून पुढ्यात ठेवले. पाने उलटल्यावर तो एका उताऱ्यावर आला ज्यात “फुलपाखरांची भाषा कशी समजायची” याचे वर्णन केलेले होते. त्याने ते काळजीपूर्वक वाचले आणि नंतर जादूई सूत्रात ते एका कपात मिश्रण करून वेडावाकडा चेहरा करीत पिऊन टाकले.

तात्काळ तो त्या फुलपाखराशी असे म्हणत बोलू लागला, “का प्रवेश केलास तू ह्या खोलीत?”

“मला मधाच्या पोळ्याचा सुगंध आला.” त्या फुलपाखराने उत्तर दिले. “म्हणून मी असा विचार केला की येथे मध मिळेल.”

“पण तू तर माझा कैदी आहेस,” तो अधिकारी उत्तरला, “मला आवडलं तर मी तुला ठार मारीन किंवा भिंतीवर उपासमारीने तुला मरायला सोडीन.”

“मला तीच अपेक्षा होती,”फुलपाखराने निःश्वास टाकीत म्हटले. “पण असं असलं तरी आमची प्रजाती कमी दिवसच जगते. मृत्यू लवकर किंवा नंतर, मरायचंच आहे.”

“तरीही तुला जगावसं वाटतं, नाही का?” त्या अधिकाऱ्याने विचारले.

“होय, जीवन जर मनोरम असेल आणि जग हे सुंदर असेल तर मी मृत्यूला शोधणार नाही.”

“मग,” तो अधिकारी म्हणाला, “मी तुला जीवनदान देतो, दीर्घ आणि मनोरम जीवन- जर काही काळासाठी तू माझी आज्ञा पाळण्याचं आणि माझे आदेश पूर्ण करण्याचे वचन देशील तर.”

“एक फुलपाखरू मानवाची सेवा कसे करू शकेल?” त्या प्राण्याने आश्चर्याने विचारले.

“प्रायः ते करू शकत नाहीत.” त्याचे उत्तर होते, “पण माझ्याजवळ एक जादुई पुस्तक आहे. जे मला विचित्र गोष्टी शिकविते. तू वचन देतोस?”

“ओ, होय, मी वचन देतो,” कारण तुमचा गुलाम असूनही मला जीवनात काहीतरी मजा लुटायला मिळेल, पण तुम्ही जर मला मारून टाकले तर सर्व गोष्टींचा शेवट होईल!”

“खरं आहे,” तो अधिकारी म्हणाला. “पण फुलपाखरांना आत्मे नसतात म्हणून तू पुन्हा जिवंत होऊ शकणार नाहीस”

“पण मी आधीच तीन वेळा जन्मल्याचा आनंद लुटला आहे.” फुलपाखरू उत्तरादाखल काहीशा गर्वाने म्हणाले. “मी फुलपाखरू होण्यापूर्वी सुरवंट व कोष होतो. जरी माझ्यापेक्षा तुमचं आयुष्य दीर्घ असलं तरी तुम्ही काहीच कधीच नाही तर केवळ एक चिनी माणूस आहात.”

“मी तुझं आयुष्य खूप दिवसांसाठी लांबवू शकतो, जर तू माझी आज्ञा पाळलीस,” त्या चिनी माणसाने जाहीर केले. “मी ते सहजगत्या माझ्या जादूने करू शकतो.”

“खचितच मी तुमची आज्ञा पाळेन.” फुलपाखरू अभावितपणे म्हणाले.

“मग ऐक! तुला मुलं माहित आहेत? – मुले आणि मुली?”

“होय मला ते ठाऊक आहेत. ते माझा पाठलाग करतात आणि मला पकडायचा प्रयत्न करतात, जसे तुम्ही केलेले आहे.” फुलपाखराने उत्तर दिले.

“आणि ते खिडकीतून माझी टवाळी करतात आणि खिल्ली उडवतात.” तो अधिकारी कडवटपणे बोलत राहिला.

“त्या कारणास्तव ते माझे आणि तुझेही शत्रू आहेत! पण तुझ्या मदतीने आणि ह्या जादूच्या पुस्तकाच्या मदतीने आपण त्यांनी केलेल्या अपमानाचा चांगलाच बदला घेऊ.”

“मला त्यांचा बदला घ्यावासा वाटत नाही.” फुलपाखरू म्हणाले, “काहीही झालं तरी ती मुलेच आहेत आणि माझ्यासारख्या सुंदर प्राण्याला त्यांनी पकडणं हे स्वाभाविकच आहे.”

“तथापि ह्या बाबतीत मी गंभीर आहे! आणि तुला माझी आज्ञा पाळायलाच हवी.” अधिकारी चिडून निष्ठुरपणे म्हणाला, “कमीत कमी मी त्यांचा बदला घेईनच.”

नंतर त्याने काकवीचा एक थेंब फुलपाखराच्या डोक्याच्या बाजूला चिटकविला आणि म्हणाला, “खात रहा ते. जेव्हा मी माझे पुस्तक वाचत राहीन आणि जादूचे सूत्र बनवीन.” म्हणून त्या फुलपाखराने काकवीवर ताव मारला आणि

त्या अधिकाऱ्याने पुस्तक अभ्यासले, नंतर त्याने एक जादुई संयुग एका पत्र्याच्या कपात एकत्र केले.

जेव्हा ते मिश्रण तयार झाले तेव्हा त्याने फुलपाखराला भिंतीपासून मुक्त केले आणि त्याला तो म्हणाला,

“मी तुला हुकूम सोडतो की तू तुझे पुढचे दोन्ही पाय ह्या मिश्रणात बुडव आणि नंतर मुले भेटेपर्यंत उडत रहा. तो मुलगा असो की मुलगी, जवळ जा आणि त्याच्या कपाळाला तुझ्या पायांनी स्पर्श कर. ज्याला कुणाला हा स्पर्श होईल, पुस्तक असे सुचविते की ते डुक्कर होईल, आणि त्यानंतर तो कायमचा डुक्करच राहील. नंतर तू माझ्याकडे परत ये आणि त्या कपातील द्रवात पुनश्च तुझे पाय बुडव. म्हणून माझे सर्व शत्रू- मुले भिकार डुक्कर होतील, तेव्हा कुणीही माझ्या जादूटोण्याबद्दल आरोप करणार नाही.”

“ठीक आहे. तुमचा हुकूम असल्याने मी तो मानतो,” त्या फुलपाखराने म्हटले. नंतर त्याने त्याचे पुढील पाय जे सहापेक्षा छोटे होते त्या कपातील द्रवात बुडविले, आणि दरवाज्याबाहेर उडून त्या शहराच्या काठावरील घरांवर उडत गेला. तेथे एका फुलांच्या बगिच्यात तो उतरला आणि त्याच्यावर मुलांना डुकरे बनविण्याचे सोपविलेले कार्य तो विसरला.

ह्या फुलावरून त्या फुलावर उडता उडता ते जादूई संयुग त्याच्या पायावरून पुसले गेले, सूर्य अस्ताला चालला होता म्हणून फुलपाखराला शेवटी अचानक त्याच्या मालकाची आठवण झाली, त्याने कितीही प्रयत्न केला असला तरी त्या मुलांना तो अपाय करू शकला नव्हता. पण प्रयत्न करायचा त्याचा हेतू नव्हताच मुळी.

“तो खत्रूड चिनी माणूस,” त्याने विचार केला, “मुलांचा द्वेष करतो आणि त्यांचा संहार करण्याची इच्छा धरतो. पण खरं म्हणजे मला स्वतःला मुले

खूप आवडतात आणि मी त्यांना इजा करणार नाही. खचितच मी माझ्या मालकाकडे जाणार कारण तो जादूगार आहे, तो मला शोधून काढेल आणि ठार मारेल, पण ह्या बाबतीत मी त्याला सहजगत्या फसवू शकतो."

जेव्हा ते फुलपाखरू अधिकाऱ्याच्या धुलाई केंद्रांच्या दरवाज्याजवळ उडत आले तेव्हा त्याने मोठ्या उत्सुकतेने विचारले, "ठीक, मुलांना भेटलास का तू?"

"होय भेटलो मी," फुलपाखराने शांतपणे उत्तर दिले. "ती सोनेरी केसांची खूप सुंदर मुलगी होती- पण आता ती ची ची करणारी डुकरीण झाली आहे!"

"छान! छान! छान!" तो अधिकारी खोलीमध्ये आनंदाने नाचत ओरडला. "तुला रात्रीच्या जेवणासाठी काकवी मिळेल आणि उद्या तू दोन मुलांचे डुकरात रूपांतर करायलाच हवे." फुलपाखराने काहीच उत्तर दिले नाही. पण शांतपणे काकवी खाल्ली. स्वतःजवळ प्राण नाही, सद्सद्विवेक बुद्धी नाही आणि सद्सद्विवेक बुद्धी नसल्यामुळे अमोघ आनंदासह मोठ्या उत्साहाने त्या अधिकाऱ्याशी खोटे बोलण्याचे त्याने सामर्थ्य एकवटले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी अधिकाऱ्याच्या हुकूमाप्रमाणे त्या फुलपाखराने मिश्रणात पाय बुडविले आणि तो मुलांच्या शोधार्थ उडाला.

जेव्हा तो शहराच्या किनाऱ्याकडे आला तेव्हा त्याची नजर खुराड्यात असलेल्या डुकराकडे गेली आणि जेव्हा तो खुराड्याच्या काठावर बसला तेव्हा त्याने त्या प्राण्याकडे बघितले आणि विचार केला.

“जर मी जादुई संयुगाचा स्पर्श करून मुलाचे रूपांतर डुकरात करू शकतो तर डुकराला स्पर्श केल्यावर काय होईल याचे मला आश्चर्य वाटते.”

जादुटोण्यातील ह्या मुद्द्याने जिज्ञासू होऊन ते फुलपाखरू खाली उडत आले आणि त्याने त्या डुकराच्या नाकाला पुढच्या पायांनी स्पर्श केला. तात्काळ तो प्राणी नाहीसा झाला आणि त्याच्या जागी केसांचे जंजाळ असलेल्या घाणेरड्या दिसणाऱ्या मुलाने डुकराच्या खुराड्यातून उडी मारली आणि तो रस्त्यावरून हुप हुप ओरडत पळाला.

“गमतीदार आहे ते,” फुलपाखरू स्वतःशीच म्हणाले. “जर अधिकाऱ्याला हे कळले की त्याला त्रास देण्याऱ्या प्राण्यांपैकी मी आणखी एकाला मुक्त केले तर त्याला माझा खूप राग येईल.” त्या मुलाच्या मागे तो फडफडत गेला जो मांजराला दगड मारण्यासाठी थांबला होता. पण मनीमाऊ झाडावर पळत निसटली जेथे दाट फांद्यांनी तिचे दगडांपासून संरक्षण केले. नंतर त्या मुलाला नव्याने पेरलेली बाग आढळली, आणि ते पेरलेले बी सगळीकडे इतस्ततः दूरवर पसरेपर्यंत त्याने ते वाफे पायाने तुडवले, आणि बागेची नासधूस केली. नंतर त्याने एक फांदी पकडली आणि शेतात शांतपणे चरत उभ्या असलेल्या वासराला जोरदार तडाखा मारला. तो गरीब बिचारा प्राणी मोठ्या करूणेने ची ची करीत पळाला आणि तो मुलगा हसला आणि त्या घाबरलेल्या प्राण्याला अधिकाधिक भीती दाखवित त्याच्या मागे पळाला.

“खरोखर,” त्या फुलपाखराने विचार केला, “तो अधिकारी मुलांचा द्वेष करतो ह्याबद्दल आता मला आश्चर्य वाटत नाही जर ह्या मुलासारखी सर्वच मुले क्रूर असतील तर.”

त्या वासराने त्याच्यापासून बचाव केल्यावर तो मुलगा परत रस्त्यावर आला, जेथे त्याला दोन मुली शाळेत जाताना भेटल्या. त्यापैकी एकीच्या हातात लाल सफरचंद होते आणि त्या मुलाने ते हिसकावून घेतले आणि त्याने ते खायला सुरूवात केली. त्या लहान मुलीने रडायला सुरूवात केली, पण तिची मैत्रीण अधिक धाडसी आणि दणगट होती, ती ओरडली, “तुला स्वतःला काही लाज शरम वाटायला हवी, घाणेरडा पोरगा तू!”

ह्यावर तो मुलगा तेथे पोहोचला आणि तिच्या कोवळया गालावर त्याने चपराक मारली. त्यामुळे तिने स्फुंदायला सुरूवात केली.

यद्यपि त्या मुलाला ना मन होते, ना सद्सद्विवेकबुद्धी होती. त्या फुलपाखराचे हृदय खूप कोमल होते आणि आता त्याने त्या मुलाचे वागणे सहन करायचे नाही असे ठरविले.

“जर मी त्याला अस्तित्वात राहू दिले तर,” त्याने विचार केला. “मी स्वतःलाच माफ करू शकणार नाही, कारण तो राक्षस सकाळपासून रात्रीपर्यंत वाईट गोष्टीच करणार.”

म्हणून तो सरळ त्या मुलाच्या चेहऱ्यावर उडाला आणि त्याने त्याचे चिकट पाय त्याच्या कपाळाला लावले.

दुसऱ्याच क्षणाला तो मुलगा नाहीसा झाला पण डुरूक डुरूक करीत एक डुक्कर त्वरेने धावत खुराड्याच्या दिशेने गेले.

त्या फुलपाखराने दुःखाने निःश्वास सोडला. “ह्या वेळेला खरोखर त्या मुलावर अधिकाऱ्याच्या जादूचा उपयोग केला.” जेव्हा तो मंद झुळूकेवर हळूहळू तरंगत होता तेव्हा तो पुटपुटला. “पण तो मुलगा मुळातच डुक्कर होता. म्हणून मी

स्वतःला दोष देण्याचे कारण नाही. त्या लहान मुली गोड आणि सुकुमार होत्या आणि माझा जीव वाचविण्यासाठी मला त्यांना दुखापत करायची नव्हती, पण सर्व मुले अशीच डुकरे झाली तर त्या अधिकाऱ्याची आज्ञा अमलात आणण्यात मी कां कूं करायला नको."

नंतर तो गुलाबाच्या झाडाकडे उडाला आणि सायंकाळपर्यंत आनंदात राहिला. सूर्य बुडाल्यावर तो त्याच्या मालकाकडे परतला.

"तू त्या दोघांचे डुकरात रूपांतर केले का?" त्याने तात्काळ विचारले.

"हो, केले मी," त्या फुलपाखराने उत्तर दिले. "एक होती सुंदर काळ्या डोळ्यांची मुलगी आणि दुसरा होता चेहऱ्यावर तपकिरी डाग असलेला लाल केसांचा, अनवाणी वर्तमानपत्रे विकणारा मुलगा."

"छान! छान! छान! तो अधिकारी हर्षोत्फुल्ल होऊन ओरडला. "तेच ते, ज्यांनी मला एकदा खूप छळले होते! वर्तमानपत्रे विकणारी जी जी मुले तुला भेटतील त्या सर्वांचे रूपांतर डुकरात कर!"

"ठीक आहे," त्या फुलपाखराने शांतपणे उत्तर दिले आणि त्याने रात्रीचे काकवीचे जेवण केले.

अशा रितीने त्याच पद्धतीने बरेच दिवस गेले. ते फुलपाखरू सूर्योदयाचे वेळी निर्हेतूकपणे बागेत फडफडायचे आणि त्या अधिकाऱ्याकडे रात्री परतून मुलांना डुकरे बनवल्याच्या खोट्या गोष्टी सांगायचे. कधी एका मुलाचे त्याने डुकरात रूपांतर केल्याचे तो सांगायचा, तर कधी दोन तर कधी कधी तीन पण, तो अधिकारी नेहमीच त्याच्या वृत्तांताचे स्वागत करायचा. फुलपाखरू हेतुतः हर्षाने त्याला वृत्तांत सांगायचा आणि तो त्याला भरपूर काकवी जेवायला द्यायचा.

तथापि, एके दिवशी, फुलपाखराने विचार केला की वृत्तांतात बदल करायला हवा जेणेकरून त्या अधिकाऱ्याला संशय वाटणार नाही. आणि जेव्हा मालकाने विचारले की त्या दिवशी कोणत्या मुलाला डुक्कर बनविले तेव्हा त्या खोटारड्या प्राण्याने उत्तर दिले, “तो चिनी मुलगा होता, आणि जेव्हा मी त्याला स्पर्श केला तेव्हा त्याचे काळया डुकरात रूपांतर झाले.”

ह्यामुळे त्या अधिकाऱ्याला राग आला, जो खास करून चिडलेल्या मनोवस्थेत होता. त्याने द्वेषबुद्धीने फुलपाखराला बोटाने फटका मारला आणि जवळ जवळ त्याचा सुंदर पंख मोडला. कारण चिनी मुलांनी एकदा त्याची टिंगल उडविली होती हे तो विसरला आणि फक्त अमेरिकन मुलांवरील त्याचा द्वेष त्याने लक्षात ठेवला होता.

त्या अधिकाऱ्याच्या उद्धटपणामुळे फुलपाखराला खूप संताप आला. त्याने त्या अधिकाऱ्याची काकवी खायचे नाकारले. आणि तो रागाने सर्व सायंकाळभर फुरंगटून बसला. कारण त्या अधिकाऱ्याला जितका मुलांचा द्वेष वाटायचा तितकाच द्वेष त्याला त्या अधिकाऱ्याबद्दल वाटला.

जेव्हा सकाळ झाली तेव्हा अजूनही तो संतापाने थरथर कापत होता. पण तो अधिकारी ओरडला, “चल त्वरा कर, दरिद्री गुलामा, कारण आज तुला चार मुलांना डुकरे बनवायची आहेत. कालची त्रुटी पूर्ण करायची आहे.”

पण फुलपाखराने काहीही उत्तर दिले नाही. त्याचे छोटे काळे डोळे खट्याळपणे चमकत होते. आणि जसे त्याने त्या जादुई संयुगात त्याचे पाय बुडविले तसे तो जोरदारपणे त्या अधिकाऱ्याच्या चेहऱ्यावर झेपावला आणि त्याच्या विद्रूप सपाट कपाळावर स्पर्श केला.



एक सभ्य गृहस्थ आपले धुलाईला देण्याचे कपडे देण्यासाठी धुलाई केंद्रात आला.

त्यानंतर लवकरच एका सभ्य गृहस्थाने धुलाई केंद्राच्या खोलीत प्रवेश केला. तो अधिकारी तेथे नव्हता पण किळसवाणा, किडकिडीत डुक्कर, जो अतिशय वाईटरित्या मोठी किंचाळी फोडीत त्या खोलीत पळत होता.

ते फुलपाखरू निर्झराकडे उडाले आणि त्याने त्या जादुई संयुगाचे अंश त्यात पूर्णपणे धुऊन टाकले आणि जेव्हा रात्र झाली तेव्हा ते गुलाबाच्या झुडूपात झोपी गेले.

* * * * *

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहेकडे लक्ष नका देऊ मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार .दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं . वर्षालाअर्धाकोटी डाऊनलोड होतातवाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप ., ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीतसुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासू .न ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात.रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही .

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हाआपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात . ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवातुम्ही फ़क्त दहा व .ाचक आणाते . तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. .शंभर आणतील. आणि ते दहाहजार आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवाकिंवा .7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे पण फ़ुकट नाही.